# मोरस कथा दशावतार

मोरस कथा दशावतार

[ प्रातिनिधिक साहित्य संग्रह ]

संपादन : म. श्री. नेरूरकर

# मोरस कथा दशावतार

## मोरस कथा दशावतार

[प्रातिनिधिक साहित्य संग्रह]

**संपादन : प्र. श्री. नेरुरकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति-मंडळ
मंत्रालय-मुंबई- ४०००३२

अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती :-** १ नोव्हेंबर १९८४.

**प्रकाशन :-** सूर्यकांत देशमुख
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति-मंडळ
मंत्रालय-मुंबई-४०००३२

© **प्रथमावृत्ती :-** प्रकाशकाधीन

**मुद्रक :-** चिंतामणि प्रिंटींग प्रेस
**ऑफिस :-** २०४ महावीर अपार्टमेंट नं. २
जे. पी. रोड , अंधेरी (पश्चिम)
मुंबई – ४०० ०५७
टे. नं. ५७ ८१ १३

**किंमत २० रुपये**

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन ..... 5

मोरस मराठी आणि मॉरिशसमधील मराठी भाषिक लेखन ..... 7

महादू ..... 12

जीवन साफल्य ..... 28

स्थळ ..... 30

मी चालतो गंगातिरी ..... 44

नशिबाचे नऊ गिऱ्हे ..... 57

मराठी एकांकी नाटक ..... 72

गोपीनाथाची कथा ..... 79

# निवेदन

हिंदी महासागरात भारतापासून हजारो मैल दूर मॉरिशस बेट इतर द्वीपसमूहांस गेली असंख्य वर्षे अस्तित्वात आहे. चारशे वर्षापूर्वी या मॉरिशस बेटावर फक्त डोडो नावाचा पक्षी इतर पशुपक्ष्यांसह रहात असे. सोळाव्या-सतराव्या शतकापासून पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच या सामाज्यवाद्यांच्या वासाहतिक स्पर्धा सुरू झाल्या आणि मॉरिशस बेटावर या वसाहतवाद्यांकडून त्यांनी अगोदरच ज्या देशात सत्तास्पर्धा सुरू केल्या होत्या. त्या देशांतील माणसे वेठबिगार मजूर म्हणून नेली. फ्रेंच व इंग्रज यांच्यामध्ये सत्तास्पर्धा भारतात सुरू झाली व हिंदी महासागरातील मॉरिशस बेट ऊसाचे बेट म्हणून त्यांनी निवडले, त्याच काळात पहाडांच्या व नद्यांच्या या निसर्गसुंदर बेटावर जमीन कसण्यासाठी भारतातील बिहार, तामीळनाडू, आंध्र व महाराष्ट्रातून बोटी भरभरून वेठबिगार मजूर स्त्री-पुरुष, मुले मॉरिशस बेटावर नेण्यात आली. आज १९८४ साली भारतीय लोकांना या बेटावर स्थालांतरित म्हणून जाऊन दीडशे वर्षे पुरी होत आहेत. या बेटावर आजचे मॉरिशस देशाचे तरुण व धडाडीचे पंतप्रधान अनिरूद्ध जगन्नाथ यांच्या नेतृत्वाखाली – **मॉरिशस– १५० वर्षे भारतीय स्थलांतरितांची** हे वर्षे १ ऑक्टोबर १९८४ पासून ३१ मे १९८५ पर्यंत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरे होत आहे.

मॉरिशस बेटावर इतर भारतीय भाषिकांबरोबर मराठी भाषिक समाज गेली दिडशे वर्षे वास्तव्य करून आहे. आज मॉरिशस बेटावरील मराठी समाजाची लोकसंख्या पन्नास हजाराच्या जवळपास आहे. या मराठी लोकांनी आजवर मॉरिशस बेटावर आपली मराठी भाषा, महराष्ट्राची लोकसंस्कृती, उत्सव परंपरा व दशावतारासारखे लोकनाट्य टिकवून ठेवले आहे. इ. स. १९६४ सालापासून मॉरिशस देशाच्या शिक्षणक्रमामध्ये मराठी भाषेच्या अभ्यासाचा समावेश झाला आहे. आज मॉरिशसमध्ये सुमारे सत्तर मराठी भाषेच्या शाळा असून शंभराच्यावर मराठी शिक्षक-शिक्षिका मराठी भाषेच्या अध्यापनाचे काम करतात. मॉरिशसचे भूतपूर्व पंतप्रधान व विदयमान गर्व्हनर जनरल माननीय डॉ. सर शिवसागर राम गुलाम यांच्या कारकिर्दीत मॉरिशसमधील पौर्वात्य विद्यांचा अभ्यास व संशोधन करणारी 'महात्मा गांधी संस्था' १९७५ साली स्थापन झाली. भारताच्या पंतप्रधान माननीय इंदिरा गांधी यांनी या संस्थेचे उद्‌घाटन केले होते. 'महात्मा गांधी संस्थे' त गेली काही वर्षे मराठी भाषा व पाठ्यपुस्तक मंडळाचे कार्यालय मॉरिशस बेटावरील मराठी भाषेच्या व साहित्याच्या विकासाचे कानम करीत आहे. धर्मा गोविंद, देवजी पडीया, संजय आनंद, श्रीमती दयाबाय बाबाजी अशी मराठी अध्यापक व लेखक मंडळी या मराठी विभागात अधिकारपदावर आहेत. 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन' ही मॉरिशस बेटावरील मराठी समाजाची प्रातिनिधिक संस्था आहे. महाराष्ट्रामध्येही 'महाराष्ट्र मॉरिशस मित्र मंडळ' ही संस्था गेले दीड शतक मॉरिशस देशातील भारतीय समाजासाठी महाराष्ट्रात कार्यरत आहे. या मंडळातर्फे मॉरिशसमधील कवी व लेखक धर्मा गोविंद, देवजी पडीया, सदानंद भिवाजी, सदाशिव गोविंद जगताप यांचे 'मोरस मराठी' भाषेतील साहित्य महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाला उपलब्ध झाले आहे. सदाशिव गोविंद या आज ऐंशी वर्षे वयाच्या गृहस्थांनी आपले आत्मकथन लिहिले आहे. धर्मा गोविंद यांनी 'माहेरी गेली' ही कहाणी लिहिली आहे. देवजी पडीया व सदानंद भिवाजी यांनी एकांकिका व नाटके लिहीली आहेत. शिवाय मॉरिशस बेटावरील दशावताराची मराठी संहिताही मंडळाला प्राप्त झाली आहे. मॉरिशस-१५० वर्षे भारतीय स्थलांतरितांची- हे वर्षे साजरे होत असताना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाला मॉरिशसमधील या मराठी लेखकमंडळींची पुस्तके प्राकाशित करताना विशेष आनंद होत आहे. 'मोरस मराठी ' भाषा ही सुद्‌धा मूळ मराठी मातृभाषेच्या अस्तित्वाचे एक अभ्यासनीय अंग बनले. अभ्यासकांना ही पुस्तके विशेष उपयुक्त ठरतील असे मला मनःपूर्वक वाटते.

अनुक्रमणिका

*सुरेन्द्र बारलिंगे*
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

४२, यशोधन,
मुंबई- ४०० २०
दिनांक १ नोव्हेंबर, १९८४.

## अनुक्रमणिका

# 'मोरस मराठी' आणि मॉरिशसमधील मराठी भाषिक लेखन

'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा' चे अध्यक्ष व माझे स्नेही डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांनी मॉरिशस बेटावरील मराठी माणसांची कहाणी माझ्याकडून नीट ऐकून घेतली. मी माझ्या मॉरिशस बेटावरील मुक्कामात लिहिलेली माझी 'मॉरिशस डायरी' देखील त्यांनी समजावून घेतली. मॉरिशस बेटावरील मराठमोळ्या माणसांनी गेली दीडशे वर्षे टिकवून ठेवलेली आपल्या पूर्वजांची मराठी भाषा-तिचा इतिहास डॉ. बारलिंगे यांनी माझ्याकडून ऐकला. मी मॉरिशस बेटावरील वयोवृद्ध, मध्यमवयीन व तरुण पिढीच्या स्त्री-पुरुषांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या संभाषणाच्या व त्यांनी गाऊन दाखविलेल्या मराठी गीतांच्या व लोकगीतांच्या माझ्याकडील ध्वनिफिती डॉ. बारलिंगे यांनी अभ्यासपूर्वक ऐकल्या. आणि मॉरिशस बेटावरील आजवर टिकून राहिलेली मराठी भाषा व तेथील मराठी मंडळींनी बेटावरच्या आपल्या स्वतंत्र राष्ट्रातील आंतराष्ट्रीय बहुभाषांच्या वातावरणात जोपासलेली आपली मराठी भाषा, -तिला नंतर जे 'मोरस मराठी' भाषेचे स्वरूप प्राप्त झाले- ती सुद्धा डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांनी आपलीच मराठी भाषा म्हणून ' साहित्य संस्कृती मंडळा' साठी स्वीकारली, हे मी ' मोरस मराठी भाषे' चे महद्भाग्य समजतो. त्याबद्दल डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांना मॉरिशस बेटावरील 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन' च्या वतीने व आमच्या मुंबईतील 'महाराष्ट्र मॉरिशस मित्र मंडळा' च्या वतीने धन्यवाद देतो.

१९६७ सालच्या सप्टेंबर महिन्यात मी मॉरिशस बेटावर पहिल्यांदा पाऊल टाकले. महाराष्ट्रातील थोर व कर्तबगार सर्कस महर्षी कै. नारायणराव वालावलकर यांच्या 'धी ग्रेट रॉयल सर्कस' बरोबर पूर्व आफ्रिका खंडात एक पत्रकार व लेखक म्हणून प्रवास करण्याची संधी नारायणरावांनी मला दिली होती. मोंबासाहून एका खास डच महासागरी जहाजातून आठ नऊ दिवस हिंदी महासागरावर तरंगत ती एका संध्याकाळी मॉरिशस बेटाच्या पोर्ट लुईस या बंदरात येऊन थडकलो होतो. मग आमचा सर्कसचा तळ मॉरिशस बेटावरील कॉरोमॉंडेल या स्थळावर पडला होता. गंमत म्हणजे पहिल्या आठदहा दिवसात सगळे मॉरिशस 'धी ग्रेट रॉयल सर्कस' च्या चार खांबी भव्य तंबूत येऊन लोटत होते आणि मी ते जवळून निरखून पहात होतो. मग हळूहळू मॉरिशसच्या लोकजीवनात मी रस घेऊ लागलो. मॉरिशसच्या पंतप्रधानांपासून तो मंत्रीमंडळ आणि संसद सदस्यांपर्यंत मला माणसे भेटत गेली . मी त्यांना भेटत राहिलो, त्यावेळचे दोन संसद सदस्य माननीय शिवा बापू व गणू गंगाराम मला भेटले आणि मॉरिशस बेटावरील मराठी मंडळींशी माझा जवळचा व जिव्हाळ्याचा ऋणानुबंध जडत गेला. तेव्हाच मला मॉरिशस बेटावरील चारी पहाडी दिशांना विखुरलेल्या व ऊस-शेतमळ्यात मजूर म्हणून काम करणाऱ्या व अन्य व्यवसायी मराठी माणसांना प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन भेटण्याची, त्यांच्याशी बोलण्याची , त्यांचे जीवन समजून घेण्याची संधी गणू गंगाराम व शिवा बापू या बेटावरील ज्येष्ठ नेत्यांनी व समाजकार्यकर्त्यांनी प्राप्त करून दिली. मॉरिशस बेटावरील मराठी समाजात जन्माला आलेला व ज्याचा वंशज बाबल्या सावंत हा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी परिसरातील माणगाव भागातून एक वेठबिगार मजूर म्हणून दीडशे वर्षांपूर्वी या बेटावर गेलेला- तो मॉरिशसमधील नामवंत लेखक, विचारवंत, कथा व कांदबरीकार व इतिहासाचा शिक्षक- आनंद सावंत मल्लु या बेटावर मला भेटला. 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन'चा धडाडीचा तरूण कार्यकर्ता, त्याचा भाऊ विरजानंद मल्लु व सगळे मल्लु कुटुंब, त्यांची सयाबाई, त्यांचे वडील, त्यांचा परिवार मला भेटला. मॉरिशस बेटावरील माझ्या पहिल्या अडीच महिन्यांच्या मुक्कामात मॉरिशसमधील भारतीय समाजाची मी बरीच माहिती प्रत्यक्ष भेटीगाठी, संवादातून व निरीक्षण व अभ्यासातून गोळा केली. माझी 'मॉरिशस डायरी' अदययावत लिहिली. मग मुंबईला परत आल्यावर 'महाराष्ट्रा टाईम्स' मध्ये एक दीर्घ लेखमाला लिहून या स्वप्ननिळ्या बेटावरची मराठी माणसांची कहाणी मी महाराष्ट्राला सांगितली. महाराष्ट्रीय माणसांना ती

अनुक्रमणिका

कहाणी वाचून प्रथमच मॉरिशस बेटावरील मराठी माणसांचे जीवन समग्र व सुस्पष्ट असे आकलन झाले. नंतर 'महाराष्ट्र मॉरिशस मित्र मंडळा' ची स्थापना मुंबईत झाली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे त्यावेळचे संचालक , संघटक व कार्यकर्ते कै. वासुदेवराव भट यांचे मला मोठे सहाय्य झाले.

याच माझ्या पहिल्या भेटीत एके दिवशी सर्कशीत माझा पत्ता काढीत धर्मा गोविंद हा मराठी भाषेचा शिक्षक मला भेटायला आला. उंच, देहाने भरलेला कष्टकरी समाजाच्या सर्व खुणा अंगावर प्रकट करणारा, लालसर वर्ण पण देखणा सतेज चेहरा, डोळे पाणीदार व भावुक, मॉरिशस बेटावरील पाश्चात्य पद्धतीप्रमाणे त्याने सूट-बूट घातलेला, भव्य कपाळ डोक्यावर काळेभोर केस व्यवस्थित विंचरलेले. शिवाय तो चांगले मोरस मराठी बोलत होता. त्याने बेटावरील मराठी शिक्षणाची व शिक्षकांची परिस्थिती मला विशद करून सांगितली. आपल्या मराठी भाषेत लिहिलेल्या कविता व कथा त्याने मला वाचायला दिल्या. मी जणू कुणी त्याचा वर्षानुवर्षे हरवलेला नातेवाईकच त्याला भेटलो होतो. धर्मा गोविंद बोबेसिन सारख्या शहरापासून (जिथे आमच्या सर्कसचा तळ पडला होता) दूर खेड्यात रहात होता. त्याच्या बोलण्या-चालण्या वागण्यातून त्याने मला एक विलक्षण चटका लावला. मलाही वाटू लागले की, माझाही कुणी युगायुगाने फारकत झालेला महाराष्ट्र, मराठी भाषा, मराठी साहित्य यांचा वंशज पुन्हा मला अद्‌भुतपणे या बेटावर भेटला . 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये मी लिहिलेल्या लेखमालेत धर्मा गोविंदच्या मॉरिशस देशाला उद्‌देशून लिहिलेल्या मोरस मराठी कविता मी आवर्जून समाविष्ट केल्या होत्या. मुंबई आकाशवाणीवर मी मॉरिशस भेटीवर तीन व्याख्यानांची माला गुंफली. त्यावेळीही धर्मा गोविंदच्या कविता मी पेश केल्या व श्रोत्यांवर त्यांचा एक भावनिक प्रभाव पडलेला मला आढळून आला.

इ.स. १९७९ साली महाराष्ट्र राज्य सरकारच्या आमंत्रणावरून मॉरिशस बेटावरील मराठी मंडळींचे एक प्रतिनिधी मंडळ मुंबईला आले. त्या मंडळांच्या प्रतिनिधींचे मुंबई, पुणे व अन्य ठिकाणी भरघोस स्वागत झाले. महाराष्ट्र राज्याने मॉरिशसमधील मध्यम परिस्थितीतील मराठी मुलामुलींना महाराष्ट्रात येऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी सोयी-सवलती उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. या प्रतिनिधी मंडळाबरोबर देवजी पडीया हा मॉरिशसमधील नाटककार, कवी व मराठी भाषेचा शिक्षक आलेला होता. दरवर्षी 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन' तर्फे मॉरिशस बेटावर १ मे रोजी 'महाराष्ट्र दिन व छत्रपती शिवाजी महाराज उत्सव' राष्ट्रीय पातळीवर साजरा केला जातो. इ. स. १९८० साली १ मे रोजी साजरा होणाऱ्या या समारंभाचा प्रमुख पाहुणा म्हणून 'मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन'ने मला मॉरिशस बेटावर आमंत्रित केले. त्याप्रमाणे मी या दुसऱ्या मॉरिशस भेटीत बेटावर दहा आठवडे मुक्काम केला आणि विशेषच सखोल व व्यापक अशी मराठी समाजाची माहिती मी मराठी माणसाच्या वस्तीत घरोघरी जाऊन मिळविली. माझी ही संशोधनात्मक कामगिरी सफल व्हावी म्हणून 'मॉरिशस मराठी फेडरेशन'ने मला अव्याहत सर्व प्रकारचे सहाय्य दिले. शिवाय मॉरिशसनमधील 'महात्मा गांधी संस्थे'त तेथील अधिकारी वर्गाने व 'मॉरिशस लेखक संघा'चे कार्यवाह प्रा. आनंद सावंत मल्लु यांच्या मार्गदर्शनाने मी महाराष्ट्रातून मॉरिशस बेटावर स्थालांतरित झालेल्या मराठी माणसांची राखून ठेवले ठेवलेली इंग्रजी अमदानीतील दप्तरे धुंडाळली. त्यांचा अभ्यास केला. विस्तृत टीकाटिप्पणी केल्या. 'मॉरिशस देशा' वरील माझ्या आगामी ग्रंथात त्याबद्दल सविस्तर मी लिहिणारच आहे. या माझ्या दुसऱ्या मुक्कामात मॉरिशस बेटावरील मराठी भाषिक लेखक, कवी, लोकनाट्यकार , लोककलाकार व मराठी माणसांनी या बेटावर जोपासून ठेवलेल्या 'दशावतारी लोककलेची मूळ संहिता व तिचे उपासक असे जुने नवे कलाकार मला भेटले. धर्मा गोविंद , देवजी पडीया, सदानंद भिवाजी , पुष्पाजी नारू, बाळशेट गोपाळ, सौ. रत्नाबाय बापू, सदाशिव गोविंद

जगताप, शिवाजी सोनीया, राम माल्लु, रूपसेन देवजी, चंद्रसेन बाप्पूनि इतर  लेखक व कलावंत मंडळी मला भेटली.

'माहेरी गेली' ही आपली एका जाडजूड वहीत रेखीव देखण्या अक्षरात मराठीत लिहिलेली मोरस मराठी कहाणी धर्मा गोविंद यांनी मला वाचायला दिली. धर्मा गोविंद आता पंडित धर्मा गोविंद झाले आहेत. 'महात्मा गांधी संस्थे' तील 'मराठी भाषा पाठ्यपुस्तक मंडळ' विभागात ते काम करतात. मॉरिशस बेटावर ते भारतीय समाजातील धार्मिक विधी व लग्न  सोहळे अधिकृत प्रशिक्षित धर्मपंडित म्हणून पार पाडतात. पन्नाशीत आलेले धर्मा गोविंद यांचे पूर्वज महाराष्ट्रातून शंभर दीडशे वर्षांपूर्वी या बेटावर गेले. काही आठ दहा वर्षांपूर्वी महाराष्ट्र सरकारने मॉरिशस बेटावरील मराठी भाषेच्या  शिक्षकांना पनवेल येथील ' प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालया' त  मराठी शिक्षक प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली होती. त्यावेळी धर्मा गोविंद, देवजी पडीया, सदानंद भिवाजी व अन्य शिक्षक-शिक्षिका महाराष्ट्रात आल्या होत्या. आपल्या पूर्वजांची भूमी त्यांनी भक्तिभावाने पाहिली. आज मॉरिशस बेटावर सरकारमान्य व खासगीरित्या चालविलेल्या सत्तर मराठी शाळा असून  सुमारे शंभर शिक्षकशिक्षिका त्या शाळांतून अध्यापक म्हणून काम करतात. इ.स. १९६४ सालापासून मॉरिशस बेटावरील प्राथमिक शिक्षणक्रमात मराठी भाषेचा, हिंदी, तेलगू, तामीळ, भोजपुरी या भारतीय भाषांबरोबर समावेश करण्यात आला. आता गेली पंधरा वर्षे मॉरिशस बेटावर 'महाराष्ट्र साहित्य परिषद' स्थापन झाली असून तिच्यातर्फे  शनिवारी व रविवारी मराठी भाषेच्या विविध उच्च परीक्षांसाठी खास वर्ग घेतले  जातात.  मॉरिशस आकाशवाणी व दूरदर्शनवर मराठी भाषेचे कार्यक्रम सादर होतात. मॉरिशस बेटावरील मोरस मराठी भाषा त्या भाषेतील बोलणे व लिहिणे, हे एक भाषावास्तव आहे.

'माहेरी गेली' ही धर्मा गोविंद यांची कहाणी मॉरिशस बेटावरील पूर्वेकडील अशा एका दाट व अरण्यग्रस्त काळ्या नदीच्या परिसरात घडते, की ती स्थलकाळपात्रे या संदर्भात समजून घेण्यासाठी मॉरिशस बेटाची भौगोलिक रचना सुबुद्ध वाचकाने समजून घेणे आवश्यक आहे. 'तामारिन बे' किंवा तामारीन किंवा तामार खेडेगावात व ल मोर्ने, शामारेल, बे ज्यूकॅप, या घनदाट व हिंदी महासागराला रूद्रभीषणपणे भिडलेल्या पहाडी भागात धर्मा गोविंद यांच्या कथेतील मराठी पात्रे वावरतात. मराठी माणसे प्रथम बोटी भरभरून जेव्हा ब्रिटिश दलालांनी मॉरिशस बेटावर नेली व त्यांना राहण्यासाठी बेटावरील स्थळांची निवड करण्याची संधी दिली  तेव्हा मराठी मजुरांनी 'काळी नदी' व तिचा पहाडी प्रदेश पसंत केला. त्याचे एक कारण म्हणजे महाराष्ट्रातून आलेल्या या मराठी मंडळींना हा पहाडी विभाग सह्याद्री पर्वतांच्या व भीमाकृष्णा गोदानदीच्या प्रदेशासारखा थेट वाटला. आज या काळ्या नदीच्या प्रदेशात त्यावेळचे मराठी समाजाचे नेते व द्रष्टे कै. लक्ष्मणराव व सौ भागीरथीबाई पवार यांनी बांधलेले 'विठोबा रखुमाई' चे देऊळ ऐंशी वर्षे उभे आहे धर्मा गोविंद या परिसरातील मराठी माणसाच्या जीवनाशी 'जो होय एक सुखदुःखपणी गडी तो' असे समरस झालेले आहेत या बेटावरील कष्टकरी, कामकारी खेडूत मराठी स्त्रीपुरुषांची, तरुण-तरुणीची अद्‌भुत कहाणी धर्मा गोविंद यांनी आपल्या अद्‌भुत व अभिजात मोरस मराठी भाषेत  सजीव साकार केली आहे  'माहेरी गेली' या कथेतील काहीसे गूढ अद्‌भूत व अमूर्त  वातावरण धर्मा गोविंद थेट नेऊन मानवी सुखदुःखाच्या आंतरिक पण अनाकलनीय वास्तवाला विलक्षण प्रत्ययकारिकतेने व कलात्मकतेने नेऊन  भिडवितात. हजारो मैलावरच्या हिंदी महासागराच्या पोटातून कधीकाळी प्रचंड भूकंप होऊन जलपृष्ठावर आलेल्या  मॉरिशस बेट नावाच्या इवल्याशा भूखंडावर वावरणारी ही कष्टकारी माणसे एका आपल्या भूत, वर्तमान  व भविष्यकालीन भवितव्याशी  जशी निगडित  आहेत तशीच एका विशिष्ट समाजरचनेतही त्यांचे सामाजिक, मानसिक  व आत्मिक पोषण झाले आहे. तशातही जातपात

अनुक्रमणिका

टिकून राहते पण तिला छेद मिळत जातो. धर्मा गोविंद यांनी केलेला मोरस मराठी समाजातील लोकगीताचा वापर त्यांच्या कहाणीला उत्कट भावनिक परिमाणे प्राप्त करून देतो. खरोखर डॉ सुरेन्द्र बारलिंगे यांनी ही कहाणी ‘महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा’ तर्फे प्रकाशित करून मोरस मराठी भाषेला व मोरस मराठी माणसाला सांस्कृतिक व साहित्यिक उत्थापन दिले आहे.

***प्र.श्री.नेरूरकर***

अनुक्रमणिका

**महादू**

अनुक्रमणिका

# महादू

[हा प्रसंग खेडे गावात घडलेला आहे महादू नावाचा शेतकरी हा श्रीधर सेठ नावांच्या एका श्रीमंताच्या घरात येऊन राहतो कारण त्याचे घर नदीकाठी असल्यामुळे पुराचे पाणी व चिखळ शिरल्यामुळे श्रीधरने त्याला काही दिवसासाठी त्याचे जुणे घर राहण्यासाठी दिले. पोळ्याच्या दिवशी श्रीधर सेठची मुले सर्कस पाहाण्यासाठी जाऊ इच्छितात व श्रीधर महादूकडे येतो व त्याच्या बैलगाडीतून त्यांच्या मुलांना चार मैलावर असलेल्या रेल्वे स्टेशनावर जाऊन सोडण्यास सांगतो; परंतु महादू साफ नाकारतो, कारण पोळ्याचा दिवशी शेतकरी आपल्या बैलाना गाडीला जुंपत नाहीत; उलट बैलांना आंघोळ घालतात, सजवतात, रंगवतात व देवाप्रमाणे त्यांची पूजा करतात मग पुरणपोळी खायला घालतात.

महादू आपल्या घरात राहून सुद्धा आपल्याला नाकार देतो म्हणून रागाच्या भरात श्रीधर चरफडून निघून जातात. थोड्या वेळाने महादूचा परम मित्र विश्वनाथाला त्याच्या बैलाने त्याच्या मांडीत शिंग मारले त्याला डॉक्टराकडे नेणे फार अगत्याचे असल्यामुळे महादूने आपल्याच बैलगाडीतून गावापासून पाच मैलावर असलेल्या डॉक्टर परांजप्यांच्या दवाखान्यात नेऊन दाखल केले. परत येताना वाटेत श्रीधरसेठ भेटतात. महादू त्यांना गाडीत बसावयास विनंती करतात. परंतू ते काही बसत नाहीत उलट रागाच्या भरात त्याला पाहतात व म्हणतात. "संध्याकाळी पाहून घेणार तू किती पाण्यात आहेत" तोवर महादू काही न सांगता घरी पुढे काय घडते ते पाहू या.]

[पडदा बाजूला होताच महादू बैलांच्या वेसणाला रंग देताना दिसतात.
नंतर आपल्या बायकोला हाक मारतो]

**महादू** : सारू अग सारजा. [तरी हाक येत नाही] मोठ्याने सारू अग सारजा [स्वगत] काय माणूस आहे. [विमल प्रवेश करून]

**विमल** : आई पडवीत आहे. ती हैबतीला व दौलतीला आंघोळ घालीत आहे. काय म्हणता? आईला बोलावून आणू का ?

**महादू** : नको नको. बैलाचे पाणी तयार झाले का? हेच विचारायचे होते.राहू दे. विकास कोठे आहे?

**विमल** : विकास सुद्धा आईबरोबर आहे. तो आईला मदत करण्यासाठी गेला आहे. त्याला बोलावून आणू का?

**महादू** : राहू दे; गोंद जरा घट्ट झाला आहे थोडे पाणी घेऊन ये.

**विमल** : आणते बाबा (ती आत ताजे व पाणी घेऊन येते ) हे घ्या बाबा पाणी.

**महादू** : थोडे ओत यात. गोंद पातळ झाला नाहीतर वेसणी काही रंगीत दिसणार नाही. आजच्या मिरवणूकीत आपले बैल व वेसणी ऐनेदार पाहिजेत, नाही का विमल?

अनुक्रमणिका

**विमल** : बाबा आजच्या दिवशी बैलांना कशासाठी ऊन पाण्याने आंघोळ घालतात, त्याना रंगवतात, सजवतात. आई म्हणते त्यांना ओवालणारा सुद्धा.

**महादू** : अग माझी आजीसाहेबा आज पोळा आहै. पोळा म्हणजे बैलांचा सण. पोळ्याच्या दिवशी बैलांना काम करवायचे नसते. आज आपण त्यांची देवाप्रमाणे पूजा करू व त्यांना पुरणपोळ्या जेवायला घालू

**विमल** : [हसून] पूजा! अन पूजा तर देवाची करावी असे तुम्हीच सांगताना! मग बैलांची पूजा कराल.

**महादू** : होय विमल, बैलाचीच पूजा करू. बैल हे शेतकऱ्यांचे दैवत असतात. आपले संसार बैलाच्या जीवावर चालते. बिचारे वर्षभर मरमर काम करतात. त्यांना वर्षातून आजचाच दिवस सुटी असते.

**विमल** : मग इतर दिवशी कशाला सुटी नाही देत त्यांना रविवारीतर काम करीत नाही ते . मग असते की सुटी त्यांना आठवड्यातून एकदा.

**महादू** : ती तर असतेच. परंतू पोळ्याचा सण, हा त्यांचा हक्काचा सण, समजलीस आजचा दिवस त्यांना दुखावायला नको . छळायला नको. बरे जाऊन विकासाला बोलावून आण त्याला वामणरावाकडे आरसे आणायला पाठविणार आहे. जा लवकर जा.

**विमल** : जाते बाबा. सांगते त्याला यायला.

**महादू** : विकासला इकडे पाठव अन् तू आईला मदत कर.

**विमल** : होय बाबा पाठवते विकासला. [जाते]

[महादू स्वतःशी बोलतो]

**महादू** : हे वेसण माझ्या दौलतीसाठी; अन हे माझ्या हैबतीसाठी. लोकांची दृष्ट लागली पाहिजे. लोकांचे डोळे खिळून राहिले पाहिजे माझ्या बैलांवर. त्यांना पुन्हा मागच्या वर्षाप्रमाणे प्रथम आले आले पाहिजे. पाहिजे कशाला येतीलच.

**विकास** : [प्रवेश करुन] बाबा तुम्ही मला बोलावलात. वेसणी तर छान दिसत आहेत नाही का ?

**महादू** : मग! सुंदर असलीच पाहिजेत. बर तुला एक काम सांगतो करतोस का ?

**विकास** : सांगा ना बाबा काय काम आहे ते ?

अनुक्रमणिका

**महादू** : जरा वामणरावाकडे जा झुळीत घालण्यासाठी आरसे आहेत त्यांच्याकडे. जा लवकर घेऊन ये.

**विकास** : पण बाबा मला त्यांच्याकडे जायला भिती वाटते.

**महादू** : का रे ! कशाची भिती वाटते आहे. अहं. त्याची कशाची भिती ते वाघ थोडेच आहेत.

**विकास** : भिती म्हणजे त्यांची नाही.

**महादू** : मग !

**विकास** : त्यांच्या कुत्र्यांची भिती वाटते. परवाच्या दिवशी शाळेतून येताना त्या कुत्र्याने मला चावले असते.

**महादू** : हे बघ हातात एक काठी घे. मात्र कुत्र्याला मारू नकोस आला की त्याला भिती दाखव, रस्त्यावरूनच हाक मार. अंगणात जाऊ नकोस त्याच्या.

**विकास** : होय बाबा जातो [ निघून जातो. सारजाबाई प्रवेश करते ]

**सारजाबाई** : अहो आणखी किती वेळ घेणार. बैलांना सजवणार की नुसती वेसणी रंगवीत बसणार.

**महादू** : हा आलोच की आंघोळ घालून झाले.

**सारजाबाई** : केव्हाच. आता जाताना त्यांना सजवायला.

**महादू** : हो जातोच की, ती वासिंगे कुठे आहेत. काढ पूरण पोळ्या सर्व तयार कर. ओवाळणीसाठी सर्व जिन्नस तयार ठेव. रामा कदमने बैलांची मातीची मूर्ती आणली का? झुळी घेऊन जातो.

**सारजाबाई** : वासिंगे पडवी जवळ ठेवली आहे. सकाळीच राम कदम मूर्ती सोडून गेले ओवाळणीची सर्व तयारी झाली आहे. पुरणपोळ्या पण लवकरच होतील. पिठाचा अुंडा करून ठेवला आहे. अर्धा-पाऊन तासात तयार होतील त्या.

**महादू** : ठीक आहे. जातो मी पडवीत हा ! आटपा आता. मिरवणूकीची वेळ होत आली बघ.

**सारजाबाई** : विमलाला पाठवून ध्या. पोळ्या लाथायला मदत होतील तितक्या

**महादू** : बरं पाठवून देतो [ निघून वातो ] [ सारजाबाई स्टोव पेटवण्यासाठी जाते, पेटवते व पिठाचा अुंडा घेते ] विमला प्रवेश करते.

अनुक्रमणिका

**सारजाबाई :** ये पोरी आपण पुरणपोळ्या लाटू. जा तवा घेउन ये तवा स्टोवर घालणार.

**विमल :** आई पुरळपोळ्या नुसते बैलच खातील; की आपण सुद्धा खावू.

**सारजाबाई :** आपणसुद्धा खाऊ , परंतू आधी बैलांना जेवायला घालू नंतर आपण खाऊ.

**विमल :** आई बैलांना पुरणपोळ्यांची चव समजणार का ?

**सारजाबाई :** कशाला समजणार नाही. जा बघ फळीवर मातीचे बैल आहेत दोन नेऊन देवाजवळ सावकास ठेव.

**विमल :** आपण त्यांची पूजा करूया ना. बाबा म्हणत होते मघाशी

**सारजाबाई :** बरं नेऊन ठेव [ ती जाते ] विकास आरसे घेऊन प्रवेश करतो.

**विकास :** आई बाबा कोठे आहेत.

**सारजाबाई :** बाबा पडवीत आहेत. वामणरावाकडे गेला होतास का ?

**विकास :** होय आई आरसे घ्यायला गेलो होतो.

**सारजाबाई :** आज कुत्र्यांची भिती वाटली नाही तुला.

**विकास :** नाही काठी होती की जवळ. बाबानी सागितले काठी घे बरोबर परंतू कुत्र्याला मारुबिरू नकोस.

**सारजाबाई :** मग मारलस नाहीस ना.

**विकास :** नाही. वामणराव दारातच होते. कुत्रा आलाच नाही पुढे.

**सारजाबाई :** बरे जाऊन दे आरसे त्यांना. बघ झुली नेले नसतील तर घेऊन जा.

**विकास :** [ पाहून ] झुली नाहीत आई [विमल प्रवेश करते]

**विमल :** आई ठेवले बैल देवाजवळ. छान आहेत ते.

**सारजाबाई :** बरं कळसी घे व नळावरून पाणी घेऊन ये जरा. आणखी दोन पोळ्या उरल्या आहेत.

**विमल :** होय आई जाते. [ तोच पुढच्या दारावरून हाक ऐकू येते. महादू अरे हो महादू ]

अनुक्रमणिका

**सारजाबाई :** विमल जरा बघ तर कोण आले आहे.

**विमल :** बघते आई, [ ती दाराशी जाते ] आपण या या.
[ श्रीधरसेठ प्रवेश करून ]

**श्रीधरसेठ :** तुझे बाबा घरी आहेत का.

**विमल :** होय घरीच आहेत. पडवीत बैलांना सजवीत आहेत.

**सारजाबाई :** [ हाक मारीत ] विमल कोण आहेत.

**विमल :** आपले मालक आहेत आई. [श्रीधरसेठकडे पाहून ] बसा ना. बाबाना बोलावून आणते. [ सारजाबाई घाईघाईने पोळ्या उचलते, ठेवते व डोक्यावर पदर घेत येते व मालकाना नमस्कार करते ]

**सारजाबाई :** काही कामे निघाली का मालकांची. गरीबाच्या घरी येउन घर पावन केलात.

**श्रीधरसेठ :** पाहायला गेल तर काम काही विशेष नाही. मुलांना आलीबागला जायचे आहे. सर्कस पाहायला. मोटार बंद पडली आहे म्हणून महादूना त्यांना स्टेशनावर सोडून यायला म्हणतो.

**सारजाबाई :** आज ! पोळ्याच्या दिवशी गाडीतून

**श्रीधरसेठ :** होय इतर गाडीवान जायला तयार नाहीत म्हणून.

**सारजाबाई :** विमल जा , जरा बाबाना बोलावून आण पाहू [विमला जाते]

**श्रीधरसेठ :** पुरातील पाणी व चिखल मला तुमच्या घरात मला पाहवले नाहीत. म्हणून महादूला म्हटले तुझे घर पूर्ण सुखेपर्यंत माझा घरात आनंदाने राहा. महिना दोन महिने राहिले तरी माझे काही बिघडत नाही घर तर रिकामेच होते. काही गैर सोय होत नाही ना.

**सारजाबाई :** मालक आपले फार उपकार आहे. आमच्यावर.

**श्रीधरसेठ :** यात उपकार कसले. ते तर माझे कर्तव्य होते. [तोच महादू प्रवेश करतो.]

**महादू :** मालक आपले पाऊल गरिबाच्या घराला लागून पवित्र झाले. आम्ही धन्य झालो [सारजाबाईकडे वळून] जा मुलांना बाकीचे सजवायच्या कामात मदत कर. मी आलो इतक्यात. मिरवणूकीची वेळ झाली आहे. काही काम निघाले मालक . हा सेवक आपल्यासाठी काय करू इच्छितो.

अनुक्रमणिका

**श्रीधरसेठ** : महादू तुझे बैल सजवून घे  नंतर माझे काम सांगणार माझें काम काही मोठे नाही तुझ्या बैलांच्या  मिरवणूकीत अडथळा येऊ नये. जातो. नंतर येईन.

**महादू** : मालक आपले काम काय ते सांगा ना. आपण आमच्यावर  इतके उपकार केला. स्वतःचे जुणे घर  आम्हांला रहायला दिला. संकटाच्यावेळी आम्हाला उपयोगी पडला आता आपली सेवा करायला  संधी तरी  द्या. तसा मी मोकलाच आहे.

**श्रीधरसेठ** : महादू मोकलाच आहेस म्हणून आलो. परंतू बैलांची मिरवणूक होऊन जाऊ दे. नंतर माझे काम  कर. बैलांच्या शर्यतीत मला तुझे सजवलेले बैल पहायचे आहे. देवापुढे तुझे सजवलेले बैल मलाच  नाहीतर गावकरयांना सुद्धा पाहायचें आहे.

**महादू** : मालक ते सर्व तर पाहाल. परंतु काम काय ते सांगाना कमीत कमी मला आपले  उपयोगी पडू द्या.  तसा मी काही मोकळा नसतो. सकाळचा तारा उगवला की माझा दिवस सुरू होतो व सूर्य कळतीला  ढळला की माझे बैल गाडीतून मोकले होतात न माझे काम संपते.

**श्रीधरसेठ** : म्हणत आहेस म्हणून सांगतो, माझी मुले जरा आलीबागला सर्कस पाहायला जाऊ इच्छित आहेत  म्हणून आलो तुला पहायला.

**महादू** : आपली मुले सर्कस पाहायला जातील. उत्तम मी त्यांना मोटारीतून सोबत करू का, अथवा स्टेशनावर  त्यांना आगगाडीत बसवू का. सांगा आपले काम करायला तयार आहे.

**श्रीधरसेठ** : मोटार सद्या बंद पडली आहे. म्हणून पंचाईत झाली आहे. अबदुलाचा टांगा पण सकाळीच  निघाला आहे तो दुपारी तीनला येणार म्हणून तर मी तुझ्याकडे आलो आता तुच माझ्या मुलांना  स्टेशनावर नेऊन सोडू शकतोस.

**महादू** : ते तर ठीक आहे. परंतू कशातून ?

**श्रीधरसेठ** : म्हणत होतो. जर तुझ्या बैलागाडीतून मुलांना स्टेशन पर्यंत फक्त सोडून  आला असतास तर.

**महादू** : बैलगाडीतून ? हे कसे शक्य आहे.आज पोळा आहे.  हे आपल्याला माहिती आहे ना.

**श्रीधरसेठ** : माहीत आहे महादू माहीत आहे. तरी इतकेसे काम, माझे, तू करु शकशील म्हणून आलो पाहायला.

**महादू** : मालक आजचा दिवस काय तो आपल्याला माहीत आहे. वेळ प्रसंगी शेतकरी स्वतः आपली  मान जू  ला लावणार व गाडी ओढणार परंतू तो  कोणत्याही किंमतीवर आपल्या बैलांना गाडीला जोडणार  नाही. हें माहीत असून सुद्धा आपण मला पाहायला आला.

अनुक्रमणिका

**श्रीधरसेठ** : गावातील इतर गाडीवान जायला नाहीत नाहीतर तुला पाहायला आलो नसतो. एक जरी जायला तयार झाला असता तर मी तुला त्रास द्यायला आलो नसतो.

**महादू** : मालक आपण शेतकऱ्याचे मन अजून ओळखत नाही. तो जातीने जरी गरीब असतो तरी मनाने गरीब नसतो. आजचा दिवस जरी त्याच्या घरी खायला नसेल तरी तो आनंदाने उपाशी राहणार. रात्री तो स्वतः पाणी पिणार व आपल्या मुलांना पाणी पाजून निजवणार परंतू पोळ्याच्या दिवशी तो आपल्या बैलाला गाडीला कधीहि जोडणार नाही.

**श्रीधरसेठ** : ते मला माहीत आहे महादू. तरीपण जर माझे हे लहानसे काम जर केला असतास तर काय बिघडल असतं. महादू तुला खर सांगतो जर इतर जायला तयार असते. तर मी मुळीच तुझ्याकडे आलो नसतो. खर सांगतो आलो नसतो.

**महादू** : मालक आजचा दिवस मीच तो काय, किंवा या गावातील शेतकरी काय जरी संबंध महाराष्ट्रात फिरून आला तरी कोणताही शेतकरी आपल्या बैलांना गाडीला जोडणार नाही. ज्या बैलांच्या जीवावर आमचे संसार त्यांना आजच्या दिवशी आम्ही कष्ट करायला लावीत नाही.

**श्रीधरसेठ** : महादू मला सर्व समजते, सर्व कळते, तरी माझे हे लहानसे काम करायला तुझ्या बैलाना किती कष्ट पडतील उद्या त्यांना कष्ट करावे लागणार की नाही. मनावर घेतलास तर करू शकशील.

**महादू** : मालक उद्या वाटल्यास तर सबंध दिवस तुमच्यासाठी खपू शकणार. जरी डोंगर पोखरून उंदीर काढायला लावला तरी ते काम आनंदाने हसत हसत करणार परंतू आजच्या दिवशी मी माझ्या बैलांना गाडीला लावू शकणार नाही. मला अती दुखाने सांगावे लागत आहे की माझ्याने तुमच्या मुलांना स्टेशनावर सोडता येणार नाही.

**श्रीधरसेठ** : महादू माझे हे लहानसे काम करु शकणार नाही मला तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती. माझे हे उपकाराचे चांगले फळ देतोस.

**महादू** : मालक आपण माझ्यावर उपकार केलाहेत हे मला पूर्णपणे माहीत आहे. तुमचे हे उपकार मला जन्मभर फेडता येणार नाही हे सुद्धा ओळखून आहे परंतू आजच्या दिवशी माझ्यासारख्या एकनिष्ठ शेतकऱ्याचा अंत पाहू नका. माझी आपल्याशी हीच विनंती आहे. हीच विनंती आहे.

**श्रीधरसेठ** : महादू मी तुझा अंत पाहतो. हे काय म्हणतोस ? मघाशी माझी सेवा करायची संधी मिळाली म्हणून उताविळ झाला होतास अन् आता म्हणतोस की तुझ्या सारख्या शेतकऱ्याचा अंत पाहु यात काय अंत पाहतो आहे.

अनुक्रमणिका

**महादू** : मालक आपले काम करायला मी नेहमी तत्पर आहे. परंतू माझ्या बैलांचा संबंध यात कुठून येतो चला तुमच्या मुलाची तयारी असेल तर मी ऐकेकाला माझ्या खांद्यावर वाहून स्टेशनाला पोहचवून येतो. परंतु माझ्या बैलांना गाडीला जुंपायला सांगायला स्वर्गातून इंद्र जरी आला तरी मी नाकार देणार मालक माझ्याने हे होणार नाही. क्षमा करा [विकास प्रवेश करतो] [मालक निघण्याच्या बेतात असतात]

**विकास** : बाबा वेळ झाली की. गावातील इतर शेतकरी आपापल्या बैलांना घेऊन देवाळासमोर जात आहेत. चला ना बाबा. नाहीतर उशीर होणार फक्त आम्ही मागे राहिलो आहोत.

**महादू** : हो विकास येतो ना. तुझ्या आईला बोलावून आण.

**विकास** : हो बाबा [ जातो]

**श्रीधरसेठ** : मग नाहीना जात महादू. नाही ना.

**महादू** : क्षमा करा मालक. आजच्यासाठी क्षमा करा.

**श्रीधरसेठ** : ठीक आहे. जातो हा नाकार फार महाग पडेल तुला.
[रागा रागाने निघून जातात] सारजाबाई प्रवेश करते.

**सारजाबाई** : काय हो काय झाले. [मालक रागारागाने जात आहेत नाकार दिला म्हणून]

**महादू** : रागावू दे, त्याला मी काय करू. ह्या श्रीमंताना शेतकऱ्यांचे हृदय केव्हा कळणार माणूस धनाच्या जोरावर किती गर्विष्ठ होतो. माहित आहे जाताना काय म्हणाले ?

**सारजाबाई** : काय म्हणाले ?

**महादू** : म्हणे मी त्यांना दिलेला नाकार फार महाग पडेल.

**सारजाबाई** : असे म्हणाले.

**महादू** : होय.

**सारजाबाई** : मग आपल्याला जायला हवे होते.

**महादू** : काय जायला हवं होते. त्यांच्या मुलांना आलीबागला जाऊन सर्कस पाहायचे आहे. अन् इकडे इतका मोठा पोळ्याचा सण. इकडे त्यांचे मन रमत नाही. गावातील बैलांची शर्यत त्यांना आवडत नाही. त्यांच्या मिरवणूका पसंत पडत नाही धनाची धुंदी आहे.

अनुक्रमणिका

**सारजाबाई** : म्हणून म्हणते, त्यानी एखाद्या वेळी घरातून निघून जायला सांगितले तर. मग काय करू.

**महादू** : काय करू ? जाऊ आपल्या घरात आणखी काय ?

**सारजाबाई** : परंतू आपले घर तर अजून वाळले नाही. अजून जमीन भिजलेली आहे.

**महादू** : राहू त्यातच. आपल्याला काही मरण येणार नाही. होतो नाही का पुरानंतर दोन दिवस [तोच विमल प्रवेश करते व घाई घाईने म्हणते]

**विमल** : बाबा-बाबा विश्वनाथ काकाना बैलानी मारले. बंदू नानाच्या बैलाने मारले. बैलाचा एक शींग त्यांच्या पोटात शिरले म्हणतात. खूप रक्त निघत आहे.

**महादू** : विश्वनाथ काका कोठे होते. त्याला बैलाने कसे मारले.

**विमल** : विश्वनाथ काका आपल्या बैलांना सजवून देवळापुढे नेत होते. तिकडून बंदूनामा आपल्या बैलांना घेऊन येत होते. इतक्यात ते बैल त्यांच्यावर एकदम धावत आले. एका बैलाने त्याच्या पोटातच मारले.

**महादू** : विमल ही वेसणी घेऊन पडवी जवळ चल. मी येतो बैलांना गाडीत जुंपायला चल घाई कर.

**सारजाबाई** : बैलांना गाडीत जुंपणार कशासाठी

**महादू** : कशासाठी हे पण सांगायला हवे आहे. विश्वनाथला डॉक्टरांकडे न्यायला नको काय? आज पोळा आहे इतर शेतकरी जाणार नाहीत.

**सारजाबाई** : अन् मालकांना कळले तर काय म्हणतील.

**महादू** : वाटेल ते म्हणतील. आता त्याला मला इलाच नाही. बैलांची पूजा करू घे मला उशीर झालें तर देवाला नैवेध दाखवून मुलांसह जेवून घे.

**सारजाबाई** : बरं या सावकास जा. तो विकास तिकडेच धावत गेला आहे. त्याला घरी पाठवून द्या. [जातो] [विमल प्रवेश करते]

**विमल** : आई मला हाक मारलीस.

**सारजाबाई** : तुला नाही ग. तो विकास देवळाकडे गेला आहे. जा त्याला बोलावून लवकर त्याला घेऊन ये मी जरा विश्वनाथ कांकूकडे जाईन जा लवकर.
[ती जाते] [आई काही पुरणपोळ्या काढून ठेवते]

अनुक्रमणिका

**सारजाबाई :** (स्वगत) हे देवा ! विश्वनाथांना काही बरे वाईट होऊ नये
[विकास प्रवेश करतो]

**विकास :** आई कशाला हाक मारलीस.

**सारजाबाई :** विकास तुझे बाबा गेले.

**विकास :** हो आई; आतापर्यंत खूप दूर निघाले असतील.

**सारजाबाई :** बरे. मी जरा विश्वानाथ काकूंकडे जाऊन येते. ती विमल कोठे आहे. तिला पाठवले तुला पाहायला. तू आलास परंतू ती कोठे रमली.

**विकास :** ती देवळाजवळ आहे. बैलांची शर्यत लागणार होती. माहीत नाही आता शर्यत लागणार की नाही.

**सारजाबाई :** बरं तू घरी राहा. मी तिला पाठवते घरी ती आली की मग पुरणपोळ्या ठेवल्या आहेत. त्या घेऊन दोघांनी खा.

**विकास :** आई पूजा करून मग पोळ्या खायचे ना ग. मग पूजा केल्याशिवाय कसा खाऊ.

**सारजाबाई :** विकास तुझे बाबा ज्या कामासाठी निघालेत ते काम देवाच्या पुजेपेक्षा महान आहे, म्हणून त्यातच आपली पूजा देवाला पोहोचली. समजलास.

**विकास :** आई यात पूजा कशी झाली. मला तर काहीच समजत नाही.

**सारजाबाई :** विकास देव सर्व व्यापी आहे. देव सर्वांच्या मनात आहे तुझे बाबा विश्वनाथ काकांना डॉक्टरांकडे नेले. जेव्हा आपण एकमेकांना उपयोगी पडतो संकटात दुसऱ्यांना मदत करतो. चांगले माणूस म्हणून माणूसकीचे कर्तव्य करतो, तेव्हाच देव प्रसन्न होतो. फक्त देवासमोर डोके आपटून नाही.

**विकास :** आई तुझे म्हणणे खरे आहे. बरं जा नाहीतर तुला उशीर होणार [विमल प्रवेश करते] ही विमल पण आली. जा आई लवकर.

**विमल :** दादा आई कोठे निघाली [आईकडे पाहून] आई देवळाजवळ जातेस का ? बैलाची शर्यत लागणार नाही. विश्वनाथ काकांना लागलं ना म्हणून. पाटील म्हणत होते बाबा नाहीत म्हणून शर्यत लागणार नाही.

**सारजाबाई :** मी जरा विश्वनाथकाकूंकडे जाऊन येते. आता काही कोठे जाऊ नकोस. जेऊन घ्या आता. [ती जाते]

अनुक्रमणिका

**विमल** : दादा तुला एक सांगू का ?

**विकास** : सांग. काय सांगायचे तुला.

**विमल** : विश्वनाथकाका वाचतील ना. त्यांना काही होणार नाही ना.

**विकास** : नाही विमल. देव वाचवणार त्यांना. बाबा आहेत की बरोबर.

**विमल** : दादा चल देवापाशी विश्वनाथकाकांसाठी पूजा करू [दोघे जातात. देवासमोर हात जोडून प्रार्थना करतात.] हे देवा विश्वनाथ काकांचा जीव वाचवा. ते फार चांगले आहेत. त्यांची मुले अजून लहान आहेत. त्यांच्यावर दया करा. देवा काकांना बरे वाटू द्या. आमची प्रार्थना स्विकार करा [तोच बाबा प्रवेश करतात]

**बाबा** : विमल, विकास काय करीत आहात? आई कोठे ?

**विमल** : बाबा आपण आलात सुद्धा. इतकं लवकर. विश्वनाथ काका कसे आहेत. ते बरे आहेत ना.

**विकास** : सांगा ना बाबा. ते बरे आहेत ना. आम्ही त्यांच्यासाठी देवापाशी प्रार्थना करीत होतो. ते कसे आहेत.

**बाबा** : [निस्वास सोडूव हळू आवाजात ] मी आलो तेव्हा ते शुद्धीवर नव्हते. खूप रक्त निघाल्यामुळे ते खूप अशक्त झाले आहेत. परंतु ते वाचतील हो. तुमची प्रार्थना देवाला पोहोचली असावी. गावातील सर्व लोक तुमच्याप्रमाणे प्रार्थना जर करतील तर ते जरूर वाचतील.

**विमल** : परंतू बाबा आपण इतकं लवकर कसे फिरलात. स्टेशनला जायला एक तास लागतात मग तुम्ही एका तासात परत फिरून आलासुद्धा.

**बाबा** : हो विमल. विश्वनाथकाकांचे नशीब मोठे आहे. आपले डॉक्टर रिघे, आमच्या गावी बैलांची शर्यत पाहायला, आपले कॉलेक्टर साहेबाबरोबर येत होते. रस्त्यात मी त्यांना थांबवले. मग त्यानी त्याच मोटारीत त्यांना रुग्णालयात नेले. आता तितकी काळजी नाही.

**विकास** : मग आता रुग्णालयात काकांबरोबर कोण राहणार.

**बाबा** : मी जाणार होतो परंतू डॉक्टराने सांगितले की काही काळजी करायला नको. रुग्णालयात त्यांना खूप उपचार केला जाईल. नर्स जवळच राहतील.

**विमल** : मग ते कसे आहेत हे आपल्या कसे कळणार ?

अनुक्रमणिका

**बाबा** : त्याची तू काळजी घेऊ नकोस. डॉक्टर संध्याकाळी पाटलांकडे येतील तेव्हा सांगतील. तुमचे जेवण झाले का? या अजुन व्हायचे आहे.

**विकास** : जेऊ ना बाबा. आई आली की जेऊ.

**बाबा** : बरं बरं. ती आलीच मला वाटते. कोणाशी तरी बोलत आहे बाहेर [आई प्रवेश करते]

**सारजाबाई** : अहा आलात कसे काय आहेत ते?

**बाबा** : डॉक्टरांबरोबर गेले ते . आता काळजी करायची नाही. संध्याकाळी डॉक्टर येतील तेव्हा कळेल.

**सारजाबाई** : बरं ! देवा ते लवकरच लवकर बरं होवा [मुलांकडे पाहुन] तुमचे जेवण झाले की अजुन व्हायचे आहे.

**बाबा** : आपल्या सर्वानाच जेवायचे आहे चला आपण ताटावर बसू.

**सारजाबाई** : विमल, विकास. चला बसा ताटावर [सारे जातात व जेवावयास ताटावर बसतात. महादूचा पहिला घास तोंडात जातो तोच बाहेरून हाक ऐकू येतो.] [ते ताटावरून उटतात व बाहेर जाऊ पाहतात. श्रीधरसेठ प्रवेश करतात] सर्व बाजूच्या खोलीत जातात]

**श्रीधरसेठ** : का रे महादू बैलांना गाडीला लावणार नव्हतास ना इंद्रदेव स्वर्गातून आला होता का बोलायला इतकी ऐट नाही हो बरी. अखेर बैलांना गाडीला जुंपलास ना! सांग

**महादू** : परंतू मालक ……………………………………

**श्रीधरसेठ** : परंतू विरंतू काही नाही. माझ्या मुलांना स्टेशनवर न्यायला बैल जुंपलास नाहीस . वरून फुसारकी मारलास म्हणे. तुमच्या मुलांची तयारी असेल तर त्यांना खांद्यावर वाहून नेईन, मग त्या विश्वनाथाला कशाला खांद्यावर नेलास नाही. बैलगाडीतून कशाला नेलास.

**महादू** : विश्वनाथाचा जीव धोक्यात होता. त्यांना डॉक्टराकडे नेणे फार जरूरीचे होते. गावातील इतर लोक गेले नसते म्हणून मला जाणे भाग पडले. त्यात विश्वनाथाचा जिवाचा प्रश्न होता.

**श्रीधरसेठ** : वा रे वा ! विश्वनाथाचा जिवाचा प्रश्न तुला दिसला माझ्या घरात रहात असताना माझा प्रश्न तुला दिसला नाही छान! उत्तम याला म्हणतात उपकाराची परत फेड.

अनुक्रमणिका

**महादू** : परंतू मालक विश्वनाथाला दोन लहान मुले आहेत. घरात म्हातारे बाप व म्हातारी आई आहे. त्याच्या जिवाला काही बरे वाईट झाले तर ते माझ्याने पाहवले नसते.

**श्रीधरसेठ** : ते तर ठीक आहे. परंतू तुझे हे. उतावीळपणा आता माझ्याने पाहवणार नाही. समजलास. अन् मी कशासाठी आलो आहे माहित आहे का?

**महादू** : मालक तुम्ही माझ्यावर रागावला आहात ते मला माहित आहे. वाटल्यास तर उद्या संबंधदिवस तुमच्या शेतात खपतो. परंतू विश्वनाथाच्या बाबतीत हा महादू नाही तर एका कर्तव्यनिष्ठ माणसाने आपले मानवाप्रती कर्तव्य केले यात तुमचे काय मत आहे.

**श्रीधरसेठ** : यात माझे काय मत आहे. मी जेव्हा तुला माझे घर राहण्यासाठी दिले होते त्यात माणूसकी नव्हती! फक्त तुलाच तितके कर्तव्य समजते. आम्हाला जणू देवाने अक्कल दिलीच नाही.

**महादू** : हा धडा तर मी तुमच्याचकडून शिकलो. फार महान आहात तुम्ही. ह्रदय आहे आपल्याला.

**श्रीधरसेठ** : परंतू आता जे काय सांगणार आहे ते ऐकण्यासाठी तुझे ह्रदय तयार ठेव.

**महादू** : आपण जे सांगाल ते चांगलेच असणार.

**श्रीधरसेठ** : माझे हे घर मला आताच्या आताच पाहिजे समजलास. आताच्या आता पाहिजे. अन् याच वेळेला माझ्या घरात राहून माझ्या उपयोगी न पडल्याची मजा तरी चाख . पाहतोस काय?

**महादू** : मालक हे काय सांगता आपण.

**श्रीधरसेठ** : जे सांगितले ते ऐकत नाहीस मग भोग आता त्याचे फळ. मला हे घर आताच पाहिजे. बघतोस काय? हालव आपले सामान आता. चल आवड एकादाचा. मला तुझ्याकडे वेळ घालवायचे नाही.

**महादू** : मालक हे खरोखर सांगता आहांत का?

**श्रीधरसेठ** : मग काय मी तुझ्याशी थट्टा मस्करी करायला आलो आहे का?[ श्रीधरसेठ टक लावून पाहतात.]

**महादू** : मग ठीक आहे. एका तासात तुमचे घर तुम्हांला परत करतो. तोपर्यत तरी माझ्या कृपा करा [तो आपल्या बायकोला हाक मारतो ] सारू ... ..... सारजा ऐकतेस का?

**सारजाबाई** : होय आले [येऊन ] काय म्हणता ?

अनुक्रमणिका

**महादू** : आपल्याला एका तासाच्या आतोआत हे घर रिकामे केले पाहिजे. चल तयारीला लाग. मुले कोठें मुलांना हाक मार. काय बघतेस त्यांना.

**सारजाबाई** : [मालकाकडे पाहत] मालक हे काय पाहते मी कोठे जाऊ आम्ही या वेळेला. आमच्या घरात अजून जमीन काही सुकली नाहीत. निदान आठ दिवस तरी.

**श्रीधरसेठ** : मालकाशी माजोरीपणा केले की त्याचे फळ भोगावे लागते. आता भोगा त्याचे फळ . मी आता काय करू.

**महादू** : सारू तू कशाला दयेची भीक मागतेस. मी कधीही त्याच्यापाशी दयेची भीक मागितली नाही. तू कशाला मागतेस. त्यानी आपण होऊन आम्हाला हे घर राहायला दिले होते, अन् आता आपण होऊन घेत आहेत आपण ठरलो शेतकरी म्हणून आपल्याला सर्व भोगावे लागणार. चल मुलांना हाक मार. आपल्याला हे घर सोडायचे आहे एका तासात.

**सारजाबाई** : विमल, विकास या. सामान गोळा करायला मदत करा. विमल.

**विमल** : आई विकास बाहेर गेला आहे. पाटील टांग्यातून आले व एक मोटार सुद्धा आली आहे म्हणून तो पाहायला गेला आहे. तो येईल इतक्यात.

**महादू** : बरं तू गजानन्द काकांना आमचे बैल व आमची गाडी आमच्या नदीकाठच्या घराजवळ घेऊन जाण्यासाठी तयार करायला सांग. आम्ही सामान काढतो. बाहेर तोपर्यंत.

**विमल** : सांगते बाबा [ती जाते]

**श्रीधरसेठ** : [जरा हळू आवाजात ] महादू कोठे जाशील रे. तू कशाला इतका हट्टी आहेस.

**महादू** : जाईन माझ्या घरात. तेथून तर मला कोणी काढणार नाही ना.

**श्रीधरसेठ** : परंतू तेथे जमीन अजून भिजली असेल ना.

**महादू** : असू द्या. पुरानंतर दोन दिवस त्यातच राहिलो होतो. आता त्यात काही मरण येणार नाही. आम्हाला फार उपकार झाले आपले. आता फाजील उपकार नको.

**श्रीधरसेठ** : महादू इतकी ऐट नाही हो बरी . त्या ऐवजी जरा विनवणी केली असतीस. माफी मागितली असतीस. तो काय बिघडले असते. अरे गरीबानी इतकी ऐट करायचे नसते.

**महादू** : तुम्ही याला ऐट म्हणता . मी पाप केले नाही मग कशाला तुम्हांला विनवणी करू. मी चोरी केली नाही तुमची मग कशासाठी माफी मागू.

अनुक्रमणिका

**श्रीधरसेठ :** तुम्हा शेतकऱ्यांना ते केव्हा कळायचे. आम्ही माणूस वरून जरी श्रीमंत असतो तरी आतून किती दीन असतो.

**महादू :** मालक ते तुम्हीच सांगितले म्हणून बरं झाले. मी सांगितले असते तर तुम्हाला बहुतेक वाईट वाटले असते. परंतू आम्ही शेतकरी जरी गरीब असतो तरी कोणाला संकटात पाहताच आम्ही धावत जातो . हीच आमची श्रीमंती [सारजाबाईकडे पाहून ] आवर आता काय पाहतेस.

**श्रीधरसेठ :** खरं आहे महादू. शेतकऱ्यांचे मन लाभणे फार भाग्य लागते. तुला विनवणी करवायच्या अपेक्षेने मी आलो होतो. परंतू आता तुला मी विनंती करतो. तु हे घर सोडून जाऊ नकोस. नाहीतर मला गावात राहणे कठीण होऊन जाईल.

**महादू :** कशाला ? तुम्ही श्रीमंत आहात. लोकांचे तोंड बंद करू शकता. तुम्हाला कशाला गावात राहणे कठीण जाईल. माझा स्वभिमान फार घायल झाला आहे. मला या घरात राहणे कठीण जाईल.

**श्रीधरसेठ :** महादू माझे ऐक. तू या घरातून पाय काढू नकोस. [सारजाबाईकडे पाहत ] ठेव पोरी ते सर्व सामान. महादू माझ्या पोरांसाठी तू बैलांना गाडीत जुंपला नाहीस. आता मात्र मला पश्चातापाच्या गाडीत जुंपू नकोस. माझ्यानें तो भार सहन होणार नाही. तुझ्यातील स्वभीमान व माणूसकी मी पाहिली तू धन्य आहेस. या गावाला तुझ्या सारखा शेतकरी लाभला. हे गाव सुद्धा धन्य आहे. [तोच विकास येतो]

**विकास :** बाबा, बाबा विश्वनाथ काका आले .

**महादू :** काय विश्वनाथ काका आले.

**विकास :** हो विश्वनाथ काका आले. पाटील घोटागाडीतून गेले होते रूगणालयांला; बरोबर डॉक्टर व नर्स सुद्धा आहेत.

**सारजाबाई :** अरे वा! पाटील देव माणूस आहेत.

**विकास :** आई नर्स विश्वनाथकाका बरे होई तोवर इथेच रहाणार व त्यांचे उपचार करणार डॉक्टर आठवड्यातून दोन वेळा येवून जातील येथील लोकांना कष्ट होऊ नये म्हणून पाटलांनी ही व्यवस्था केली.

**महादू :** देव त्यांना उदंड आयुष्य देवो.

**श्रीधरसेठ :** महादू आता चल त्यांना पाहायला. परत आल्यावर सामान पुन्हा नीट कर. आता मात्र माझ्यावर राग मानू नकोस. (सर्व जायला निघतात तोच पडदा पडतो )

अनुक्रमणिका

# जीवन साफल्य

नाटककार- **सदानंद भिवाजी**

अनुक्रमणिका

# जीवन साफल्य

## सारांश

शंकरराव हा एक मध्यम परिस्थितीतला माणूस. तो प्रोफेसर असून त्याच्या बायकोचा व दोन मुलांचा भार एकट्यालाच घ्यावा लागत असून समाजाकडेही योग्य ते लक्ष तो देत असतो. संसार चालविणें, मुलांना हव्या असलेल्या गोष्टी पुरविणे. सर्व धार्मिक कार्यामध्ये भाग घेणे. ही सगळी कामे तो मोठ्या हिमतीने पार पाडीत असतो. त्याच्या उलट त्याचा मित्र अशोक केळकर व त्याची पत्नी यांना मुले नसून दोघे ही आपल्या भाषेचे शिक्षक आहेत. ते श्रीमंत असून स्वार्थवृत्तीनेच वागत असतात. सामाजिक कार्य करणे हे त्यांना मुळीच आवडत नाही. आणि ज्या समाजाच्या नावाने पैसे कमवित आहेत त्या समाजालाच लाथाडित आहेत याची त्यांना जाणीवही नसते. पुढे अशोकची पत्नी शंकररावाच्या भोळ्या पत्नीची ही निराशा करते. आणि पुढे ती सुद्धा आपल्या नवऱ्याविरूद्ध उठते. अखेरीस या पडत्या काळी समाजाला सावरुन धरणे हे आपले आद्य कर्तव्य आहे या विषयी शंकरराव तिखट शब्दात सगळ्यांची कान उघडणी करुन देऊन सगळ्यांना ताळ्यावर आणतो. आणि कर्तव्याची आठवण होताच आपल्या ह्या वाईट कृत्याबद्दल सगळ्यांना पश्चाताप होतो. शेवटी ‘समाजाच्या कल्याणासाठी सतत झटू’ असे म्हणून गजाननासमोर शंकरराव त्यांना प्रतिज्ञा घ्यावयास लावतो.

अनुक्रमणिका

## पात्रे

| | | |
|---|---|---|
| प्रोफेसर शंकरराव मराठे | : | मध्यम परिस्थितीतला माणूस |
| सौ. श्यामला मराठे | : | शंकररावाची पत्नी |
| विराज | : | त्यांचा मुलगा |
| विमला | : | त्यांची मुलगी |
| नोकर | | |
| प्रो. अशोक केळकर | : | शंकररावाचा शालेय मित्र |
| सौ. प्रभा केळकर | | प्राथमिक शाळेची शिक्षिका |
| रंगराव | : | शंकररावाचा लहानपणचा मित्र |

अनुक्रमणिका

## स्थळ

सकाळची वेळ, नऊ-साडेनऊचा सुमार प्रोफेसर शंकरराव मराठे यांचा सुशोभित दिवाणखाना. भिंतीवरचे घड्याळ , सोफासेट, टीपॉय , भिंतीला फोटो टांगलेले आहेत.

फोटो : शिवाजींचा , गांधींचा, टिळकांचा इ. स्टेजवरच्याच एका कोपऱ्यात पारदर्शक पडद्यामागे छोटेसे देवघर दिसत असून त्या देव घरात गणपतीची मूर्ती आहे देवघर सुशोभित केलेले आहे. डिकोरेशन लँपस् वगैरे लावलेले आहेत. देवासमोर कुटुंबासहित बसून शंकरराव पूजा करीत आहेत. गणपतीची आरती गात आहेत . म्हातारा गडी दिवाणखान्यातच फुलदाणीत फुले ठेवीत आहे. बाहेर मोटारीचा हॉर्न वाजतो. गडी बाहेर जाऊन पाहातो. आत येतो. अशोक केळकर व त्याची पत्नी त्याच्या मागून प्रवेश करतात. गडी त्यांना बसावयास सांगतो. बसून अंक घेऊन चाळू लागतात.

**शंकरराव कुटुंबासहीत :**

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची | नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ||
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची | कंठी शोभे माळ मुक्ता फळाची || १||
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती |दर्शनमात्रे मनकामना पुरती || धृ||

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा | चंदनाची उटी कुंकुमकेशरा ||
हिरे जडित मुकुट शोभतो बरा| रूणझुणती नुपुरे चरणी घागरीया ||२||

लंबोदर पितांबर फणिवर बंधना | सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ||
दास रामाचा वाट पाहे सदना | संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ||३||
जय देव जय देव मंगल मूर्ती | ............................

घालीन लोटांगण वंदीन चरण | डोळ्यानी पाहीन रुप तुझे|
प्रेमे आलिंगन आनंदे पुजिन| भावे ओवाळीन म्हणे नामा ||१||

त्वमेव माता च पिता त्वमेव | त्वमेव बंधूश्च सखा त्वमेव |
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव | त्वमेव सर्व मम देवदेव ||२||

कायेन वाचा मन सेंद्रियैर्वा | बुद्धयात्मना वा प्रकृतीस्वभावात् |
करोमी यद्यम् सकलं परस्मै| नारायणा येंती समर्पयामि ||३||

अच्युतं केशवं रामनारायणं । कृष्णदामोदरं वासुदेवं हरि।
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभं । जानकी नायकं रामचंद्र भजे ॥४॥

हरे राम हरे राम । राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण । कृष्ण कृष्ण हरे हरे ॥५॥

अनुक्रमणिका

शंकरराव देवाच्या पाया पडतो. श्यामलाबाईही देवाला नमस्कार करुन नवऱ्याच्या पाया पडते. मुलेही देवाला नमस्कार करुन आई बापाला नमस्कार करतात. शंकरराव व मुले खोलीकडे येऊ लागतात. तोच शंकररावाचे लक्ष अशोक कडे जाते. आणि मोठ्या हर्षाने म्हणतो.

**शंकरराव** : अरे वा ! अशोक, वहिनी तुम्ही? केव्हा आलात? किती दिवसांनी आलात! कसं काय येण केलं आज? ठीक आहे ना!

**अशोक** : ठीक आहे. तुझीच खुशाली सांग!

**शंकरराव** : गणपती बाप्पाच्या कृपेने सगळ चाललंय.
(मुले येतात. नमस्कार करुन आत जातात.)

**अशोक** : गुणांची मुलं हं. फार छान वहिनींनी अजून पूजा उरकली नाही ?

**शंकरराव** : ह्या पहा आल्याच

**श्यामला** : (हातात छोटेसे भांडे घेऊन येते. त्यांना नमस्कार म्हणते व भांड्यातला देवाचा प्रसाद त्यांच्या हातावर देत देत म्हणते)
कशी काय आठवण झाली आमची ?

**प्रभा** : गेले दोन महिने भेट झाली नाही म्हणुन दोन तीन तास घालवण्यासाठी आलो.

**अशोक** : पौणे बाराला सिनेमाला जाणार आहोत.

**शंकरराव** : आज कोणता चित्रपट लागलेला आहे ?

**अशोक** : समाज परिवर्तन.

**शंकरराव** : छान पिक्चर आहे हं.

**प्रभा** : हे म्हणत होते की शंकररावाच्या घरी आपण पुढच्या रविवारी जाऊ आजबहूतेक ते घरी नसतील, पण शेवटी मी माझेच खरे केले. सुदैवाने भेट झाली म्हणा.

**शंकरराव** : नाही. तसं काही नाही. आजच्या साठी कोणताहीं कार्यक्रम आखलेला नाही. आज घरीच पडून रहायचं ठरवलं.

**श्यामला** : चहाचं पाहून येते. (असे म्हणत आत जाते.)

अनुक्रमणिका

**शंकरराव** : (क्षणभरच प्रभाकडे पाहातो व आत जाण्याच्या दरवाजावर जाऊन मुलांना हाका मारतो.) विराज, विमला अगं विमला. (आतून ) 'हो आले.' (विमला येते. तिच्या मागून विराजही येतो.) काकूंशी थोडं बोलत बसा, मी जरा कपडे बदलून येतो. (आत जातो.)

(अशोक व प्रभा तेथेच ठेवलेले अंक घेऊन चाळू लागतात. थोडा वेळ असाच जातो. कुणीच बोलत नाही. असे पाहून प्रभा म्हणते)

**प्रभा** : विमला , तू कितवीत शिकत आहेस ?

**विमला** : मी, दुसरींत.

**अशोक** : अन् तू विराज?

**विराज** : मी चौथीत.

**अशोक** : कोणकोणते विषय शिकतोस ?

**विराज** : मराठी, इंग्रजी, फ्रेंच , गणित व भूगोल.

**प्रभा** : म्हणजे एकूण पाच विषय ना ?

**विराज** : हो.

**विमला** : माझे फक्त चारच विषय आहेत.

**अशोक** : कोणकोणते ?

**विमला** : मराठी, इंग्रजी, फ्रेंच आणि गणित.

**अशोक** : बरोबर. दुसरीत इतकेच विषय असतात.

**अशोक** : बरे, मोठे झाल्यावर काय कराल ?

**विमला** : प्रभा काकूंसारखेच, शाळेत मुलांना शिकवणे. (आणि हसते)

**अशोक** : (कौतुकाने) फार छान ! अन् विराजसाहेबांची महत्त्वाकांक्षा काय आहे ?

**विराज** : (छातीवर हात मारुन) आम्ही आमच्या दादांसारखे प्रोफेसर, आदर्श समाजसेवक होणार. आमच्या गुरुजींनी आम्हाला शिकवले आहे. 'मरावे परि कीर्तीरूपी उरावे.'

अनुक्रमणिका

**शंकरराव** : (आतून येत व चुटकी देत) शाबास ! विराज, शाबास ! आपल्या दादांसारखा जरूर होशील. आदर्श समाजसेवक होण्याचा मंत्र मी तूला आवश्य शिकवीन. परमेश्वर तुझी इच्छा पुरी करो.
अरे, श्यामलाने अजून चहा आणला नाही ?

**प्रभा** : तुमची मुले खूप हुशार आहेत भाऊजी. तुमच्याच पावलांवर पावले टाकतील अशी दिसतात.

**शंकरराव** : जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उध्दरी हे काही खोटे नव्हे वहिनी. पोटच्या गोळ्याचे भवितव्य खरे ठरवणे हे आई वडिलांच्या हाती असतं.

**श्यामला** : (आतून चहा घेऊन येत) पुरे पुरे तुमचे उपदेश. (प्रभाकडे पाहात) यांची व्याख्याने नेहमीच चालू असतात. चहा घ्या , नाही तर गार होईल. (सगळ्यांना चहा देते)

**अशोक** : फार दिवसानंतर आपणाला श्यामला वहिनींच्या हातचा चहा प्यायला मिळाला.
(सगळे हसत मुखाने चहा घेतात)

**श्यामला** : (चहाचा घोट घेत) चहात कमी साखर टाकली नाही ना ?

**अशोक** : नाही. ठीक आहे ! एकदम फर्स्ट क्लॉस (प्रभाकडे पाहात ) वहिनींनी स्पेशल चहा केला हं आज.

**शंकरराव** : आलेल्या पाहुण्यांचा चांगल्या प्रकारे आदर सत्कार करणे हींच आमच्या घरची पध्दत आहे.

**अशोक** : हे तर बरोबर आहे. माझेही म्हणणे तेच आहे. पण आमच्या हिला कुठे जमतय ते करीत बसायला. सकाळी उठून नोकरीवर निघण्याची तयारी करायची व संध्याकाळी पाच साडे पाचला परत यायचं शनिवार व रविवारचे दिवस इकडे तिकडे जाण्यात निघून जातात.

**शंकरराव** : यात चूक कोणाची ?

**अशोक** : (एकदम) चूक माझीच. कबूल आहे.

**प्रभा** : (तिरळ्या नजरेने आपल्या नवऱ्याकडे पाहात) म्हणजे ? काय म्हणायचय तुम्हाला मी नोकरीला असल्यामुळे हवे ते सुख लाभत नाही. असेच ना ?

**अशोक** : (गोंधळून) नाही, नाही. तसं काही नाही अगं पाहुण्यांचं स्वागत करायला तुला वेळच नाही म्हणायचं.

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| **शंकरराव** | : | (शंकरराव व श्यामला एकमेकांकडे बघतात व पुढे विषय बदलण्यासाठी शंकरराव म्हणतो.) बरे मुलांनो, अभ्यास करायचा असेल ना. जाण्यास हरकत नाही. (दोघेही उठतात. अशोक व प्रभा हसत मुखाने एकदम) गुणी मुल हं (असे म्हणून जातात) |
| **शंकरराव** | : | बरे अशोक, पोट लुईसच्या हायस्कूल वरून तुझी बदली होणार होती ना ? त्याचं काय झालं ? |
| **अशोक** | : | बदली करून घेण्यासाठी फार प्रयत्न केलेत परंतु यश मिळाले नाही. बघू पुढच्या वर्षी. |
| **श्यामला** | : | प्रभाताई अजून क्युपिपच्या प्राथमिक शाळतच शिकवीत आहेत ना ? |
| **प्रभा** | : | हो. जरी त्याच शाळेत आठ दहा वर्षे राहिले तरी मला आवडेल. |
| **अशोक** | : | कारण त्या शाळेत सगळे स्वच्छंदी असतात. वाटेल तेव्हा काम करायचे आणि वाटेल तेंव्हा झोपा काढायच्या तसेच ना प्रभा ! |
| **प्रभा** | : | (हसत) बरोबर. |
| **शंकरराव** | : | (हे ऐकून शंकररावाला फार वाईट वाटते आणि दुखावल्यासारखे होऊन एकदम म्हणून जातो.) अरे,अरे ! बिचाऱ्या मुलांच्या शिक्षणाचे किती हाल होत आहेत ! |
| **अशोक** | : | काय झालं शंकरराव ? कुणाचे हाल होत आहेत ? |
| **श्यामला** | : | (आपल्या घरी प्रभाला ह्या वाईट कृत्याची लाज वाटू नये म्हणून) नाही काही. रात्रंदिवस हे कसल्यातरीच विचारात असतात. |
| **नोकर** | : | (आतून येतो) साहेब, काम पूर्ण केला. |
| **शंकरराव** | : | ठीक आहे ! नंतर पाहीन. |
| **नोकर** | : | (कपबश्या उचलून घेऊन आत जाऊ लागतो व) साहेब, बागेतील सांगितलेले काम मी सुरू करू ? |
| **शंकरराव** | : | उद्या कर आज रविवार ना ? आज करता पुरे. |
| **नोकर** | : | हो साहेब (म्हणत जातो) |
| **शंकरराव** | : | (थोड्या वेळाने) आपल्या पगाराच्या लायकी पेक्षा अधिक काम करू इच्छिणारा हा इनामदार माणूस, अशिक्षित पण किती प्रामाणिक. (आत कुत्रा भुकतो. 'विराज', 'विमला' |

अनुक्रमणिका

म्हणून एक दोन मुले हाका मारतात. शंकरराव आतल्या दारावर जाऊन बघू लागतात सगळे त्यांच्याकडे पाहू लागतात. श्यामला आत जाऊ लागणार इतक्यात ते परत बसायला येतात.)

**श्यामला** : कोण आलयं ?

**शंकरराव** : शेजारच्या मीराताईंची मुलं. खेळायला आली आहेत वाटतं.

**प्रभा** : शेजारच्या मुलांना सुध्दा तुमचा कुत्रा ओळखत नाही ? त्यांचेवर भुंकतो. कमाल आहे !

**शंकरराव** : तो आपली चाकरी बजावतो आहे वहीनी. आपले कर्तव्य पार पाडत आहे. कुत्री सुध्दा किती प्रामाणिक असतात पहा.
(तरी प्रभाला त्याचा अर्थ कळत नाही. अशोकला हे सुरुवाती पासूनच कळलेले असते. तो बावरतो. तितक्यात कोणीतरी बाहेरून रिंग करत. गडी धावतच येतो. बाहेर जातो. सगळे दाराकडे बघू लागतात. आत मुले कासेट लावतात. शंकरराव सुध्दा उठून दारावर जाणारा इतक्यात गडी परत येतो. त्याच्या मागून रंगराव प्रवेश करतो. दारुमुळे थोडासा झिंगून गेलेला रंगराव मोठ्याने सगळ्यांना नमस्कार करतो)

**रंगराव** : नमस्कार मंडळी, नमस्कार. (स्वतःची ओळख करून देतो) हां. मी शंकररावाचा, लहानपणाचा मित्र. तुम्हाला डिस्टर्ब नाही ना केल मी.

**शंकरराव** : नाही, नाही. उलट आनंद झाला ! बस. कसा आलास रे ?

**रंगराव** : कसा म्हणजे ? टॅक्सीने, चालत चालत . (सगळ्यांना हसू येते)

**शंकरराव** : अरे वा ! फार छान.

**श्यामला** : प्रभा ताई, चला आपण आत बोलत बसू.

**प्रभा** : ठीक आहे. चला (दोघीही जातात)

**शंकरराव** : इतकी वर्ष कुठ होतास रे ?

**रंगराव** : मी सांगतो ना सगळ तुला. प्राथमिक शाळा सोडल्यानंतर मी हॉटेलात इतर पोरांबरोबर काम करू लागलो. पुढे बाबा थकले. ते म्हणाले, बेटा या पुढे तू हे सारं सांभाळ माझ्यानं होऊ शकणार नाही आता ते. आणि मला ओटोमॅटिक प्रोमोशन मिळालं, मी एकदम हॉटेलचा मालक पण काय सांगू शंकर, वाईट संगतीने सगळं काही खड्ड्यात गेलं

**शंकरराव** : त्यानंतर कोठे होतास ?

अनुक्रमणिका

**रंगराव** : घरीच

**शंकरराव** : ते तर ठीक आहे. पण आज आमची आठवण कशी झाली ?

**रंगराव** : ज्या प्रमाणे सुदाम्याला श्रीकृष्णाची आठवण झाली अगदी त्याच प्रमाणे तुझी आठवण झाली. आणि भेटी करिता आलो.

**अशोक** : (खिशातून सिगरेट काढून पेटवीत) म्हणजे आजच्या दिवशी तू ही सुदामा झालास असेच म्हटले पाहिजे ना ?

**रंगराव** : तसं म्हटलं तरी चालेल.

**अशोक** : पण त्या काळी सुदाम्याने श्रीकृष्णासाठी भेट म्हणून पोहे आणले होते. तू शंकररावासाठी काही आणले आहे का ? (रंगराव इकडे तिकडे बघतो. आणि मानेने होकार देतो.)

**रंगराव** : मी ही माझ्या जिवलग मित्रासाठी काही तरी आणलं आहे.
(आणि खिशात लपवून आणलेली मद्याची छोटी बाटली इकडे तिकडे पाहुनच काढतो व शंकररावाला मोठ्या प्रेमाने देऊ लागतो)

**शंकरराव** : हे काय रे ?

**रंगराव** : तुझ्या करता मी मद्याची बाटली आणली आहे.

**शंकरराव** : पण हे सगळं कशासाठी ?

**रंगराव** : जरी इतकी वर्ष तुझ्या घरी आलो नाही तरी तुझ्यावरचे प्रेम कमी झाले असे समजू नकोस. याचा स्वीकार कर. प्लीज अँक्सेप्ट इट ! (तो घेत नाही म्हणून ती बाटली मेजावर ठेवतो.)

**शंकरराव** : नाही रंगराव, नाही. माझ्या या पवित्र हस्तानी हे होऊ शकणार नाही. ही बाटली तू परत उचलून घे. परत कधी ही अशी घाणेरडी गोष्ट या पवित्र मंदिरात काढू नकोस. ही बाटली परत घे मित्रा; तुला विनंती करतो. तुझ्या पाया पडतो.

**रंगराव** : म्हणजे आम्ही सुद्धा घाणेरडे; असेच ना ?

**शंकरराव** : तसं नाही म्हणत मी. पण जो पर्यंत या शंकररावाचे कुटुंब या घरात नांदेल तो पर्यंत तू हे वाईट कृत्य, हे पाप या घरात करू नकोस. या पवित्र ठिकाणी तू आपणहून स्वतःला महापापी ठरवून घेऊ नकोस.

**रंगराव** : कित्येक वर्षांनी तुझ्या दारी आलेल्या तुझ्या या जिवलग मित्राच्या समाधानासाठी एक घोट तरी घे शंकर.

**शंकरराव** : रंगराव , पाण्याला आग लावण्याचा उगीचच वेडा प्रयत्न करू नकोस . ते अशक्य आहे.

**अशोक** : शंकरराव , रंगरावाच्या आग्रहाला मान देऊन ती बाटली घेऊन ठेव.

**शंकरराव** : (त्याला हे सगळं असह्य होऊन) हे सगळं मी काय ऐकत आहे परमेश्वरा ! हा कसला भलताच आग्रह? ज्या महापूरात सगळा समाज वाहत चालला आहे अशा त्या प्रलयात माझ्या सारख्यानं जीव वाचवण्या ऐवजी त्यात उडी घ्यावी ! (बाटली खाली फेकून देऊन ) हा पहिलाच घोट फेकून दिला पाहिजे. पहिले चुकीचे पाऊल, तेच न पडू देण्याची दक्षता घेतलीच पाहिजे. नाही, जन्मभर मिळविलेले पुण्य एका क्षणात पापांच्या ज्वालांत राख करुन टाकणार नाही मी. माझ्या पूर्वजांनी जमवून ठेवलेल्या कापराच्या राशीला एक काडी लावून क्षणार्धात भस्म करुन टाकू ? नाही, नाही ! प्राण गेला तरी हरकत नाही पण माझी प्रतिज्ञा अढळ राहील. (आतून गडी येतो रंगरावांच्या हातात चहाचा कप देतो. तो घेत नाही. मग शंकररावच तो कप घेऊन त्याला देतो)

**शंकरराव** : रंगराव, हा चहाचा कप अमृत मानूनच घे; घे मित्रा (तो घेतो) आणि आजवर तुझ्या पूर्वजांनी तुझ्या करता काबाडकष्ट करुन मिळवून ठेवलेले सुख ज्याच्यामुळे नाश पावले त्या नीच व्यसनाला आपल्या हृदय मंदीरातून लाथाडून 'कुसंगती कायमची सरो। समाज सेवा सदा घडो' हा मंत्र जपण्याचा प्रयत्न करीत जा.

**रंगराव** : (पळभर शंकररावाकडे बघतो. त्याच्या डोळ्यात पाणी चमकते चहाचा कप मेजावर ठेऊन आवेगाने 'शंकरराव, शंकरराव' म्हणून शंकररावाला मिठी मारतो. अशोक चमकतो.) शंकरराव, तू खराखुरा एक देवदूत म्हणूनच या समाजात जन्माला आला आहेस. तुझ्या त्या पुण्यरुपी वृक्षाखाली मी उभा राहाण्याचा देखील लायक नाही. तुझी ती निष्कलक छाया माझ्या सारख्या पाप्याचा स्पर्श होताच पूर्णपणे कलंकीत होऊन जाईल. नको. तस व्हायला नको. मी येथून गेलेलेच बरं. (आणि जाऊ लागतो)

**शंकरराव** : थांब रंगराव. मनुष्य पापी किंवा दुष्ट म्हणून जन्माला येत नसतो. तो येतो मानवाचा अंशज म्हणूनच. जन्माला येऊन केलेल्या कृत्यावरुन तो चांगला किंवा वाईट ठरला जातो.

**रंगराव** : मग मी माझ्या आयुष्यात चांगला म्हणून काहीच केलं नाही.

**शंकरराव** : हरकत नाही मित्रा . अजून अवकाश आहे. यापुढे करुन दाखव.

**रंगराव** : वाया गेलेल्या माझ्या पूर्वाध आयुष्याचा मला फार पश्चाताप होतो आहे. माझ्या या पापक्षालनासाठी सांगशील ते मी करीन. तूच सांग शंकरराव, मी काय करु ?

अनुक्रमणिका

**शंकरराव** : वाली हा वाटसरुंना लुटणारा एक वाटमाऱ्या होता. आपण केलेले पाप धुऊन काढण्यासाठी तो तपश्चर्येला बसला आणि पुढे 'मरा, मरा' म्हणता म्हणता वाल्याचा वाल्मिकी झाला. तसेच तूही ह्या रंगहीन समाजाला रंगरुपास आणण्यासाठी काही तरी करुन दाखव. तुझे 'रंगराव' हे नांव तूला शोभून दिसू दे.

**रंगराव** : शंकरराव, आज तू माझा दोस्त म्हणून नव्हे तर एक मार्गदर्शक म्हणून, माझ्या सारख्या आंधळ्याची काठी म्हणून मला भेटलास. तू मला सन्मार्गाला लावलास. कोणत्या प्रकारे तुझे ऋण फेडू !

**शंकरराव** : तस कांही नाही रंगराव. माझ्या बांधवांना आपल्या कर्तव्याची जाणीव करवून देणे हे माझे आद्य कर्तव्यच आहे. धर्माला अनुसरुन मी माझ्या कर्तव्याचे पालन करीत आहे. चल, बस रंगराव. तू चहा घेतला नाहीस. गार झाला असेल.
(रंगराव येऊन बसतो. चहा घेतो. आतून श्यामला व प्रभा येतात. या वेळी श्यामलाने कपडे बदलेले असते. उंची वस्त्र. अंगावर दागिने. शंकरराव तिच्याकडे पाहून दचकतो. उठून तिच्याकडे जाऊ लागतो.)

**शंकरराव** : श्यामला तू ? कुठे निघालीस ?

**प्रभा** : तेंच तुम्हाला सांगायला ताई येत आहेत भाऊजी.

**श्यामला** : होय तेच सांगायला आले मी. आज आपणही पिक्चरला जाऊ असं मी ठरवलं आहे. (प्रभा बसते)

**शंकरराव** : श्यामला तू ! अन् आज पिक्चरला.

**श्यामला** : हो, मीच. अन् आजच यांच्या बरोबर.

**शंकरराव** : पण या पूर्वीच तू हे सगळं आखून का घेतल नाहीस ?

**श्यामला** : यासाठीच की , तुमची ती पूर्वीची श्यामला आता उरलेले नाही. त्या सामाजीक कार्यकर्त्यांची श्यामला नाही. मी आता फक्त प्रोफेसर शंकरराव मराठे यांची पत्नी म्हणूच उरली आहे. चला तयारी करा.

**अशोक** : वहिनींचे म्हणणे ठीक आहे शंकर तू ही कुटुंबासहित चल. आपण एकत्र जाऊ, मजा येईल.

**शंकरराव** : मजा. मजा लुटण्यासाठी जन्माला आलेल्या लोकांकरिता ती असू दे. आमच्या सारख्यांना हे चालणार नाही. आमचाही कार्यक्रम आखलेला असतो. केव्हा ना केव्हा तरी आम्ही

सुद्धा आनंद लुटत असतो. मनुष्य जातीच्या जीवनक्रमात ही गोष्ट असायलाच हवी. मुळीच नको असे थोडेच म्हणत आहे ? पण प्रत्येक गोष्टीला मर्यादा असावी लागते.

**श्यामला** : अगदी बरोबर. ठीक आहे तुमचे म्हणणे. प्रत्येक गोष्टीला मर्यादा असावीच लागते. म्हणूनच तुम्हाला सांगायला आले आहे की तुम्ही तुमचे ते कार्य मर्यादितच करीत जा. आपल्या सुखाचा त्याग करून रात्रंदिवस समाजसेवेकडे लक्ष देणे आता पुरे झाले कारण कुणालाही या विषयी काहीच वाटत नाही, तुम्हाला सगळ्यांची चिंता. रात्री झोप नाही. अन्न रुचत नाही सकाळी ताजेतवाने उठण्याऐवजी पार थकून गेलेल्या चेहऱ्याने उठता. ह्या सगळ्या गोष्टी मी बरीचवर्ष पाहात आले. आता हे सगळ थांबवलेलंच योग्य आहे.

**शंकरराव** : ठीक आहे प्रिये. तुझे म्हणणे मान्य आहे मला. पण या वेळी ते थांबवणे शक्य नाही.

**श्यामला** : शक्य नाही ! हं. जगात कोणती गोष्ट अशी आहे जी अशक्य आहे. कोणतीच नाही. हे काम करण्याचे तुम्ही सहज बंद करू शकता. इतर प्रोफेसरांसारखाच तुम्हालाही पगार मिळतो ना ? मग त्यांच्या सारखेच तुम्ही सुध्दा का करीत नाही. इतरांचे दिवस मजेत चालले आहेत. तुम्हीच तेवढे आकाशातील पळत्या ढगांसारखे समाजामागे धाव घेत आहात. तुमच्या पत्नीपेक्षा, तुमच्या चिमण्या मुलांपेक्षा तुमच्या प्राणापेक्षा ही तुमचा तो समाज तुम्हाला अधिक प्रिय झाला आहे. असेच ना ?

**प्रभा** : शांत व्हा ताई.

**अशोक** : तुम्ही काही न म्हटलेलंच बर वहिनी.

**शंकरराव** : माझे सगळ्यांवर सारखेच प्रेम आहे श्यामला. तुमच्याविषयी माझ्या मनात जितकी कळकळ वाटते तितकीच या समाजाविषयी व आपल्या या भाषेविषयी वाटते. कारण समाज हा पितृसमान असून भाषा ही मातृसमान आहे. त्यांची सेवा केलीच पाहिजे.

**श्यामला** : मग, जर तुम्हाला असंच वाटत असेल तर तुमचा तो पितृसमान समाज व मातृसमान भाषा घेऊन बसा. करा त्यांची चाकरी रात्रंदिवस आम्ही निघालो विराज, विमला, कुठं आहात ?

**शंकरराव** : जाण्यापूर्वी एक ऐकून जा. या घरातून पाऊल काढण्यापूर्वी एक लक्षात ठेव की तू थोड्यावेळापूर्वी ज्याच्या विरुद्ध उठली आहेस तो तुझा पती आहे. आणि पतीचे सुखदुःख तेच पत्नीचे. पतीची आश निराशा तीच पत्नीची आणि पती देवाची सेवा हा तिचा धर्म आशा वेळी मला आश्चर्य वाटत की समाजाची भरभराटी व्हावी, मागासलेला समाज पुढे सरावा म्हणून नवऱ्याला मार्ग सुचविण्याऱ्या श्यामलाला आज सगळ्या गोष्टींचं विस्मरण होत आहे. आमच्या ह्या सुसंस्कृत घराण्यात हे जे वारे फिरले आहे या बद्दल जीव तीळ तीळ तुटतो आहे. मला सगळं काही कळून आलंय. ही तुझी चूक नाही. श्यामला स्वतःला सावरण्याचा प्रयत्न कर.

अनुक्रमणिका

**रंगराव** : वहिनी, हया देवदूतांचे चरण सोडून तुम्ही कुठे निघालात ? (श्यामला बूचकळ्यात पडते)

**श्यामला** : देवदूत कसले आले आहेत ? सगळ्यांचे गुलाम बनले आहेत. ही गुलामगिरी कुठवर टिकेल देव जाणे.

**शंकरराव** : ही गुलामगिरी नाही श्यामला. सेवा आहे. सेवा. जोपर्यंत माझ्या जिवात जीव आहे तो पर्यंत ही समाजसेवा सुरुच राहणार.

**श्यामला** : तुमच्या एकट्याने समाजाची सेवा घडेल असं तुम्हाला वाटतं होय.

**रंगराव** : शंकरराव एकटा नाही वहिनी. मी त्याचा साथीदार झालो आहे. माझे हे उत्तरार्ध आयुष्य मी या कार्यात जरूर वेचीन.
(प्रभा आश्चर्य चकित होते.)

**श्यामला** : झाले. तुमच्या सारखी दारूबाज माणससुद्धा समाजाच्या सेवेला निघाली. मग आता दारूची विक्री खूप मोठ्या प्रमाणात व्हायची.
(अशोक व प्रभा यांना हसू येते.)

**रंगराव** : ह्या जीवन रूपी नाटकात या रंगरावाने दारूड्याचे काम करण्याचे सोडून दिले आहे वहिनी आता तो समाज सुधारकाचेच पात्र सांभाळील.

**श्यामला** : ठीक आहे ! सांभाळा, सांभाळा. (रागाने आत निघून जाते)

**प्रभा** : तुम्ही सुद्धा ही गुलामगिरी पत्करता ? (नवऱ्याला पाहून) काय माणूस आहे !

**अशोक** : पण आता हे काम करणे फार अवघड आहे. बरेच लोक धर्मांतर होऊ लागले आहेत. परधर्मात जाऊ लागले आहेत. आठवड्यातून दोन तीन वेळा ते आसेंब्लीलाही जातात. त्यांना मार्गावर आणणे फार मुष्किलीचे ठरेल.

**शंकरराव** : जगात कोणतेही काम करण्याचा निश्चय केल्यावर ते होतेच की. ध्येय मात्र हवे, ध्येय, शिवाय सूर्याला चंद्र म्हटलेलं चालत नाही. सूर्य तो सूर्यच. तसेच कावळ्याला पांढरा रंग लावून बगळा म्हटलं तरी तो कावळाच राहील. तो काव कावच करून ओरडेल. त्याच प्रणाणे मानवाचे सुद्धा आहे एका समाजात जन्माला येऊन आपल्याला दुसऱ्या समाजाचा सदस्यच म्हणवून घेणे हा किती मूर्खापणाचा विचार आहे.

**अशोक** : पण त्या लोकांना कोण हे समजावून देईल ?

**शंकरराव** : आम्ही देऊ. आम्ही शिक्षकांनी, समाज सेवकांनी हे काम केलं नाही तर कोण करेल? आपण ही जबाबदारी घेतली पाहिजे.

अनुक्रमणिका

**प्रभा** : पण हे सगळं करून त्या लोकांकडून कोणती अपेक्षा करायची ?

**रंगराव** : अपेक्षा! कसली अपेक्षा. झाड आपली सावली. आपली फळे जगाला देते; नदी जगाची सेवा करते त्या वेळी ती त्यांच्या कडून कोणती अपेक्षा करते. कोणतीच नाही.

**प्रभा** : पण हा वेगळा प्रश्न आहे. यासाठी आपल्याला कोणाकडून पगार ही मिळायचा नाही.

**शंकरराव** : शिक्षकी हा धंदा नसून पेक्षा आहे वहिनी. त्या लोकांकडून आपण एक अपेक्षा करु शकतो.

**प्रभा** : कोणती अपेक्षा ?

**शंकरराव** : आपल्या लोकांनी आपल्या समाज्यात राहून स्वभाषा व स्वसंस्कृती टीकवून धरण्याची अपेक्षा.

**अशोक** : पण दोघा तिघांनी हे काम भागायचे नाही मित्रा.

**शंकरराव** : रात्री आकाशात दिसणाऱ्या असंख्य चांदण्या एकदम चमकत नाहीत. आरंभी एकच. हे तुला शिकवण्याची जरुरी नाही. तू एक दर्जेदार शिक्षक आहेस.
(आतून श्यामला येते)

**प्रभा** : (नवऱ्याला) तुम्ही या भानगडीत पडू नका.

**शंकरराव** : भानगड. या वेळी तुम्हाला लाज वाटायला हवी होती. समाजाच्या नावाने पैसे कमावता आणि समाज सेवेला भानगड म्हणता. आज हा समाज, ही भाषा रसातळाला जाऊ लागली आहे तर हे केवळ तुमच्या सारख्या स्वार्थ वृत्तीच्या माणसांमुळेच.

**अशोक** : पण तुला इतकं दुःखी कष्टी होण्याचे काय कारण ?

**शंकरराव** : कारण हेच की, आपल्या पूर्वजांनी मिळवलेले चारित्रधन, आजवर टिकवून ठेवलेली संस्कृती व भाषा हळूहळू बुडत जाईल आणि आपल्याला एखाद्या भलत्याच व्यक्तीला आई म्हणाव लागेल. (अशोकडे पहात) अशोक असा निष्ठूर होऊन कोस. असा तू बाईल बुध्दया होऊ नकोस. गुरुजींच्या शिकवणींचं तुला विस्मरण झालं? ज्या शिव छत्रपती रायांनी हिंदवी राज्य स्थापून दिलं, त्यांचही तुला स्मरण उरलं नाही ? 'माझी झाशी मी देणार नाही' असे म्हणणारी रणरागिनी राणी लक्ष्मीबाई व पुत्र प्लेगाने आजारी असतांना देखील समाजाच्या कल्याणासाठी शांतपणे केसरी लिहिणारे बाळ गंगाधर टिळक यांचही तुला स्मरण राहीलं नाही ? किती क्रूर मनाचा झालास तू. हाच का तो आदर्श ? अशोक, भानावर ये अशोक. असा कृतघ्न होऊ नकोस. पूर्वजांनी मीळवले त्या चारित्र्य धनाचे संरक्षण करणे हे तुझे कर्तव्य आहे.

अनुक्रमणिका

**अशोक** : (गहिवरून) शंकरराव (शंकररावाला आवेगाने मिठी मारून) मला क्षमा कर मित्रा. तू खरोखर किती श्रष्ठ आहेस. तुझ्या सारख्या अनुपम, आदर्श समाजसेवकाची कीर्ती चिरकाल टिको मी किती अन्यायी आहे हे पाहून घेण्यासाठी तू माजे डोळे उघडलेस. किती उपकारी तू ! तुझ्या ह्या उपकाराची परतफेड मी कोणत्या तऱ्हेने करू. हे माझे मलाच कळत नाही.

**शंकरराव** : उपकाराची परतफेड करण्याकरिता उपाय फक्त एकच आहे.

**सर्वजण** : कोणता उपाय?

**शंकरराव** : आजच्या या पवित्र दिवशी तुम्हाला या गजाननासमोर प्रतिज्ञा घ्यावी लागेल, की , माझ्या जिवात जीव असेपर्यंत मी माझ्या मराठी समाजाची आणि माझ्या मातृ भाषेची सेवा करीन. आणि जर माझ्याकडून हे सत्कार्य पार पडेल तरच माझे जीवन साफल्य झाले असे समजेन.

(श्यामला येऊन शंकररावाचे पाय धरते) पडदा पडतो.

अनुक्रमणिका

# मी चाललो गंगातिरी

नाटककार : **देवजी पादिया चंद्रावरकर**

अनुक्रमणिका

# मी चाललो गंगातिरी

**प्रस्तावना** : माधव हा एक कष्टाळू शेतकरी; दुष्काळात त्याचे दोन बैल मरून जातात. त्याचे शेतकाम मागे पडते. सावकाराकडे कर्ज काढतो. वेळ वर पैसे परत करता येत नाही. पैशासाठी वणवण हिंडतो, सावकार पैशाच्या ऐवजी माधवाकडून त्याच्या बहिणीचा हात मागतो. माधवाच्या बहिणीचे एका तरुणावर प्रेम बसले असते. शेवटी त्या तरुणाच्या मदतीने सावकाराचे पैसे परत करतात. सावकाराचे सर्व बेत फसतात. त्याची फजिती कशी होते ते खालील नाट्य प्रवेशात पहा.

(पडदा बाजूला होताच माधवाची बहीण – उर्वशी भरत - काम करताना आढळते इतक्यात तिच्या दोन मैत्रिणी प्रवेश करतात)

**अनुसया** : (पडद्यात) उर्वे ! अग उर्वशी !

**उर्वशी** : (दाराकडून जाते व दार उघडते) अरे वा ! अनसू – प्रिये या या ! अगदी योग्य वेळेवर आलात ! बसून बसून कंटाळले गडे ! काय करायचे हेच कळत नाही, म्हणून हे भरतकाम करीत बसले आहे.

(प्रियवंदा व अनुसया प्रवेश करतात)

**अनुसया** : उर्वे ! काय साजसजावट आहे बाई तुझ्या खोलीत !

**प्रियवंदा** : हा तर राणीचा दिवाणखाना वाटतो बाई. आमची उर्वशी ही काही लंकेची पार्वती नाही तरी कोण ? उर्वशी !

**उर्वशी** : काय बाई तरी. थट्टा नाही हो बरी. कशाला जीव खाता मैत्रिणीचा. ज्याचे दुःख त्यालाच कळते. खोली जरी निटनेटकी तरी नशीब आहे फुटके. अगदी फुटके !

**प्रियवंदा** : काय ग ! काय झाले ! कशाला बोलतेस अशी ? मन मोकळे करून बोलावे मैत्रिणीशी काय दुःख आहे ?
सांग बाई तरी आम्हाला'

**अनुसया** : उर्वे ! सांग बाई मन मोकळे करून सांगावे मैत्रिणींना. सुखदुख तर गरिबांचे सोबती कुठून वाचतो आपण यातून ? आहे का ग कोणी ज्याने दुःख सोसले नाही ! दुःख तर सुखाचे प्रवेंशद्वार आहे. अग बाई दुःखरूपी चिखलातून सुखरुपी कमळ फुलते. अग वेडे दुखाःच्या दुष्काळानंतर सुखाचा सुकाळ येतो.

**उर्वशी** : सर्व कळते बाई, पण दादाचे पाहवत नाही ग ! आमचे, बैल मेले तेव्हा पासून ते वेडे झालेत. बाजारातून बैल विकत घेतले पण सावकार लागलेत त्यांच्या पाठीमागे ! पैसे त्यांच्याकडून घेतले होते.

अनुक्रमणिका

**प्रियवंदा** : काय उर्वे ? तुझ्या दादने सावकाराकडून पैसे घेतले व बैल विकत घेतले ! फार वाईट फार वाईट ! सावकाराकडून ऋण काढणे म्हणजे गळ्यात फास घालणे! हे सावरकर फार लुच्चे असतात –फार नालायक असतात मेले. व्याजासाठी जीव घेतात.

**अनुसया** : अग मला पूर्वीच का सांगितले नाहीस. मी माझ्या दादाला सांगून तुला पैसे मिळवले असते बरे, काळजी करु नकोस. मी भावाला सांगून पाहते. जर काही येईल तर बरे, काळजी करु नकोस. प्रिये बाजाराला उशीर होत आहे. पाय उचल.

**प्रियवंदा** : अग बाई, किती बोलत बसली. उर्वे निघते बाई. दुःखी होउ नकोस. आपली अनुसया काहीतरी करणार. अनुसया थोर मनाची आहे.
(दोघी निघतात व तेव्हाच उर्वशीचा भाऊ प्रवेश करतो)

**उर्वशी** : दादा आलात. किती उशीर लावलात. काही सोय लागली का? बसा मी चहा करते. किती घामोघाम झालात !

**माधव** : या दोघी कोण होत्या ? कुठे तरी याना पाहिलेल आहेसे वाटते.

**उर्वशी** : दादा, ह्या माझ्या शाळेतील मैत्रिणी आहेत. बाजाराला जात होत्या जाण्यापूर्वी त्या मला पाहायला आल्या. आमचे बैल मेले म्हणून त्या विचाराला आल्या होत्या.

**माधव** : फार चांगले. थोर मनाच्या आहे. पोरी असून त्यांना बुद्धी आहे. परंतू, त्या सावकाराला जरासे ही ज्ञान नाही. तो थोड्यावेळाने इकडे येणार आहे. म्हणून गोविंद सांगत होता.

**उर्वशी** : दादा, अनुसया काही तरी मदत करणार म्हणून सांगत होती. ती आपल्या भावाकडून आम्हांला जी मदत करता येईल ती करणार म्हणून तिने सांगितले. तिचा दादा फार थोर आहे.

**माधव** : ती अनुसया होती का ? ती चिमुरडी अनसू ! किती गोड पोरगी !

**उर्वशी** : हो का ! काही बोलली का ?

**माधव** : तिचा भाऊ आपल्याला मदत करणार म्हणून सांगितले. अग लबाडे तिच्या भावाला ओळखतेस ?

**उर्वशी** : नाही. कधीच पाहिले नाही (जणू खरोखर माहीत नाही)

**माधव** : अग वेडे ! परवाच्या दिवशी ज्याने तुला मोटारीतून घरी पोचवले तोच तो सुनील – सुनील तिचा भाऊ.

अनुक्रमणिका

**उर्वशी** : काय तोच सुनील. काय म्हणता दादा ! सुनील माझा........

**माधव** : हो तोच सुनील. वकील झाला तरी मानतो गरिबांना. फार सज्ञन माणूस ! आमचे बैल मेले तेव्हा पहिला माणूस म्हणजे तोच मला भेटला, मदत करु का? म्हणून विचारले होते. मी नाही म्हटले अन् या सावकाराच्या जाळ्यात फसलो. तो इतक्यात इकडे येणार आहे. पण काय सांगू त्याला.

**उर्वशी** : सांगा आठवड्यानंतर या ! आम्ही तुमच्या पैशाची सोय लावू .
(इतक्यात दारावर कोणी तरी ठोठावते.)
जा आत. तोच आला असेल (उर्वशी आत जाते)
(माधव दार उघडतो तोच सावकार प्रवेश करतो)

**सावकार** : वा माधव वा ! घरीच आहात छान ! बरे झाले नाही तर उगाच बसून वाट पाहावी लागली असती. कशासाठी आलो! माहीत आहे ना?

**माधव** : या मालक बसा.

**सावकार** : छान! शाबास! उत्तम! माणूसकी अजून जिवंत आहे तुझ्यात. ज्या निघून म्हणून सांगितले नाहीस फार उत्तम ! फार मजेदार ! आज वसुली जरुर मिळणार.

**माधव** : मालक मी काही तुमचे पैसे बुडवणार नाही. मी पै पै करुन तुमची पुंजी तुम्हाला परत करणार. परंतू आता काही माझ्याकडे नाहीत. थोडे दिवस वाट पाहावी लागणार मालक.

**सावकार** : काय माधव! काय! ! अरे आणखी किती वाट पाहू! तुला पैसे देऊन किती महिने झालेत. माझे हजार रुपये दोन हजार झाले असते दोनचे तीन, तीनचे चार झाले असते, चांगले.

**माधव** : काय मालक ! कोणी घेतले हजार रुपये तुमच्याकडून मी तर सहाशे रुपये घेतले होते. मग आता तुम्ही हजार कसे सांगता. हे चारशे रुपये कुठून आणलेत. कशावरून ?

**सावकार** : वा माधव! जणू तुला माझा नियम माहीत नाही. दहा महिने झाले तुला पैसे देऊन. या दहा महिन्यात त्या सहाशे रुपयांवर फक्त चारशे रुपयांचे व्याज आहे. मी तुझ्यापाशी दोन हजार नाही ना मागत.

**माधव** : तुम्हांला माझ्या घरची परिस्थिती काय ती माहीतच आहे. आणखी दोन महिने वाट पहा मग तुमचे सहाशे तुम्हाला परत करीन. तोपर्यंत माझ्यावर कृपा करा मालक. गरिबांच्या बुडत्या घराला तुमचाच आधार.

**सावकार** : माधव माझे रुपये मला आजच पाहिजे अन् याच वेळी. मी काही रिकाम टेकडा नाही दोन महिने वाट पहायला समजलास. मला माझे रुपये आता पाहिजे ! आताच !

**माधव** : पण ! आता मी कोठून आणू. शेतात पिके उभी आहेत. ती विकली की तुमचे पैसे परत करीन. मी काही चोर नाही. माझ्या अंगावरील वस्त्रे तरी पाहा. या दोन वर्षात एक सदरा विकत घेतला नाही किंवा माझ्या बहिणीसाठी एक लुगडे.

**सावकार** : काय बहीणीसाठी वा! वाह! वाह! बहिणीसाठी किती लुगडी लागतील ती मी देऊ शकेन. तुला किती सदरे पाहिजेत ते देईन. फार काय ते सहाशे रुपये जर तुला पाहिजेत तर ते पण तुला देईन. मात्र माझे ऐक ही माधव, माझे ऐक.

मी चालली गंगातिरी

**माधव** : (आश्चर्याने) मालक ! काय म्हणता? आपण आम्हाला ते सहाशे रुपये द्याल, देवा, खरोखर आमचे मालक मोठे दानी आहेत. मालक आपण फार महान आहात! फार थोर आहात. मी आपली कोणती सेवा करु. मी आपली कोणती पूजा करु. देव आहात आपण !

**सावकार** : माधव, माझी सेवा करु नकोस किंवा पूजा मांडू नकोस. तुझ्याजवळची एक सुंदर, मनमोहक, पाकळ्याप्रमाणे उमलंलेली एक गोड वस्तू दे म्हणजे झाले.

**माधव** : आम्हा गरिबांजवळ असली गोड वस्तू कोठून येणार. शेतात दिवसभर खपतो. माती हीच आमची सुंदर वस्तु. बैल हेच आमचे मनमोहक धन. पिके हीच उमललेली गोड वस्तु आहे ! यांना सोडून तुम्हाला द्यावयास आमच्या जवळ काय असणार ?

**सावकार** : आहे ! माधव आहे ! ती वस्तु मला दे. म्हणजे तुझे दरिद्र दूर होईल. तुला शेतात मरमरुन कष्ट करावे लागणार नाही. सुखात व आरामात दिवस जातील. तू फुलाप्रामाणे राहशील. समजलास !

**माधव** : परंतू मालक ती वस्तू मी आपणास कुठून देणार जी वस्तू माझ्या जवळ नाही. तुम्ही गरीबांची थट्टा करता का.

**सावकार** : माधव, ती वस्तू दुसरी, तिसरी नसून तुझी उर्वशी आहे. तुझी धाकटी बहीण! माधव! तुझी धाकटी बहीण !

**माधव** : (संताप असह्य होऊन) मालक क ॥ हे काय भलतेच सांगता. मला तुमच्याकडून ही अपेक्षा नव्हती. अहो मालक माझी उर्वशी तुमच्या सारख्या थेरड्याला देऊ ! जगातील सर्व तरुण मेलेत का ! लाज कशी वाटली नाही बोलायला अहो ! माझी बहीण, तुमच्या धाकट्या लेकीहून लहान आहे. तुम्हाला हे साहस कुठून आले.

**सावकार** : माधव, अरे असा लाल पिवळा होऊ नकोस कशाला रागावतोस? बहीण तुझी काय किंवा माझी काय ! तिचे लग्न तर करावे लागते नाही का? अरे लग्न लावताना म्हातारा अन्

अनुक्रमणिका

तरुण कशाला बघतोस, माधव ! तुझी बहीण लंकेची पार्वती असून इंद्राजवळची उर्वशी होणार. लक्ष्मी तीच्या पायाशी लोळण घेईल.

**माधव** : मालक ! तोंड संभाळून बोला ! समजलात. माझीं बहीण जरी लंकेचीं पार्वती असली तरी मी तीला इंद्राच्या दारातील भिकारीण करु इच्छित नाही. समजलात ! तुम्हाला लाजबीज आहे की नाही ? माझ्या गुलाबाच्या कळीप्रमाणे नाजूक बहीणीला तुम्हा थेरड्याला मी देऊ ? निघा, चालते व्हा इथून !

**सावकार** : माधव, अजून विचार कर! अजून विचार कर! मी काही तितका म्हातारा नाही. फक्त सत्तर वर्षे झाली मला. शंभराला अजून तीस वर्षे कमी आहेत. या तीस वर्षात मी उर्वशींला फुलाप्रमाणे ठेवीन. तिच्यावर माया करीन. विचार कर माधव ! विचार कर ! हुंडा दिला नाहीस तरी चालेल. लग्नाचे सर्व खर्च मी करीन.

**माधव** : मालक, चालते व्हा इथून चालते व्हा. सावकाराची धुंदी चढली आहे तुमच्या डोळ्यात म्हणून आंधळे झाला आहात. तुम्ही तुमची मुलगी मला द्यायला तयार आहात का ?

**सावकार** : काय माधव काय माझी मनू अन् तुला? एका फाटक्या शेतकऱ्याला! एका ऋणकोला. अरे पायरीववर असून कळसावर कशाला जाऊ इच्छितोस. माझा ऋणको अन् माझ्याशी ही भाषा ! माधव आता काय सांगतो ते नीट ऐकुन घे. एक तर मला उर्वशी दे, नाहीतर माझे सहाशे रुपये व चारशे व्याज आताच दे आता!

**माधव** : सावकारसाहेब ! कृपया इथून जा. संध्याकाळपर्यंत तुमच्या पैशाची व्यवस्था लावतो. तुम्ही इथून निघा. नाही तर मी स्वतःला सांभाळू शकणार नाही.

**सावकार** : जातो, जातो ! माझ्यावर हात उचलायची तसदी घेऊ नकोस उगाच शरीराला त्रास बसेल. परंतू संध्याकाळी मी माझे पैसे घेण्यास परत येईन. माझे पैसे मिळवून ठेव. नाहीतर माझ्यापेक्षा वाईट कोणी नसणार! (सावकार घाईघाईने निघून जातात)

**माधव** : (स्वगत) वा रे देवा ! काय ही तुझी लीला. आणखी किती अंत पाहशील. माझे बैल घेतलेस आता माझी ही झोपडी बुडवू नकोस (उर्वशीला हाक मारतो) उर्वशी ! उर्वशी !

**उर्वशी** : (प्रवेश करते) आले दादा. काय दादा, काय झाले ? घातली का त्याची समजूत. बराच वेळ ठाण मांडून बसला होता.

**माधव** : गेला आहे आता पण संध्याकाळी परत येणार आहे. आता मी निघतो संध्याकाळपर्यंत त्या नालायकाचे पैसे परत दिले पाहिजे माहीत आहे काय बोलत होता ? म्हणे माझे पैसे जर देता येणार नसतील तर उर्वशी मला दे.

**उर्वशी** : काय ? काय म्हणाला तो लुच्चा ? माझा हात मागतो तो सत्तर वर्षाचा जख्खड म्हातारा ? त्याला वेड तर लागले नाही ना ? दादा, मला का बोलावली नाही ? थोबाडून काढले असते त्याला. मेल्याने आपला चेहरा आरशात पाहिला आहे का ?

**माधव** : ते राहूदे आता त्याच्याशी आपल्याला कांही कर्तव्य नाही. मी पैशाची सोय लावायला जातो त्या सुनीलकडेच जातो (निघतो)

**उर्वशी** : (स्वगत) हे सावकार जणू कलियुगातील राक्षसच असतात. सत्तर वर्षाचा म्हातारा मेला, अन् म्हणतो माझ्याशी लग्न कर. माझा सुनील इथे असता तर धूळ खायाला लावली असती त्या थेरड्याला ! का नाही लावीत लग्न आपल्याच मुलीशी ? (दार ठोठावण्याचा आवाज) (उर्वशी जाते दार उघडते)

या, आत या, हे घर आपलेच समजा –

**सुनील** : ताई बाजाराला जाताना भेटली. मी कचेरीतून बाहेर येत होतो. इतक्यात ती दिसली आणि …………

**उर्वशी** : बसा ! असे उभे का ? आमच्याकड बसायचे नाही. हा कोट ठेवा खाली. मी चहा आणते.

**सुनील** : नको, नको ! आता कोला घेतला आहे. उगीच तसदी घेऊ नकोस.

**उर्वशी** : अच्छा ! आमच्या घरचा चहा प्यायचा नाही. का माझ्या हातचा पिणार नाही.

**सुनील** : उर्वे ! ही भाषा शोभते का तुला? अग तुझ्या हातचा पिणार नाही तर कोणाच्या हातचा पिणार? पण आताच कोला घेतला आहे ना ! म्हणून नको. अग आजच काय ? जन्मभर तुझ्या हातचा चहा मी पिणार. बस झाले ना समाधान.

**उर्वशी** : जन्मभर ! वा ! आमच्या नशीबी कुठे आहे तसे.

**सुनील** : का ? काय झाले अन् इथे नशीब कशाला घालतेस.

**उर्वशी** : कुठे आपण. व कोठे मी ! मी पडले एका शेतकऱ्याची बहीण आणि आपण एका श्रीमंताचे चिरंजीव वकील झालेले.

**सुनील** : उर्वे, हे आपण आपण केव्हापर्यंत बोलत बसशील. अग, मी वकील असेल दुसऱ्यांसाठी, श्रीमंत असेन दुसऱ्यांसाठी, पण माझ्या उर्वशीसाठी नाही. उर्वे ! खरोखर माझ्या मनात हा भेदभाव नाही.

**उर्वशी** : आपण आता असे म्हणत आहात पण नंतर - - - -

अनुक्रमणिका

**सुनील** : आणखी आपण, अग मी काय तुझ्या आजोबाप्रमाणे आहे का ? आपण आपण करतेस. अरे तुरे बोल . अहोच्या ऐवजी अरे सुनील म्हटलस तर काय मजा होईल. मात्र आता आपण नको- मला आपण आपण करायला कचेरीत पुष्कळ लोक आहेत. पण फक्त एक तुच आहेच जी मला अरे तुरे करणार. अन तु सुध्दा बसलीस आपण आपण करत.

**उर्वशी** : बरे ! चुकले मी. काय म्हणत होते मी. की आपण - - - नाही तुम्ही. तु माझ्यावर प्रेम करतोस , पण तुझ्या वडिलांना ते आवडेल काय ? तु माझ्यावर प्रेम करतोस. मी तुझ्यावर प्रेम करते हे जरी आपल्याला हृदया पासून मान्य आहे तरी मोठी माणसे काय म्हणतात ते आपण पहायला नको काय ? ती माणसे केव्हा काय म्हणतील कोणास ठाऊक ?

**सुनील** : उर्वशी ! माझे वडील काही पूर्वीपासून श्रीमंत नव्हते. ते सुध्दा तुझ्या भावाप्रमाणे शेतात दिवसभर खपायचे. मर मरुन कष्ट करायचे. पण आता गेले ते दिवस आज आमच्याकडे भरपूर जमीन आहे. एक कारखाना आहे. तरी सुध्दा माझे वडील बदलले नाहीत. ते नेहमी म्हणतात. की माणसाने गोर गरीबांवर दया केली पाहिजे.

**उर्वशी** : पण सुनील ! ते मला आपली सून म्हणून मान्य करतील काय?

**सुनील** : अग वेडे ! त्यांनी तर तुला आधीपासून सून म्हणून मान्य केली आहे. आई म्हणते की माधव फार सज्जन आहे व त्याची बहीण ही प्रत्यक्ष लक्ष्मीचा अवतार आहे मी तीलाच माझ्या सुनीलसाठी पाहणार.

**उर्वशी** : वा ! वकीलसाहेब वा ! म्हणजे देवाची पूजा करण्यापूर्वी ती तुम्हांला पावली असे म्हणायचे ! वा ! आईला सुध्दा मी आवडते. तर मग चला आताच लग्न लावू.

**सुनील** : नाही, नाही! आताच लग्न नको. लोक हसतील आपल्याला.

**उर्वशी** : लोक हसतील किंवा रडतील अथवा आम्हांला बघून जळतील. मी तर लग्नाला सुरुवात करते. ऐका ओम स्वाहा. ओम आळू भाजी नमः स्वाहा ओम् सुनील-उर्वशी नमः स्वाहा ओम् घर-दार सेठ सावकार नमः स्वाहा

**सुनील** : हा ! हा ! हा ! वा रे पंडीत ! वा ! पंडीत असावा तर असा. मंत्र म्हणावा असा जसे गाढव खुशीत असते तसे. वाह ! रे ! वा असला पंडीत दिवा घेऊन शोधला तरी सापडणार नाही. कागदी काशीहून आलेला आहे हा पंडित.

**उर्वशी** : अरे, मी तुला पंडीत वाटते का ! मी एक साधी मुलगी आहे.

**सुनील** : वा फार छान ! असो ! आता मला गेले पाहीजे.

**उर्वशी** : काय आताच निघालात ! मग मी एकटीच रडत बसू. तू गेलास की ही खोली मला खायला येईल. आणखी थोडा वेळ थांब ! दादा आले की मग जा.

**सुनील** : छान दादाचे नाव काढलेस. उर्वे एक. सांगू का.

**उर्वशी** : सांग ! सांग ! वाटेल ते सांग. खुशाल सांग.

**सुनील** : उर्वे , मला त्या सावकाराबद्दलची सर्व माहीती मिळालेली आहे.

**उर्वशी** : काय? सर्व माहिती मिळालेली आहे. त्या मेल्या थेरड्याबद्दल ! माहीत आहे काय बोलत होता तो ? म्हणे सहाशे रूपये देता येत नसतील तर उर्वेचा हात माझ्या हातात दे. उर्वे, जणू पडवीतील गाय आहे. वाटेल त्याने सहाशेसाठी घेउन जावे. तोंड पाहिले आहे कधी आरशात त्या थेरड्याने ?

**सुनील** : काय असे म्हणाले दादाला ? अन् दादाने त्याला काहीच सांगितले नाही.

**उर्वशी** : काय म्हणतोस काय सुनील. दादाने थोबाडून काढले असते पण, त्याच्या वयाकडे पाहून ते गप्प राहिले.

**सुनील** : मग मला दादाला आताच भेटले पाहिजे. रागाउ नकोस उर्वे. त्या सावकाराला देण्यासाठी हजार रुपये मी बरोबर आणले आहे. नाही तर म्हणशील. मी फाजील उपकार दादावर करीत आहे.

**उर्वशी** : काय, हजार रूपये आणले आहेस ! फार उपकार आहेत तुझे ! फार उपकार सुनील खरोखर फार उपकार आहेत आमच्यावर.

**सुनील** : उर्वे, यात उपकार काय ? तू अगदी लहान होतीस तेव्हा तुझ्या दादाने आमच्यावर उपकार केले नसते. तर आज मी वकील झालो नसतो.

**उर्वशी** : काय ? दादाने कोणतो उपकार केले होते तुझ्यावर ? सांगा! म्हणून उपकाराची परतफेड म्हणून करावयास आला आहात ?

**सुनील** : उर्वे, ही उपकाराची परफेड नाही माणसातील माणूसकीची खूण आहे. दादाने मला पुराच्या पाण्यातून जिवाची पर्वा न करता वाचवले नसते तर मी स्वर्गाला केव्हाच पोहोचलो असतो उर्वे ! दादाने मला जीवन दान दिले आहे. मग दादा आता संकटात असताना मी त्याला मदत केली तर ती परतफेड मानशील का?

**उर्वशी** : खरोखर, थोर मनाचा आहेस सुनील. मग माझ्यावर प्रेम करतोस, तो सुध्दा त्यातला प्रकार नाहीना ?

अनुक्रमणिका

**सुनील** : प्रेम उपकाराने होते का ? प्रेम तर दोन आत्म्यांचा पुकार, दोन हृदयांचा संगम आहे, दोन जिवांचे मिलन आहे.
(दार ठोठावण्याचा आवाज) सुनील दार उघडतो तोच प्रियवंदा, अनुसया व सावकाराची मुलगी मंदा प्रवेश करतात)

**प्रियवंदा** : अनसू ! काय भानगड आहे. कचेरी अलीकडे इकडे असते का ! कोणाची फिर्याद चालली आहे ?

**अनुसया** : सुनील ! तू इकडे ! अन या वेळी ! आम्हाला भेटलास तेव्हापासून इकडेच आहेस का? तसे दिसतच आहे.

**सुनील** : दादाला भेटण्यासाठी आलो होतो, पण ते घरी नाहीत म्हणून बोलत बसलो थोडा वेळ.

**प्रियवंदा** : दादाला भेटण्यासाठी ! वा रे वा ! दादा बिचारे वण वण करीत आहेत; सुनील वकीलांना शोधण्यासाठी. अन वकीलसाहेबांची स्वारी दादांच्या घरी ! चित्रपटातील अभिनेता शोभतोस खरा.

**सुनील** : प्रिये ! जीभ ओढू का तुझी ? तुझी वटवट कधी पुरे होत नाही जणू माझी जन्माची वैरीण. मावशी कुठली.

**अनुसया** : प्रिये सुरू झाली परत वकिली. अरे सुनील तू काय करीत होतास आता पर्यंत ? घरी चल तुझी खोड मोडवते म्हणे बसलो थोडा वेळ

**सुनील** : ताई ! मोटारीत नेणार नाही घरी एक शब्द काढणार असशील तर ! अग ! ही कोण ? कोणाला उचलून आणलीस बरोबर ?

**प्रियवंदा** : ही आमची मनू आहे सावकाराची लेक मंदा - -

**उर्वशी** : काय मनू ! ही आपली मनू इतकी मोठी झाली. मनू, मात्र तू सावकारी करू नकोस गडे !

**मंदा** : उर्वे ! येताना मनातून भीती वाटत होती. जा म्हटले असतेस तर माझी फजिती झाली असती.

**अनुसया** : माझी उर्वशी तशी नाही. माझ्या वयनीसाहेबांना अशी नावें ठेऊ नका. फार गुणाची आहे आमची वयनी.

**सुनील** : ताई ! काय चालवल आहेस ! कुठे काय बोलावे याची शुद्धी आहे का तुला? लागलीस बडबडायला.

अनुक्रमणिका

**अनुसया** : तू एक शब्द काढू नकोस. घरी चल बाबांकडून तुझी वकीली झाडावर चढवते. बडबडते ना मी पाहू या.

**मंदा** : सुनीलदादा रागावू नका. आज नाहीतर उद्या सर्वांना आमची वहिनी साहेब कळणारच.

**उर्वशी** : पुरे पुरे ! नाहीतर जीवंत खाऊन टाकाल आम्हांला. पहा दादा आलेच की. (माधव प्रवेश करतो)

**माधव** : मंदा आपण इकडे. तुमचे बाबा येतील इतक्यात. कशाला आलिस या पडक्या झोपडीत दुःखी व्हायला

**मंदा** : येऊ द्या त्यांना. आता मला त्यांची काही भीती वाटत नाही. मी आता इथेच राहण्यासाठी आले आहे. किती दिवस पडवीतील गाईप्रमाणे राहणार.

**माधव** : मंदा, हे काय तू— आपण. तुम्ही मांडले आहे. तुझे बाबा येतील इतक्यात. ते कर्दनकाळ आहे. तुला— तुम्हाला माझ्याकडे पाहिले तर काय म्हणतील. आता काय म्हणतील ते म्हणू द्या.

**मंदा** : माधव ! आता काय ते सर्व सांगून टाक याना. नाहीतर तुम्ही—आपण करीत बसाल.

**उर्वशी** : दादा ! हे सर्व काय आहे. कधी तुम्ही- कधी आपण !

**माधव** : हिचे काय अैकतेस ग-मनू ! तू एक शब्द बोलू नकोस. तुला माझ्या गळ्याची शपथ. एक शब्द बोलू नकोस.

**प्रियवंदा** : मनू ! तुमचे काही एकचे दोन, दोनचे एक झाले नाही ना ! का मनू सांग बाई.

**माधव** : मनू ! तुला माझ्या गळ्याची शपथ.

**मंदा** : सर्वानी ऐका. आजपासून तीन वर्षातूर्वी माझे व याचे एकमेकावर प्रेम बसले आहे. पण बाबांच्या भीतीमुळे हे पुढे यायला धजत नाहीत म्हणून मी इतके साहस केले आहे.
(दारावर कोणी ठोठावतात सावकार प्रवेश करतो)

**सावकार** : माधव ! आता मी काही जास्त वेळ थांबू शकणार नाही. माझे पैसे मला परत कर. माझी लेक घरातून निघाली असून माहीत नाही कुठे गेली आहे. (तोच त्यांना मंदा दिसते) मनू ! तू इकडे याच्या कडे कशासाठी---- इकडे काय करीत आहेस?

**सुनील** : सावकारसाहेब ! आपले किती रुपये आहेत ते सांगा

**मंदा** : सुनीलदादा ! यांना काहीच देऊ नका. हे माझे बाबा मानवाच्या स्वरुपात दानव आहेत. उलट त्यांनी माधवाला पैसे व जमीन परत केली पाहिजे. काहीच देऊ नका त्यांना.

**सावकार** : मनू ! ही काय वटवट करीत आहेस ! तू काही भानावर आहेस का ? घराची अब्रू बाहेर कशाला काढतेस. तुला इकडे यायला कोणी सांगितले हे मला कळत नाही, जा घरी आधी नाहीतर तुला इथेच बडवीन.

**मंदा** : बाबा ! आता तुम्हाला ऐकून वाईट वाटेल. पण त्याला मी जबाबदार नाही. मी या घरात नेहमीसाठी आले आहे. इथून जाण्यासाठी नाही माधव ! सांग रे आपण किती वर्षांपासून एकमेकांवर प्रेम करतो.

**सावकार** : काय मंदा काय? माझ्या ऋणकोवर प्रेम करतेस. तुझे लग्न ठरले आहे हे तुला माहीत आहें ना ! चल घरी तुला मजा चाखवतो. वाटेल त्याच्याशी लग्न करायला निघालेस.

**मंदा** : बाबा ! कशाला येऊ त्या घरात मरायला. माधव ! हे घे तुझ्या जमिनीचे सर्व कागदपत्रे व जमीन गहाण पत्र.

**माधव** : हे कागदपत्रे तुझ्याकडे कसे? आज तीन वर्षे हे कागदपत्र व जमीन गहाणपत्र शोधीत आहे. सुनिल हे कागदपत्र बघ जरा

**सुनील** : (नीट पाहून) दादा ! सावकराकडे जितकी जमीन व संपत्ती आहे ती त्यांची नसून तुमची आहे. दादा तुमची आहे.

**सावकार** : मंदा ! हे काय केलेस ! (रागाच्या भरात माधवाच्या डोक्यावर काठीने प्रहार करतो) (माधव जख्मी होऊन खाली पडतो. सुनील त्याला संभाळतो)

**सुनील** : आता कोर्टात तुम्ही या पराक्रमाची मजा चाखाल. आताच पोलीसाला बोलावतो व तुम्हाला अटक करवितो.

**सावकार** : (घाबरून) नको बाबा ! वाटेल ते करा. माझी लेक घ्या. माझे घरदार घ्या. सर्व जमीन जुमला घ्या पण पुलिसाला बोलावू नका या वयात नको ही शोभा माफ करा मला.

**माधव** : सुनील राहू दे ! मेलेल्यांना कशाला मारता. आपली चूक त्यांनी सर्वासमक्ष कबूल केली, यातच त्यांची शिक्षा त्यांना मिळाली.

**मंदा** : माधव ! तू यांना क्षमा करतोस. फार थोर मनाचा आहेस (बाबांकडे पाहून) बाबा! यांच्याकडून काही चांगले गूण शिका. यांच्या धनावर व श्रीमंतीवर जगलात. त्यांना किती छळलात दुख दिले. तरी ते तुमच्यावर रागावले नाहीत. आतापासून तरी चांगले व्हा. माणूसकीची ज्योत तुमच्यात पेटवा.

अनुक्रमणिका

**सावकार** : पोरी! खरोखर मी मानवाच्या स्वरुपात दानव होतो. पण आता माझ्यात तुमच्यामूळे साफ प्रकाश पडला आहे. पोरी मी माझे काळ तोंड दाखवण्यासाठी इथे पळ सुद्धा राहणार नाही. देव तुम्हा सर्वांचे कल्याण करो. मी चाललो गंगातिरी
(ते जाऊ लागतात. मंदा त्यांना अडवते)

- इतिश्री -

अनुक्रमणिका

# नशिबाचे नऊ गिऱ्हे

देवजी पाढिया चन्द्रावरकर

अनुक्रमणिका

# नशिबाचे नऊ गिऱ्हे

[मध्यमवर्गीय गृहस्थाची खोली. कोपऱ्यात एक साधे कपाट जवळ एक मेज व दोन खुर्च्या, भिंतीला एक खाट उभी केलेली आहे. उजव्या बाजूला कृष्णमूर्तीचे आसान. पडदा उघडताच यादव कुटुंबासह प्रार्थना करीत असतांना दिसतो.]

**यादव** : यशोदे, सर्वाच्या हातावर तीर्थ वाढ [मुलांकडे पाहून] चला रे पोरांनो, आपली पाटी-दप्तर तयार करा. शाळेची वेळ झाली पळा [मुले दुसऱ्या खोलीत जातात] [यशोदेला] यशोदे, बाबासाठी थोडे दूध गरम कर अलिकडे त्यांची प्रकृति फार खलावत चालली आहे.

**यशोदा** : सकाळीच दूधवाली म्हणाली की उद्यापासून ती दूध घालणार नाही. गेले तीन महिने तिचे पैसे तिला मिळाले नाहीत. ती म्हणाली, आज पगाराचा दिवस आहे म्हणून संध्याकाळी तो पैसे घ्यायला परत येणार.

**यादव** : तिचे म्हणणे योग्यच आहे यशोदे, ती बाई आणखी किती वाट पाहणार. आता आमचे नशीब फिरले आहे. काल तो भाजीवाला मला म्हणाला, "यादवदादा, भाज्यांचे पैसे द्या. किती वाट पहायची आणखी" कोण इतके दिवस फुकट भाज्या देणार.

**यशोदा** : काल मालक पण आले होते ते म्हणाले, "यादवाला म्हणावे की चार महिने झालेत. पैसे काही आमच्या हाती लागले नाहीत सर्व देता येत नसतील तर थोडे थोडे करून द्यावे नाहीतर पुष्कळ होणार. तुम्ही त्यांना भेटावे असे ते म्हणाले.

**यादव** : खरे आहे यशोदे, काय करू. चार महिने झाले परंतू त्यांना काहीच देता आले नाही ते फार सज्जन आहेत. दुसरे कोणी राहिले असते तर घरातून घालवून दिले असते पण त्यांना हृदय आहे. देव माणूस आहे. गोरगरिबांवर फार दया करतात संध्याकाळी जाऊन भेटतो त्यांना. [मुले शाळेत जायला निघतात]

**शशिकांत** : बाबा निघालो आम्ही शाळेला. आता पुस्तकाशाठी पैसे द्या काल रात्री म्हणाला होता ना की आज आम्हाला पैसे देणार बाबा, द्या ना लवकर. द्या ना, नाहीतर शाळेला उशीर होणार

**सूमन** : बाबा, मला वह्या नाहीत. काल म्हणाला होता की आज देणार म्हणून आता द्या ना बाबा, दादाला पुस्तकांसाठी पैसे व मला माझ्या वह्यासाठी.

**यशोदा** : अरे, हे काय चालवला आहात! देतील ना आणून. त्याचे डोके जायची पाळी आली आहे कशाला त्यांना आणखी कटकट देता. आजचा दिवस पुस्तकावाचून काढलास तर तुझे काय बिघडणार आहे रे शशी अन् तुझे ग सुमे! आजच इतकी घाई लागली तुला ? आणून देतील नंतर, चला आता मास्तरांना म्हणावे बाबा आणतील संध्याकाळी. चांगली मुले आईबाबांचे ऐकतात.

अनुक्रमणिका

**शशिकांत** : मग आम्ही नाही ऐकत का ग आई? पण वर्गात कोणीही मला पुस्कात पाहायला देत नाही. म्हणतात तुझ्या बाबांना पगार मिळत नाही का? का नाही देत तुला पुस्तक.

**सूमन** : आमच्या बाई म्हणतात, तुझे बाबा सुद्धा शिक्षक आहेत. मग तुला वह्या देत नाहीत.

**यशोदा** : त्यांना बोलायला काय जाते? ज्याच्यावर आभाळ कोसळतो आहे. त्यालाच माहीत आहे!

**यादव** : शांत हो यशोदे, शांत हो तू ! मुलांसमोर असे बोलायचे नसते मुले तर देवाची फुले आहेत. त्यांना दुखवणे बरे नाही (मुलांना पाहून) हो, हसा पाहू सुमाताई ! का हो शशी महाराज ! रागवलात वाटते ! माझ्या सुमेला वह्या पाहिजेत अन् शशिला पुस्तके होय ना. मग झाले. संध्याकाळी तुमच्या वह्या अन् पुस्तके तुमची वाट पाहणार. आमच्या सुमाताईला डॉक्टर व्हायचे आहे. हो ना. आमच्या शशिमहाराजांना इंजिन्यर व्हायचे आहे. बरं संध्याकाळी नक्की देईन. गाल फुगवू नका. शाळेत जातांता मुलांनी हसत खेळत जायचं असते. हसा पाहू आता छान. शशि, तू हसत नाहीस ? तुझा राग गेला नाही वाटते.

**शशि** : बाबा, आपण नेहमी असे म्हणता पण वेळेवर पुस्तक देत नाहीत. शाळेत आम्हाला मुलांचे बोलणे ऐकावे लागते. मास्तर आमच्यावर राग राग करतात.

**यादव** : शशिमहाराजांच्या सेवेस हा गुलाम जीव द्यायला सुद्धा तयार आहे. तुला माझ्या गळयाची शपथ, संध्याकाळी तुला तुझे पुस्तक व इतर साहित्य मिळतील.

**सूमन** : अन् माझ्या वह्या त्या मिळतील की नाहीत. माझ्या मैत्रिणी मला हसतात. बाई सारख्या बोलतात. मला त्या शाळेत जावेसे वाटत नाही.

**यादव** : असं बोलू नकोस सुमे. शाळेत जाणार नाहीस तर डॉक्टर कसे होशील. तुझ्या चेष्टा करतात. बाई बोलतात म्हणून मनातून राग मानायचे नाही. संध्याकाळी तुझ्या वह्या तुला मिळतील. निघा आता. ( यादवाला नमस्कार करून निघतात ) [यादव एकदम निराश होतो]

**यादव** : [स्वगत ] वा रे नशिबा ! तुझी सत्ता किती मोठी आहे. या सर्व जगात मीच कसा सापडलो तुला. गेले पाच महिने आनंदाचा सूर्य उगवताना मी पाहिला नाही. बाबांची ही दुःखी अवस्था आज मला पाहवत नाही. आईकडे पाहून हृदय भरून येते. मुलांची दुर्दशा माझ्याने पाहवत नाही. त्यांना वेळेवर चांगले खायला नाही चांगले प्यायला नाही, वह्या पुस्तके नाहीत. पाच महिन्यात बाबांच्या आजारापायी एक पैसा देखील राहत नाही. नशिबा! काय तुझी करामत!

**यशोदा** : अहो ! नशिबाला काय दोष देता. दुःखाची सावली आमच्यावर सतत राहणार नाही. तिमिरातूनच आपण प्रकाशाकडे जातो. माझ्या ह्या बांगड्या घ्या नेऊन सोनारकडे

अनुक्रमणिका

विका. त्या त्या पैशांतून मामांजीसाठी औषधे आणा, मुलांसाठी वह्या पुस्तके घ्या येतांना दुकानातून इतर पदार्थ आणा.

**यादव** : यशोदे ! किती महान आहेस ग तू ! किती थोर आहेस. तू फक्त माझी बायकोच नाहीस. वेळप्रसंगी तू माझी मैत्रीण, माझे गुरु माझा देव आहेस. तुझ्याबद्दल मला फार अभिमान आहे. तू अनसूयेसारखी थोर, सावित्रीसम महान, सीतेप्रमाणे आदर्श नारी आहेस. आमच्या गृहस्थाश्रमाचा खरा मान तुझा आहे. पण यशोदे तुझ्या ह्या बांगड्या माझ्याने विकता येणार नाही ग . विकता येणार नाही.

**यशोदा** : मला थोर मानू नका किंवा मला महानता देऊ नका. तुमचे दुःख ते माझे दुःख ह्या बांगड्या मला मामांजीच्या जीवापेक्षा प्रिय नाहीत, मुलांच्या शिक्षणापेक्षा प्रिय नाहीत तुमच्या अब्रुपेक्षा त्या मला प्रिय नाहीत. देवाची कृपा झाली तर बांगड्या पुन्हा मिळतील. परंतु आता मला ह्या नको. घ्या निघा लवकर.

**यादव** : तुला काय सांगू हेच मला सुचत नाही, मी माझ्या ह्या नशिबाला विष म्हणू का अमृत ! बांगड्या घेतो ! ! बाबांच्या प्रकृतीसाठी घेतो . मुलांच्या शिक्षणासाठी घेतो पण तुला वचन देतो यशोदे की एके दिवशी मी तुझे दोन्ही हात बांगड्यांनी भरून काढणार. देव माझी परीक्षा घेतो आहे. मी निघतो आता. बाबांकडे विशेष लक्ष दे [यादव निघतो तोच आई त्याला हाक मारते ]

**आई** : यादव ऽ ऽ

**यादव** : काय आई.

**आई** : बघ तुझे बाबा कसेसे करीत आहेत. [यादव बाबांच्या खोलीत जातो ] [ बाबांना याच खोलीत आणतात.]

**यशोदा** : आई ग ! हे काय होत आहे देवा ! तझ्या या मुलांचे किती पाहशील आमच्या हातून कोणते पाप घडले आहे. हे नशिबाचे नऊ गिऱ्हे आणखी किती दिवस आमच्या पाठीशी लागून राहणार ? दया कर देवा दया कर.

**आई** : यादव, माझ्या लेका बघ तुझ्या बाबांची दशा नाही पहावत मला. काही तरी कर माझ्या बापा! तुझ्या वडिलांचा जीव वाचव लेका. औषध घेऊन ये. वैद्याला बोलव.

**यादव** : होय आई, मी टांगा घेऊन घेतो. बाबांना रुग्णालयात नेऊ.
[यादव निघतो ]

**आई** : शांती कुठे गेलीस माझी. हे बघ तुझे बाबा कसे करीत आहेत.

**यशोदा** : सासूबाई धैर्य धरा. असं म्हणून नका. मामांजीचे सर्व बरे होणार शांती देवळात गेली आहे. ती येणार इतक्यात. तुम्ही दुःख आवरा. असे रडू नका. देव सर्व बरे करणार.

**आई** : सूनबाई, माझे काळीज फाटू पाहते. चाळीस वर्षे लग्नापासून एकत्र आहोत. मला काही सुचत नाही. माझ्यावर आकाश पडते जणू. ती शांती अजून का देवळातून येत नाही. अलीकडे ती आपल्या बाबांसाठी किती देव देव करते ! किती व्रत ठेवते. देवाला आमची करूणा का जात नाही . [शांती प्रवेश करते. बाबांना खाटेवर पाहून ती अस्वस्थ होते.]

**शांती** : हे काय झाले आई ? बाबांना काय झाले वहिनी ? दादा कुठे आहे ?

**यशोदा** : तुझे दादा टांगा पाहायला गेले आहेत . तू मामांजीची मान नीट धर मी त्यांना औषध पाजते.

**आई** : पाज सूनबाई पाज. तुझ्या हाताचा गुण येऊ दे त्यांना. तू सूनबाईच नाहीस, तू या घराची लक्ष्मी आहेस. या घराचा प्रकाश आहेस. पाज माझी आई पाज !

**बाबा** : सूनबाई , किती जपता मला ! शांती, तुजे दादा कुठे ? यादव माझ्या लेका, कुठे आहेस मुला? शांती, आई कुठे ? शशि कुठे, सुमा कुठे ? सर्व या माझ्याजवळ, मला बरं वाटत नाही आता? मला रुग्णालयात न्या. फार दम येतो आहे. देवा मला काय होतो आहे ?

**शांती** : बाबा, शांत व्हा. तुम्ही बोलू नका तुम्हाला श्रम होतो आहे शांत व्हा आता.

**बाबा** : शांते, मला बोलू दे पोरी, सूनबाई तुमचा चेहरा का उतरला. माझ्यासाठी तुम्ही स्वतःला झिजवता किती. अग! तू तरी मुलांना धीर दे की ! माझी इतकी काळजी का घेता. मी इतक्यात तुम्हाला टाकून जाणार नाही. मला अजुन पुष्कळ जगायचे आहे. पुष्कळ पाहायचे आहे.

**आई** : आपण शांत व्हा. आपली तब्यत बरी नाही. आपण बरे झालात मग बोला. आता मात्र शांत व्हा.

**बाबा** : तुम्ही सर्व उगीच काळजी करीत आहात. मी काही तुम्हाला सोडून देवाघरी जाणार नाही. मी आणखी खूप खूप जगणार आहे. मला शशिमहारांजाची बायको पहायची आहे. सुमेच्या मुलांबरोबर खेळायचे आहे.

**आई** : अहो ! आपण शांत व्हा ना ! किती बोलता !

**शांती** : ते पाहा दादा आले.

**यादव** : बाबा ! चला, टांगा तयार आहे. यशोदे, तू बरोबर ये. आई तुम्ही घरीच रहा.

अनुक्रमणिका

**बाबा** : यादव ! यादव माझ्या मुला ! किती रे त्रास होतो या म्हाताऱ्या साठी (यादव यशोदेसह बाबांना घेऊन रुग्णालयात जातो. शांती व आई मागे राहतात. शांती मुकुंदाकडे पाहून )

**शांती** : वा मुकुंदा ! किती अंत पाहतोस. आणखी किती अंत पाहशील ? अरे तू नाथांवर कृपा केलीस, नामदेवाला पोटाशी धरलास जनाबाई मदत केलीस. पांडवांना संकटातून वाचवलास, मिराला तुझ्यात एकरूप केलास, मग माझी हाक तुला का ऐकू येत नाही, आमची संकटे तरी दूर कर देवा! बाबांची प्रकृती शुद्धरू दे. त्यांना एकादाचें बरे वाटू दे.

**आई** : शांती, त्या दगडाला कशाला विचारतेस. तो पंढरपुरी मजेत विटेवर उभा असेल. नाहीतर व्दारकेत रूकमिणीच्या सहवासात आनंद लुटत रमला असेल. त्याला कुठे ऐकू जाईल तुझी हाक फुकट त्याच्या दारी दयेंची भीक मागतेस पोरी.

**शांती** : आई, असे बोलू नकोस! तो सर्वांवर दया करणारा आहे. द्रौपदीसाठी धावत आला होता की नाही. मगराच्या तोंडून गजाला वाचवला होता की नाही. प्रल्हादाच्या सिंहाचे रूप घेऊन वाचवला होता की नाही. आई, देव आपल्यातील दृढता पाहतो आहे. तो दयासागर आहे. तो जरूर दया करणार, जरूर दया करणार [गणपतराव प्रवेशतो ]

**गणपत** : दया ! कोण सर्वावर दया करणारा आहेच मी ! मी आहे तसा गरीबावर दया करणे हे तर आमचे वंशिक कर्तव्य आहे. पाटलाचा मुलगा आहे. अडचणीच्या वेळी तुमच्या सारख्यांना मदत करणार नाही तर कोणाला करणार. त्यातल्या त्यात यादव माझा बालमित्र आहे.

**आई** : गणपतराव आम्ही देवाच्या दयेविषयी म्हणत होतो. तुझ्या दयेविषयी नाही. तुझी दया तर सर्व जगाला माहित आहे. ते असो ! कशासाठी आलास ? किती वेळा तुला म्हणटले आहे की यादव नसेल तेव्हा इकडे येऊ नकोस पण तू ऐकत नाहीस. यादव आपल्या बाबांना घेऊन रूग्णालयाला गेला. त्याला भेटायचं असेल तर जा तेथे.

**शांती** : [रागाने] आई, त्या कशासाठी सांगता. त्या नालायकाला ह्या घरात यायला धाडस कसे झाले. आई, याला इथून जाण्यास सांग नाहीतर मी त्याचे रक्त पिऊन टाकणार. लाज कशी वाटली नाही इकडे यायला?

**आई** : का रे गणपत हिला काही बोललास का ? की हिचा अपमान केलास ! बोल. का गप्प आहेस आता !

**गणपत** : हिचे काय ऐकतेस! ती नेहमी अशीच बडबडते. तिचे व माझ पटत नाही. ती माझ्याविषयी आणखी काय काय बडबडणार ते तिच्या मनालाच माहीत आहे.

**शांती** : अरे लुच्चा, हरामजादा मी बडबडते. आई हा दादाचा बालमित्र असला तरी माझा काळ आहे. आई हा शंकराचा गणपत नसून त्याच्या गळ्यातील विषारी भुजंग आहे.

अनुक्रमणिका

**आई** : शांती , काय झाले पोरी ? हा तुला बरे – वाईट बोलला.

**गणपत** : मी तिला कशाला बरे–वाईट बोलू ! माझ्या मित्राची बहीण. मी काही तितका नीच नाही.

**शांती** : अरे मुद्दा ! तू नीच नाहीस तर कोण मी नीच आहे ! आई! मी तुला सर्व सांगणार होते . पण बाबांचा आजार पाहून मी गप्प राहिले. देवळातून येतांना याने तलावाजवळ भर रस्त्यात माझा हात धरला. माझ्या पदराला हिसका देत म्हणाला “त्या देवळातील दगडाला कशाला पूजतेस माझी पूजा केव्हा फेडशील. तुझ्या उमललेल्या कमळातील मधूकण केव्हा देशील?”

**आई** : अरे राक्षसा तुला हे साहस झाले कोठून ? यादवाला हे कळले तर ! !

**गणपत** : शांती, कशाला तू माझ्या सारख्या निष्पाप माणसावर खोटा आळ आणतेस . मी पाटलाचा मुलगा. संबध गावचा आवडता. तुझ्या दादाचा बाळमित्र तुझ्या दादासमोर असे बोलशील तर त्याला काय वाटेल. मला नावे ठेवतेस म्हणून तो तुझ्यावर रागावणार. मात्र पुन्हा असं बोलू नकोस.

**शांती** : नीच, तुला माझ्याकडून जी अपेक्षा आहे ती कधीही पूर्ण होणार नाही चालता हो.

**गणपत** : अगदी खोटे, साफ खोटे. मला कधीही अपेक्षा नाही तुझ्याकडून. मी हिचा हात धरला नाही, किंवा तिच्या पदराला हात लावला.नाही. देवळातून निघाली असता तिचा तोल जाऊन ती पडली असती तितक्यात मी पोहोचलो अन् तिला सांभाळले. आता म्हणते की तिच्या पदराला हात लावला. खासा न्याय. उपकाराचे चांगले फळ देतेस शांती ? पुष्कळ धन्यवाद पुष्कळ धन्यवाद.

**शांती** : अरे पुन्हा पुन्हा माझे नाव घेऊ नकोस. देवासाठी इथून निघून जा. तुला फक्त शांतीचा नारीचा अवतार दिसला आहे तिचे भवानीचे स्वरूप अजून दिसले नाही. तुला जीव प्रिय असेल तर आपले तोंड काळे कर.

**आई** : शांता शांत हो पोरी. आत जा दादा आले की मग पाहू. देवाला अजून आम्हाला छळायचे आहे. आता तू काय पाहतोस चालता हो इथून.

**गणपत** : तुम्ही सुद्धा मला निघायला सांगता. ठीक आहे. पाहून घेईन मी आताच शांतीला पाहायला येणाऱ्या त्या गोविंदाला जाऊन भेटतो व म्हणतो त्याला, शांती इकडे काय पराक्रम करीत आहे. किती मजा करीत आहे. तिचे लग्न कसे होते ते पाहतो !

[गणपतराव निघण्याच्या बेतात असतो तोच सधू भाजीवाला प्रवेश करतो ] [रागाने गणपतरावाकडे पाहून]

अनुक्रमणिका

**सधू** : गणपतरावऽऽ काय म्हणटलास पुन्हा बोल पाहू. शांती अक्कासारखी साधवीला तू नावे ठेवतोस. तुला तुझी जीभ प्रिय नाही का? प्रिय नसेल तर पुन्हा वटवट कर मग बघ काय होईल. गावातील एक नंबरी गुंडा अन् निघाला शांतीला नावे ठेवायला व तिचे लग्न मोडायला.

**आई** : जाऊ दे सधू तो पाटलाचा मुलगा. त्याच्या वाटेला जाऊ नकोस.

**सधू** : आई पाटलाचा मुलगा असला काय झाले. दुसऱ्याची इज्जत नको का करायला ?

**गणपत** : सधू, तुला गावात राहायचे आहे की नाही. माझ्याशी गाठ घेणे म्हणजे मरणाला मिठी मारणे! मात्र लक्षात ठेव! जातो आता पण तुला पाहून घेईन. तुझ्या पोटावर हा लाथ आणला नाही तर माझे नाव गणपतराव नाही.

**सदू** : अरे जा ही भाती आपल्या ताटाखालच्या मांजरांना घाल. असली धमकी आपल्या चमच्यांना जाऊन दे. हा सधू बिळातील उंदीर नाही सिंहाचा छावा आहे. तुला भिईन तर आपल्याला सावलीला भिईन ! ! [गणपतराव रागाने निघतो. दूधवाली प्रवेश करते.]

**मैना** : अवो तुम्ही इकडे! ! (आईकडे पाहून) मावशी हा गणपतराव गेला ना! तो इकडे कशाला आला होता? फार वाईट आहे तो. त्याची विषारी सावली या दैवी घरात कशाला पडू दिली.

**आई** : जाऊ दे पोरी. आपल्या नशिबी हेच आहे. आम्ही कोणाला दोष देऊ ?

**मैना** : मावशी, तो फार भयानक माणूस आहे. गावातील अनेक गरीब पोरींना आपल्या जाळ्यात फसवतो व छळतो. असला माणूस या गावात कशाला जन्मला हे त्या दैवाला माहीत. गावाला जणू हा एक प्रकारचा शाप आहे.

**सदू** : आई, त्याने शांती अक्काविषयी जे सांगितले, त्याची तुम्ही काहीच काळजी करू नका. मी आताच जाऊन पाटलांना भेटतो व सर्व सांगतो. तळ्याजवळचा तो प्रसंग मला चैन पडू देत नाही.

**आई** : सधू तुला ते कळले. मात्र कोणाला सांगू नकोस लेका! तुला माझ्या गळ्याची शपथ!

**मैना** : मावशी काय घडले? अवो ! तुम्ही तरी सांगा ना ! शांतीचे काही बरं वाईट झाले का? देवा हा गणपतराव गावातील आणखी किती पोरीना छळणार किती पोरींना भ्रस्त करणार.

**सदू** : मैना, हे काय! वटवट सुरु केलीस? कुठे काय बोलावे याचे शुद्धी आहे का तुला! खबरदार जर इकडची गोष्ट तिकडे केलीस तर जीभ कापून देणार !

अनुक्रमणिका

**मैना** : तुम्ही गप्प राहा. मला काय अक्कल नाही? इकडची गोष्ट तिकडे कशाला करणार. आम्हा बायांच्या जीवावर काय काय घडते ते तुम्हांला केव्हा कळणार ! माहीत आहे त्या दिवशी काय म्हणाला होता तो लुच्चा ! म्हणे, ए मैना ! तुझे दूध सर्व गावाला पाजतेस मला केव्हा देशील. माझ्या मार्गात राक्षसासारखा उभा होता. सौभाग्य माझे. शाळेतील मुले मागे होती. नाहीतर काय झाले असते देवास माहीत ! शाळेतील मुले मागे होती. नाहीतर काय झाले असते देवास माहीत ! मी लगेच घरी जाऊन त्यांना सांगितले .

**सदू** : हा राक्षस केव्हा या गावातून एकादाचा जाणार ? पाटील म्हणत होते की त्याला परदेशाला पाठवतील.

**मैना** : तो काय जाईल परदेशाला भामता ! कुत्र्याप्रमाणे उष्टा खाणारा तो लुच्चा परदेशाला थोडाच जाईल. मी माझ्या नवऱ्याला सर्व सांगितले. त्यांनी पोलीसात जाऊन वर्दी दिली आहे. ते देवळाजवळ गेले होते पण त्या नालायकाची स्वारी तिकडे गेली नाही. आज नाही तर उद्या ते त्याची फळी मोडतील. तुम्ही नुसते पाहा की.

**आई** : मैना, मात्र इकडची गोष्ट तिकडे करू नकोस पोरी. आमची अब्रु जाईल नाहीतर.

**मैना** : मावशी, तुम्ही काळजी करू नका. आमच्या शांतीला कोणी वाकड्या नजरेने पाहील तर मी त्याला आंधळा करून टाकणार. पुरूष वर्ग स्त्रियांच्या जीवावर भलतेच दिव्य करायला धजतात.

**सदू** : मैना, तुला जीभ आहे की वाहती नदी ! एकदा सुरूवात केली की नदीप्रमाणे वाहायला लागलीस. तुझ्या तोंडून पुरूषांची ही अलैकिक कथा मी शंभर वेळा ऐकली. पण सर्व पुरूष तसे नसतात. भारतात रावणाला मारण्यासाठी राम जन्मला, किंचाला भिमाने मारले तशाच या गणपतरावाचा शेवटचा काळ येत आहे.

**मैना** : याचा अंत लवकर होवो देवा ! तो जेव्हा जेव्हा माझ्यापुढे येतो तेव्हा तेव्हा माझ्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिडते.

**आई** : जाऊ दे पोरी जो जसा करेल तो तसा भरेल. त्याचा घडा भरत आला आहे. भडकलेली अग्नी फार काळ टिकत नाही. लवकरच विझून जाणार ! लवकरच विझून जाणार !

**सदू** : खरे आहे मैना खरे आहे. तो गणपतराव आमचे नुकसान करू शकणार नाही. तू निष्काळजी राह. उद्यापर्यंत त्याची वाट लागणार. आम्ही सुद्धा पाहून घेऊ त्याला.

**मैना** : तसाच होवा देवा ! तसाच होवो ! आम्हा बाई माणसांना आनंदाचा श्वास घेता येणार गावात पोरीना मोकळ्याने हिंडता फिरता येणार. उदरांना मांजराची भीती टळेल.

अनुक्रमणिका

**मैना** : (टांगा थांबण्याचा आवाज ऐकताच ) यादव दादा आले वाटते ( यादव व यशोदा उतरलेल्या चेहऱ्याने प्रवेश करतात )

**यादव** : सधू तू इकडे. मैना तू ही आलीस.

**आई** : यादव तुझे बाबा कसे आहेत ?

**यादव** : यशोदे जा आत आईला बाबांच्या प्रकृतीबद्दल सांग ( यशोदा व आई आंत जातात ) मी तुम्हाला काय सांगू ! आज इतका मोठा पगाराचा दिवस, अन् पाहा माझ्या हाती फक्त शंभर रुपये. माझे दैवच फिरले आहे. बाबांच्या आजारापायी मला नोकरीवर जाता आले नाही म्हणून पैसे कमी मिळाले. आताच यशोदेच्या बांगड्या विकून दुकानदाराचे चारशे रुपये व घरमालकाचे दोनशे रुपये देऊन येत आहे. मला वेड लागायची पाळी आली आहे सधू ! तुला पैसे द्यायचे आहेत, मैनेला पैसे द्यायचे आहेत. घरात महिन्यापुरते अन्न आणला पाहिजेत. मुलांसाठी वह्या पुस्तके पाहिजेत अन् डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे संध्याकाळी बाबांच्या शरीरात दोन बाटल्या रक्त घातले पाहिजेत. आता काय करू हेच मला सुचत नाही. सधू ! घे यातले पन्नास रूपये.

**सदू** : नको यादव दादा नको ! नंतर पाहू. बाबांना रक्त पाहिजे. मी रक्त देणार ! देव कधी कधी किती निष्ठूर होतो व भल्या माणसांचे अंत पाहतो दादा, मी आताच जातो व रक्त देतो.

**यादव** : सधू , तू किती थोर मनाचे आहेस. मला खरोखर तुझ्याविषयी अभिमान वाटतो. मी तुझा आभार कोणत्या शब्दाने मानू.

**सदू** : यादवदादा तू मला धन्यवाद देउ नकोस की अभिमान मानू नकोस. मी मानवधर्माला अनुसरून माझे कर्तव्य करीत आहे मी जातो. ह्या भाज्या ठेवा. (तो निघतो.)

**यादव** : मैना, तू घे यातले पन्नास रुपये. काळजी करू नकोस. बाकीचे नंतर देईन.

**मैना** : यादवदादा, नको मला ते पैसे आता. नंतर केव्हा तरी द्या. मी पण निघते. त्यांना रक्त देण्यासाठी सांगते व रुग्णालयात पाठवते हे राहिलेले दूध मी ठेवते. संध्याकाळी बाबांसाठी घेऊन जा (मैना निघते. यादव त्यांच्या कृतज्ञतेची प्रशंसा करीत उद्‌गारतो. )

**यादव** : किती थोर मनाची आहेत ही माणसे ! यांना देव म्हणावं की मानव (गणपत प्रवेशतो.)

**गणपत** : यादव ! अरे यादव ! काय झालं. सांग मित्रा.

**यादव** : गणपत ये मित्रा ! ये ये ! परंतु मित्रा आता तू काही माझ्या जवळ पैसे मागू नकोस. मी फार संकटात आहे माझ्यावर दुखाचे डोंगर कोसळून पडलं आहे.

अनुक्रमणिका

**गणपत** : मी पैशासाठी आलो नाही. सोनाराकडे वहिनीच्या बांगड्या विकून टाकलास हे ऐकून माझे मन कळवळले. राहवलं नाही मला. म्हणून तुझ्या मदतीसाठी धावून आलो. हे तीनशे रुपये. सोनाराकडे जाऊन वहिनीच्या बांगड्या परत घे.

**यादव** : नाही गणपत नाही. नको मला हे रुपये. पूर्वीचे अजून पाचशे रुपये आहेत. द्यायला अन् आता आणखी तिनशे नको गणपत नको ! इतकी तुझी संपत्ती फेडता फेडता मी म्हातारा होऊन जाणार.

**गणपत** : यादव तू संकटात आहेस म्हणून मदत करीत आहे. अरे आपण बाळमित्र आहोत. तू कशाला करतोस. केव्हा तरी दे. दिला नाहीस तरी चालेल. आता मात्र नकारू नको. (गणपतरावचा आवाज ऐकून आई खोलीत प्रवेशते व त्राग्याने त्याच्याकडे पाहत )

**आई** : गणपत तू पुन्हा आलास? यादव, त्याच्याकडून काहीच घेऊ नकोस तुला माझ्या गळ्याची शपथ !

**यादव** : काय झाले आई ? गणपत काय केलास रे ? आई का रागवते ?
(शांती गणपतकडे पाहत.)

**शांती** : दादा, या दानवाला या घरातून जायला सांगा, नाहीतर त्याचे प्रेत जाईल येथून.

**यादव** : शांते काय झाले ? तुझे डोळे का असे लाल झालेत ( गणपतकडे पाहून ) हिचा अपमान केला आहे. का रे तू ? बोल गप्प का आहेस ?

**गणपत** : हिचे काय ऐकतेस हिचा स्वभावच असा आहे. यादव, नंतर आपण बोलू. जातो आता.

**शांती** : कुठे चाललास लुच्चा ! भामता कुठला. दादा ! हा काय सांगणार तुम्हांला मी सांगते, काय घडले. आज सकाळी देवळातून येतांना याने तळ्याजवळ माझा हात धरला होतो. माझ्या पदराला हात लावला होता.

**यादव** : [यादवाचा तोल जातो. भयंकर संतापाने ] मी हे काय ऐकतो आहे ? शांती आत जा. आई तू पण जा.
[आई व शांती आंत जातात ]

**यादव** : गणपतरावऽऽ हा काय प्रकार आहे? शांती तुला बहिणीसारखी आहे ना ? तुझ्या मनात ही दुर्भावना आली तरी कशी ? अरे? मी तर तुला मित्रच नाही माझा धाकटा भाऊ मानला होता. तुझे पाऊल सन्मार्गाला लागावे म्हणून मी सतत देवाशी प्रार्थना करीत आलो . तुला तर शांतीबद्दल आदर वाटला पाहिजे होता. तिची इज्ज़त केली पाहिजे होती. माझा विश्वासघात केलास, माझ्या भावनिक स्थिरतेवर आघात केलास आहे. चालता हो इथून

अनुक्रमणिका

अन् पुन्हा येऊ नकोस. बाळमित्र या संबंधाला कलंक लावलास आजपासून तुझा अन् माझा सबंध संपला. चालता हो नाहीतर…………………………………………..

**गणपत** : नाहीतर काय करशील ? मारशील मला बोल ? कोणाशी गाठ घेतो आहेस हे तरी ध्यानात घे. तुला गावात रहायचे आहे की नाही. माझ्याशी वैर तुला फार महाग पडेल. कालचा भिकारी, माझा ऋणको अन् माझ्याशी डोळे भिडवायला धजतो आहे.

**यादव** : गणपतराव ! देवासाठी तू आपल्या तोंडाला राख फासून चालता हो इथून. माझ्या निर्मल व निष्पाप बहिणीकडे वाईट दृष्टीने पाहतोस अन् म्हणतोस मला गावात राहायचे आहे की नाही. गणपत, मी गरीब आहे पण नीच नाही. मी ऋणको आहे पण पापी नाही.

**गणपत** : यादव तू मला पापी म्हणतोस. अरे गावातील लोक कधीही मला पापी म्हणायला धजले नाहीत. तुला वेळोवेळी मदत केली त्याचे हेच का फळ ? उपकाराचे चांगले फळ देतो आहेस ?

**यादव** : पुरे आता. पुरे हे भाषण. माझ्यावर उपकार केलास, मला मदत केलीस, त्यात माझ्या हिताचे नसून तुझे होते. त्यात तूझे स्वार्थ-भावना होती. जर तू मला मदत केली नसतीस. तर गावातील शंभर लोकांनी मला मदत केली असती. पण जर मी नसतो तर तुझी काय दशा झाली असती हे मात्र लक्षात घे, गावात राहायची भाषा मला बोलू नकोस. नाहीतर मी तुला ह्या गावात राहायला देणार नाही.

**गणपत** : यादव, मागची गोष्ट विसरून जा. मी उगाच रागावून बोललो मित्रा ! माझे शांतीवर प्रेम आहे. ती मला हवी आहे. मी तिला वाईट नजरेने पाहात नाही. माझे तिच्यावर प्रेम आहे. आजपर्यंत मी तुझ्याशी बोलायला धजलो नाही. म्हणून आता मला वाईट वाटते.

**यादव** : लाज कशी वाटत नाही बोलायला? शांतीवर तुझे प्रेम आहे. गावातील किती मुलींवर प्रेम करतोस तू? शांतीचे लग्न ठरले आहे हे तुला माहित आहे ना. असे असता निघाला तिच्यावर प्रेम करायला. शांतीचे कशावरून तुझ्यावर प्रेम आहे. मघाशी काय म्हणाली ती ? आहे की नाही तुझ्या लक्षात?

**गणपत** : तिचे माझ्यावर प्रेम नाही, हे मला माहीत आहे. पण मी काय करू? तिच्यावाचून मी जगू शकणार नाही मरू शकणार नाही. तू माझा बाळमित्र. तुझे दुख मला पहावत नाही. शांतीशी लग्न करून तिला सुखी ठेवीन अन् तुझे कर्ज पण फिटेल. फक्त ही म्हण यादव हो म्हण !

**यादव** : अरे नीच ! तुला काय वाटत कर्ज फेडण्याच्या भीतीने माझी शांती मी तुला लग्न करायला देईन? हे मी मरेपर्यंत तरी होऊ देणार नाही . गावातील इतर मुलीना व त्यांच्या पालकांना माझ्या डोळ्यादेखत फसवलास. तुला लाख वेळ समजावून थकलो तरी माझे काही ऐकला नाहीस. किती उमळलेल्या कोमल कळ्यांना चिरडून टाकलास अन् आता माझ्या

अनुक्रमणिका

शांतीकडे डोळे उचलतोस ? याद राख! माझ्या बहिणीशी लग्न करण्याचा विचार पुन्हा आपल्या मनात आणलास तर माझ्यासारखा वाईट कोणीच नसणार ! समजलास !

**गणपत** : यादव, पुरे कर आता? सरळ बोटाने तूप निघत नसेल तर मी गणपतराव, वाकड्या बोटाने ते काढणार. घारीप्रमाणे उंच, भराऱ्या घेणाऱ्यांना मी वेळीच खाली खेचतो. आकाशाला जाऊन चुबंन घेणाऱ्या पंतगाची दोर मी वेळीच कापतो म्हणून तुझ्या हितासाठी तुला बजावतो. शांतीला माझ्या हाती येऊ दे.

**यादव** : जन्मभर गढूळ पाण्यात गटांगळा खाणार तू, उकीरड्यावर गेलेल्या उंदरांना शोधणारी तुझी कावळ्याची वृत्ती कोणाला माहित नाही. गढूळ वस्तीत जाऊन लोळ, वाटेल ते कर परंतू माझ्या गंगेप्रमाणे पवित्र बहिणीकडे पुन्हा विषारी डोळ्यांनी पाहिलस तर मी तुझे डोळे फोडून टाकणार.

**गणपत** : माझे डोळे फोडणारा अजून या पृथ्वीतलावर जन्माला नाही म्हणून तर मी जगातले सौंदर्य पाहतो आहे अन् या स्वर्गातील आनंदाचा उपभोग घेत आहे. अरे मी तुझ्याप्रमाणे विहिरीतील बेडकाप्रमाणे जागच्या जागी फिरणारा माणूस नाही. मी विशाल सागरात पोहणारा माणूस आहे. जगात कुठे कुठे आनंद व अमृत भरून आहे हे तुला केव्हा कळणार फुलाफुलांतून दलादलातून मधू सेवन करणारा मी स्वछंदी भ्रमर आहे. कोल्हा नाही.

**यादव** : गणपतराव, गावातील आयाबायांकडे कामवासनेच्या दृष्टीने पाहतोस अन् स्वतःला भ्रमरा मानतोस. पाटीलकीच्या जोरावर गरीब पोरीना बदनाम करतोस अन् म्हणतोस फुलांफुलांतील मधूकण खाणारा भ्रमरा आहेस. अरे, ही पापे तू कोठे फेडशील? नरकात सुद्धा तुला जागा मिळणार नाही.

**गणपत** : यादव ! माझे पाप व मी, नरकात काय होईल ते मी पाहून घेईन. पण मात्र तुझे काय होणार ते बघ. माझ्या कृपेने नगरपालिकेच्या कार्यालयात तुला नोकरी लागली. माझ्या वडिलांच्या कृपेने गावच्या शाळेत संध्याकाळी शिकवतोस. आता काय सांगतो ते नीट ऐकून माझ्या वाटेला लागू नकोस नाहीतर नोकरी गमावून बसशील. उदयापासून तुला कडेवर ठेवले नाहीतर मी पाटलाचा मुलगा नाही !

**यादव** : ठीक आहे गणपतराव, उद्या कशाला ! आजच मला कडेवर ठेवू शकतोस. पण मी मनावर घेतले तर तुझी काय दशा होईल ठाउक आहे ना तुला! तुझ्या वडिलांच्या लाख विनंतीवरून मी तुला तुरुंगाच्या जबड्यातून काढलो होतो. नगरपालिकेतील नोकरी व शाळेतील अध्यापन तुमच्या उपकाराची नसून माझ्या हक्काची जागा आहे. तुमच्या दयेची भीक नाही! [आताच्या आताच तुला पोलिसा हाती देऊ शकतो.]

**गणपत** : यादव पुरे आता हे भाषण नाहीतर तुला या जगात राहणें फार कठीण होईल ! तुझ्या त्या थेरड्या बापाला कोण दोन बाटल्या रक्त देतो ते पाहतो. त्या रूग्णालयात कोणाची सत्ता आहे माहीत आहे का तुला ? तो डॉक्टर कोणाच्या आज्ञेप्रमाणे वागतो माहीत आहे का ?

अनुक्रमणिका

मी तिकडे नुसती चुटकी वाजवली  की काम  फक्त झाले म्हणून समजावे. पोलिसाकडे जायचे असेल तर जा मी तुझ्या त्या थेरड्याला स्वर्गाला पाठवतो.

**यादव** : रबराच्या फुग्याप्रमाणे वाढत जाणारा तुझा राक्षसी 'ग' सत्त्याच्या सुईचा नुसता स्पर्श होताच त्याचा काय परिणाम होईल हे मात्र  लक्षात घे. आकाशाला जाऊन भिडणाऱ्या पक्ष्याला शेवटी याच धरणीवर यावे लागते.  एके दिवशी तुझी पण तीच गत होणार. आता मला किती भीती घातलीस तरी मी तीळमात्र दगमगणार नाही. चालता हो इथून.

**गणपत** : इथून जाण्याची भाषा बोलू नकोस. माझे पैसे आधी दे तेव्हा जाणार. यादव, मात्र एक गोष्ट विसरू नकोस. तुझ्या या अंगावरचे वस्त्र तुझे नसून माझे आहे. तुझ्या बायकोच्या अंगावरील साडी, तुझ्या आईवरचे चोळी, लुगडे माझ्या पैशांतून घेतले होतेस. तुझ्या त्या साधवी शांतीला परिधान केलेले कपडे कोणाची आहे. रुग्णालयात मरणाऱ्या त्या थेरड्याचे धोतर कोणाचे आहे ? मुलांवरचे कपडे कोणाचे आहेत? दिवाळीच्या दिवशी  मारलेल्या कुत्र्याप्रमाणे तुझी स्थिती झाली होती अन् आता  मलाच डोळे दाखवतो. मला माझे पैसे आताच पाहिजेत नाहीतर सर्वाच्या अंगावरचे कपडे काढून दे. (यादवाला अपमानस्पद निंदक शब्दांच्या प्रहारामुळे मोठ्या यातना होतात तो त्वेषाने)

**यादव** : गपपतरावऽऽ मला शांत राहू दे ! शांत राहू दे मला! तू शुद्धीवर आहेस की नाही? दिवाळीच्या दिवशी मी तुझ्याकडून पैसे मागितले नव्हते. तूच माझ्या परिस्थितीकडे पाहून बळजबरीने माझ्या हातावर पैसे ठेवले होतेस अन् आज माझ्या सबंध परिवाराचा अपमान करतोस मला धमकी देतोस ? मी अखेरचे तुला सांगतो माझ्या हातून काही बरे वाईट होण्यापूर्वी चालता हो इथून –

**गणपत** : यादव, मी पाटलाचा मुलगा अन् मला भीती घालतोस, नीच  म्हणतोस, पापी ठरवतोस. तुझी शांती काय रंभा की मेनका आहे ! अप्सरा की गंधर्व आहे! आता नीट तुला या घरात आनंदाने राहू देणार नाही. त्या थेरड्याला आनंदाने मरू देणार नाही. त्या शांतीला आनंदाने लग्न करू देणार नाही, आनंदाने वावरू देणार नाही. थांब यादव थांब! तुझ्या संसाराची राखरांगोळी करून सोडतो! अरे जाधव! आत ये अरे मेलाय काय!! ( गणपतचा देहरक्षक त्वरीत प्रवेशतो )

**जाधव** : आलो सरकार ! काय हुकूम आहे.

**गणपत** : या माथेफिरूला धर, अलिकडे हा फार माजत चालला आहे. माझी वाट लावण्यापूर्वी मी याचीच वाट लावतो, माझ्या वाटेला येणाऱ्यांची काय गत होते हे तरी याला कळू दे. ( जाधव  यादवाच्या अंगावर झेप घेतो तोच यशोदा मध्येच येते. )

अनुक्रमणिका

**यशोदा** : अरे राक्षसा, माझ्या नवऱ्याला नुसता स्पर्श केलास तर तुझा हात मोडून टाकणार. आमच्यावर आकाश पडत आहे अन् तुम्हांला चांगली झाली आहे. कोल्ह्याप्रमाणे दुर्बलांवर झडप घातली मेल्यांनी !

**गणपत** : तू काळी चिंडी मध्येच कशाला आलीस. जा मर तिकडे ( गणपत तिला त्वेषाने ढकळतो. ती कोळमदून कृष्णमूर्तीपुढे पडते. यादव रागाने बेभान होऊन गणपतच्या अंगावर धावतो आपल्या मालकावर अनपेक्षित धावून आलेल्या यादवाला पाहून जाधव आपल्या खिशातून चाकू काढतो व यादवाच्या अंगावर वार करतो चाकूचा वार लागून यादव जखमी होतो. तो विव्हळतो व तोल जाऊन खाली पडतो. अनपेक्षित घडलेले हे प्रकरण पाहून गणपत विस्मयाने स्तब्ध होतो. नयन संकेताने तो जाधवला चाकू उचलायला इशारा करतो. जाधवाची बोबडी वळते, त्याच्याने चाकू उचलवत नाही. गणपत स्वतः चाकू उचलायला पुढे होतो अन् त्याच वेळी जाधव पळ काढतो. पश्चातापाच्या भडकलेल्या अग्नीत होरपळून असतांना तो चाकू खिशात ठेवण्याच्या बेतात असतो तोच भाजीवाला प्रवेश करतो. गणपतच्या हातात चाकू पाहून तो ओरडतो..... ....... ............

**गणपत** : पुरे आता नाहीतर तुझी चाकू तुझ्याच पोटात जाईल.

**सदू** : यादवदादा, हे काय झाले ? अरे गणपत हे काय केलेस. आई ! शांती ! कुठे आहात ? बघा इथे काय झाले ! (हाक ऐकून आई शांती प्रवेशतात. त्यांना आश्चर्याचा धक्काच बसतो! काय झाले? यादव माझ्या मुला! आम्ही विहिरीवर गेलो होतो इथे ... ... ... ... वहिनी अरे पळपुत्या ! चाललास कुठे? यादवा सारख्या प्रामाणिक माणसाच्या चांगुलपणाचा फायदा घेऊ पाहिलास. मी पाटलांना हे प्रकरण सांगून तुला पोलीसाच्या हाती दिल्याशिवाय सोडणार नाही. चल ( पडदा पडतो ) आई जखमेवर पट्टी बांधते शांती वहिनीला सांभाळते. पळणाऱ्या गणपतला अडवून सधू उद्गारतो.

------**इ ति श्री**------

अनुक्रमणिका

**मराठी एकांकी नाटक**

# रक्त ए मन

नाटककार : **धर्मा गोविंद**

अनुक्रमणिका

## मराठी एकांकी नाटक

# -रक्त ए मन-

(पहिला दृश्य) (सीता खुर्चीवर बसून स्वेटर बुनत होती)

**संभू** : (लांबूनच) अग बाई कुठे आहांत ? पाह तर ... ... ... ( जवळ येऊन लिलाफा दाखवून) बघ आईची चिठ्ठी आहे. ती एक आठवड्याहून इकडे येत आहे .... .... हे काय करत आहेस ?

**सीता** : (खाली मान करून बुनाईत लीन आहे ) स्वेटर विनत आहे.

**संभू** : तो तर मी पण पहात आहे, पण हे कोणाचे आहे ? कुणा मुलाचे माहित होत आहे.

**सीता** : होय मुलाचे.

**संभू** : कोणाचे ? शेजारणीचे असेल का ?
(पृष्ठभूमि मध्ये मुलांचे आवाजांत राष्ट्रीय गानाचे काही बोलनें जन मन गन अधिनायक जय हे भारत भाग्य विधाता)

**संभू** : बरं लहान, लहान, मुले धिमी धीमी आवाज. किती मंजुळमय आहे. ( शांत सांस भरून) पांच वर्षांने ह्या आवाजा साठी आपले कान तरसत आहे. कोणत्या मुलाचे रडण्याची आवाज. त्याची छीकणे, त्याची किलकरणी – रोज मला स्वप्नात ऐकूं येते.

**सीता** : हा तुमचाच फैसला होता. तुम्ही –

**संभू** : (स्व. मनांत ) आई म्हणते – मला नातू हवा. आईची बात ऐकून मी कंटाळून येतो. कधी कधी ती आपली जींक्र घेऊन बसते, मला वाटतो कुठे तरी काही गुम झाला आहे. जसे .......

**सीता** : लग्ना अगोदर तुम्हीच हा फैसला केला होता की पांच वर्षे झाल्यावर आम्हाला मुलगा पाहिजे आणि त्याच्या तीन वर्ष झाल्यावर मुलगी पाहिजे ..... . बर जर ह्या दोन मुलांचे परवरिश आम्ही चांगलंपण करू सकलो तर ते पुढे वाढून देशाचे इज्ज्तदार नागरीक बनतील म्हणजे आपला कर्तव्य पुर्ण होईल. आज आपल्या देशासाठी असल्या लोकांची जरुरत आहे. जे कौमाच्या कामात पूर्णरूपाणें पक्ष घेऊ सकतो ...... तुम्ही आपल्या फैसलेवर अटल राहू सकत नाही ? मला बघा ! एक बायको असून मी ह्या वायदेला आतां पर्यंत कबुल करत आले आहे. दुसऱ्या मुलांना पाहते तर ह्या कोखांत जसे काही सिमटून राहते. ममता जागते पण बोलीनेउफ पर्यंत करत नाही.

अनुक्रमणिका

**संभू** : तुं बरे-बोलतेस सीते. पण मी आपल्या मनाला काय करुं; कधी कधी विचार करतो, की मीच वाईट फैसला केला होता. आपला विचार कच्चा होता. आम्हाला माहीती नव्हती की मुलांसाठी आई बापाचे कसले भावना होते. प्रत्येक बापाची हीच इच्छा होते. दफ्तरातून दिवसभर काम करुन थकलेला सांजच्यावेळी जेव्हां तो घरी येतो. जणू उशराने आपल्या मुलांशी खेलत आणि त्यांची शरारतावर आपले सारे थकान दुर करतो

**सीता** : मी पण हे सगळे विचार केले आहे. कदाचित ह्याचाहून जास्तच.

**संभू** : मी समझतो. पण - - पण आता मी मुलगा साठी जास्त वाट पाहू सकत नाही. हे घर ह्या सान्नाटेला बरदास करू सकत नाही. बघ ह्याचे प्रत्येक कोणा सूनसान आहे. हा पाळणा —ह्या बाताची आशा करत आहे. सानूलेसे जीव लोल आणि मऊ मऊ हात पाय चालवे. ह्या मेजावरचें ठेवलेले खेलवणें कूणाच्या हातानी धरण्यासाठी बेचैन आहे. हा चूं चूं करणारा कुत्रा वेळेपर्यत चूपचाप बसून वाट पाहत आहे. तो समोरचा पोपट बसून एकटक लागवून आमच्याकडे बघत आहे. जसे विचारता कधी तो येणार. हा झूणझूण, हे घर, मी, तूं आई - - सगळी पांच वर्षांपासून आपापल्या सांस बंध करून त्याची वाट पाहत आहोंत. माहीत नाही तो कधी येणार आणि आपल्या लहान लहान छिकाने ह्या सुनसान शहराला तोडून देईल जणू तो येईल------ह्याच वेळी. मला—

**सीता** : (शांत स्वरांत पूर्ण आत्मविस्वासानें) तो येईल

**संभू** : कधी येणार ?

**सीता** : तो येईलच फिकर कशाचे.

**संभू** : कधी ? मला दाखव. मी ही बातमी ऐकण्याची आहे काय तूं- - ?

**सीता** : होय मी ----- तो दिवस येणार आहे. ज्याचा तुम्ही, आम्ही. सगळी इंतजार होता पांच महिन्यात इदाचा चांद दिसल्यानें तो येईल म्हणजे आमचा चांद येईल.

**संभू** : इदाचा चांद म्हणतेस

**सीता** : काही कालांतराने आमचा इद येईल आपल्या घरी. वाट विसरले होते.

**संभू** : सीते. आज मला फार मौद आला आहे. तुझ्या डोळ्यात पण अश्रु आहे. आनंदाने अश्रु बनून आला आहे. तूं ह्या आनंदाला किती दिवसाहून एकटीच लपवून बसली आहेस. या विषयी मला कलवले असते. चिर काला पासून मी या वजन उचलन्या साठी बेचैन आहे---- बरं हे बघ, त्याचे नाव काय ठेऊ?---- भानू?

**सीता** : अं- हं- जगाचा भानू

अनुक्रमणिका

**संभू** : नाही आपला भानू. जो ऐकेल तो हंसेल

(दोघे हंसतात) दुसरा दृश्य) "सीता पलंगावर घेतली आहे. मुखा वर पिडाचा भाव आहे. समोरच डॉक्टरनें गळ्यात स्टथैस्कोप लागवून खुर्चिवर बसला आहे"

**सीता** : हाय...... हा ......य....... अ......... आ.........आह.

**संभू** : डोकटर साहब, ही पसिनेनी भिंजत आहे. पाह सीते आपला जीव संभाल (मुस्कुरण्याचे प्रयत्न करताच) बरं आतां लवकर ठिक होसीलच

**डाक्टर** : हूं

**सीता** : (कमजोर आवाजांत) डाक्टर साहब जीव ओढत जात आहे

**डाक्टर** : (संभू कडे पाहून) ही तर फार कमजोर झाली आहे.

**संभू** : खतऱ्याची कुठली पण बात नाही ना ?

**डाक्टर** : फार कमजोरी आहे...... हिच्या रक्तस्थलांत ताबडतोप रक्त पोहोचवले पाहिजे. नाही तर आई आणि मुल दोघांचा खतरा आहे. तुम्ही लवकर रक्ताचा इन्तजाम करा.

**संभू** : रक्त.

**डाक्टर** : होय रक्त ! तुम्हाला ब्लड बेंकाने मिळणार

**संभू** : रक्ताचा बेत ? तिकडे रक्त मिळेल कां ?

**डाक्टर** : होय रक्त ! तुम्ही कां कंटालतां ? वाक्का रोयल रोड सेन्ट्रल बेंका कडून रक्त आणा. वेळ फार थोडे आहे. ह्याचा जांच करण्याचा अंती ह्याचेच ग्रुपचा रक्त देतील

**संभ** : बरं डाक्टर साहब, मी आतां रक्त आणतो. तुम्ही आपली सीतेला, तो येणारा पाहुण्याला पण वाचवा.

**डाक्टर** : धाबडायची कुठली पण जरूरत नाही. ह्याना फक्त रक्त पाहिजे दुसरी हीला खतरा होणार नाही आणि मुलाला पण मुलीच तुम्ही लवकर जा.

**संभु** : आतां आणतो. डाक्टर साहब (संभूची तेजीनें खोलीत प्रवेश होते)

**सं. आई** : कुठं जात आहेस तू?

अनुक्रमणिका

**संभू** : रक्त आणण्यास. सीताच्या रक्त स्थलांत अचानक रक्त कमी झाले आहे.

**सं. आई** : (वाट रोकून) नाही तू नाही जाशील

**संभू** : आई एकीकडे हो ! वाट सोड.

**सं. आई** : नाही

**संभू** : उठ आई डाक्टर साहब म्हणताता ब्लड बेंकांतून लवकर रक्त आणायला. आपली सीता पण खत्र्यांत आहे आणि तुझा नातू पण.

**सं. आई** : नाही ! मी रक्त साठी पाठवणार. नाही.

**डाक्टर** : कशाला ?

**संभू** : कशाला आई ?

**आई** : बस एकदा म्हणटले. ईश्वर जाणे कोणाचा रक असेल. कोणा लहान जातीचा होऊ शकतो. निच रक्त आणि माझ्या नातवच्या रगी घ्यावे नाही. हे कधी होऊ शकत नाही

**संतू** : आई.

**आई** : नाही ! नाही! मला असला नातू नको हवा

**संभू** : आई तूं काय म्हणत आहेस.

**आई** : मी ठीक म्हणते. डाक्टर साहब महा असला नातू हवाच नको
(संभू कडे नोड कडून )
तुला माहीत आहे. तूं कोणत्या वंशाहून आला आहेस? ---------- एवढा उंच वंश आणि त्याचा वंशजचे रक्त कोणी. निच जातीचा रक्तास मिळन असो. विहीरीत जाऊन डुबून मर.

**संभू** : (रडू आवाजांत) आई (सीता कहरते)

**डाक्टर** : (संभूसी) लवकर जाऊन रक्त आण. एकेक सेकण्ड आपल्या फायदेचा आहे? (संभू आईकडे बघतो)

**आई** : संभू नाही.

**डाक्टर** : (संभूची आईशी) तुम्ही बुजुर्ग असतांच कसली बाब करता ? सगळ्या मानव जातीचे रक्त बरोबर सारखेच असते. हे मी मोठे तू लहान हा तर कधीचाच नष्ट आहे. रक्ताच्या संबंध आम्ही सगळे सारखे आहोत. सगळे भाऊ भाऊ आहोत. (संभूशी) तुम्ही जलदी जा.

**संभू** : होय आई, डा. साहब ठीक म्हणतात... डाक्टर साहब आतां मी रक्त आणतो.

**आई** : तुम्ही समझाल नाही डाक्टर साहब.......... संभू, माझा लेका, तू रक्त आणाय जाऊं नकोस. मी नातू साठी सबुरी करीन विचार करीन की माझा कोण पण नव्हता. वंश खत्म झाला माझी नसल खत्म झाली

**संभू** : नायी आई, असो नको म्हणू. मी रक्त आणीनच. डाक्टर साहब ठीक म्हणतां....... आई मला मुल हवा. डाक्टर साहब मी आता रक्त आणून देतो.

**आई** : (कमजोर आवाजात) संभू जाऊ नको, माझा लाल जग काय म्हणतील......मला नातू ....... (खाली पडते. डा.साहब तिला संभाळतो)
तिसरा दृश्य (संभू लहान बाळाला हातात घेऊन झुलवीत आहे कधी कधी बाळ रडतो. सीता पलगावर लोलते)

**संभू** : नको रडू माझा बाळ.... आं.... आं.... रडू नको.... आं.... आं.....

**आई** : (लांबूनच) तुम्ही आपल्या लहान चांदाबाला काय करता? दुखी रडत आहे... (समोर येऊन) आण ! मला दे. (बाळाला गोदीत घेऊन) रडूं नको माझा चांदोबा, माझा लाल, मी वारी जाते. तुम्ही ह्याला का त्रास देता? .....आं आं ......आं....आं (विराम) डाक्टर नाही आले.

**संभू** : ते येतील आई. (खोलीतून निघते)

**सीता** : (उठून बसते) आज आम्ही किती प्रमुदित आहोत चिर कालाची इच्छा पूर्ण झाली आहे.

**संभू** : होय. फार आनंदमय आहे. आनंदाचे काही ठिकाण नाही. म्हणजे तुला माहीत आहे ह्यांत कोणाचा होत मोठा आहे? त्या मानवाचा ज्याच्या पवित्र रक्तानें तुझ्या रक्तस्थ लांत पाहोंचून तुला वाचविले. आपल्या मुलाला नवे आयुष्य दिले. आपणास सोपे आयुष्य दिले.

**सीता** : जणू कोण आहे?

**संभू** : ईश्वरालाच माहीती आहे.

**डाक्टर** : (बाहेरून) मी येऊं शक्तों का?

अनुक्रमणिका

**संभू** : डाक्टर साहब या

**डाक्टर** : (आंत येऊन) काय बात होत आहे ?

**संभू** : डा. साहब किती खुश नशिब आहे मी. आतां असे असे चमत्कार होऊ लागले. म्हणजे रक्त देऊन लटपट जीवाला प्राण देतात.

**डाक्टर** : आता हे चमत्कार राहिले नाही. म्हणजे ही एक मामूली बात अमल बनली आहे. दिवसें दिवस रक्ताची गरज वाढत जात आहे. आणि ह्याच रफतारांत ठाई ठाई ब्लड बेंक उघडले जात आहेत ताकी ताबडतोप जखमी व आजाऱ्यांना वेळीवर रक्त देऊ शक्तो. त्याच्या कडून सिसकल्या जीवाला नवी जिंदगी मिळू शक्तो. त्या लोकांना मरण्यास वाचवतो.

**संभू** : डा. साहब तुम्ही ठिक म्हणतां...... मी सुद्धां हेच म्हणत होतो. न जाणे कोण मानव असेल ज्या रक्तानें आपल्याला मौद आणले. कधी मी त्याच्यासाठी काही करुं शकलं असतं, आणि त्या थोर पुरुषाला धन्यवाद, समर्पण केलं असतं.

**डाक्टर** : ह्या साठी एकच रस्ता आहे.

**संभू** : काय ?

**सीता** : दाखवा ?

**डाक्टर** : ... ... ह्याचे उपरंत आपले रक्त एक बलड बेंका मध्ये जाऊन देऊन या. म्हणजे तुमचे रक्त दुसऱ्यास प्राण देणे येईल आणि लोकाना नवे उमंग देणार. जो लढायांत घातक वा फार जखम्याना मरण्याचा बदल प्राण येईल.

**सं. सीता** : (सर्वोच) तुम्ही ठीक म्हणतां.......आम्ही रक्त देऊ आणि अवश्य देणार.

अनुक्रमणिका

# गोपीनाथाची कथा

लेखक : **धर्मा गोविंद**

अनुक्रमणिका

# गोपीनाथाची कथा

काहीं एका नगरांत एक गृहस्थ राहत असत. त्याचे नाव गोपाळ होते. त्यानां दोन मुलगे आणि एक मुलगी होती. त्याचे जीवन नेहमी प्रमाणे पूर्वी रितीचे होते. गोपाळचे वडील भारतीय होते. ते लोक चांगले स्वभावाचे होते. सगळ्यांनी मिळून जुळून वागायचे.

थोरल्या मुलगाचे नाव रागो आणि दुसऱ्याचे नांव गोपीनाथ आणि मुलगीचे नांव गिरजा होते. ते मुले लहान पणीच शिक्षणासाठी गावाच्या  शाळेत भरती झाले. सांजच्या वेळी  ते मुले आपली मातृ भाषा शिकायचे. त्या वेळेची शिक्षण पद्धती दुसऱ्या ढंगाची होती. मुलांना ढमक लाडू पण मिळायचे. त्या साठी थोरल्याचे वाचन लेखन बंध झाले. दुसरा मुलगा जरा तेज होता आणि त्याची बुद्धी पण चांगली होती. जशी त्याची बुद्धि तशी त्याचा स्वभाव होता.

जेव्हा तो पांचवा वर्गात आला तेव्हां त्याला माराची भिती वाटली  आस्ते आस्ते त्याच्या मित्रा पासून वाईट संगतीचा प्रभाव पडला. येथूनच त्याची  शिक्षा बंध झाली. वाचन लेखन सुटल्यावर तर ते दोघे बाबाबरोबर शेतावर कामे करीत होते. आतां त्यांची परिस्थिती बदलली आणि फार कष्ट सहन करुं लागले.

त्यांची कृषी व्यवसाई चालुं लागली. किती एक दिवसाने जेव्हा गोपीनाथ मोठा झाला म्हणजे लग्नाचा योग्य झाला. रागो चे लग्न अगोदर झाले होते नंतर त्याचा थोरल्या भावाने आपल्या वाढवडील सारखे एक सोयरीक बघून आले. ही पूर्वजांची रीत होती आणि रागो त्याच धर्माचा होता. सगळ्यांना आनंद वाटला होता. दोन तीन महीन्याचे नंतर गोपीनाथाचे आणि गाजूचे साक्षीडा झाले. साक्षीडा मध्ये सगळे कुटुंब गेले होते. साक्षीडा संपल्यावर  नंतर तिथे आलेले सर्व लोक आपापल्या घरीपरत जाऊं लागले. गोपीनाथ देखील आपल्या वडील भाव बरोबर कात्र बोन पर्यंत बस मध्ये बसून आले.

कात्र बोनहून पालमा यायला सुमारे दोन मैल आहे. त्या वेळी पुष्कळ मोटार टेक्षी नव्हती. मोटार न मिळाल्या मुळे ते चालत येऊं लागले. रस्त्यावर येतां येतां कालीमाई पर्यंत पोहोचले. अकस्मात एक मोटार येऊन त्यासी धक्का मारली. कोणाला एवढे कळून आले नाही की, ती मोटार कोणाची होती. कोणी पण तिची नंबर पाहीला नाही. एकाला  एवढीच माहीती होतीं कि मोटार लाल होती विचारते वेळी गोपीनाथाला उचलुन अस्पतालात निले गेले. त्याची सेवा होऊ लागली. जेव्हा तो अस्पतालातून बरे होऊन घरी आला तेव्हा सगळ्या कुटुंबांना मौद आला.

थोड्या दिवसानें तो काम करुं लागला. मग पांच महीन्यांने त्याचे लग्न झाले. ईश्वराचे कृपेनें लग्न झाले काम पण खुप चालत होते. जस जसे सूर्य अस्त होतो. आणि रात येते, भिन्न, भिन्न, कुचकुच अंधार कधी अगदी कालोख रात पसरीत येते, तसेच काल सुद्धां  येऊं लागला. एकीकडे गरिबी दुसरीकडे पायाचा रोग उठला ते अगदी सोसवत नाही. नंतर त्याला अस्पतालांत निले त्या वेळी आजकालच्या  वैद्य जसे  अनुभवी नव्हते ते डॉकटराने त्याचा पाय कापला. सर्व कुटुंब त्याची  हालत पाहुन रडुं लागले होते. ते किती  व्याकुळ  झाले. ‘रडून काय होणार’? होनी होऊनच राहिली. तिला कोण रोकायचे. पाय कापल्यावर तो आपल्या भावाकडे राह्याचा; केवढे दिवसा पर्यंत भावाकडे राह्याचे असे आपल्या मनांत हि बात आठवून  करुन घेतला; मग आपला बाळपणीचा गांव सोडून सासरवारीला गेला. तिकडे जाऊन तो एक पायाचा  गोपीनाथ बायको संगे गवत पाने कापाय जात होता. ते दोघे नवरा बायको किती मेहनत करुं

लागले, एक पायाचा होता पण तो झाडावर चढून हिरवी पाने कापत होता. शेतावर काम करायचा, भाजी पाले लावायचा असे त्याचे प्रतिक्रिया चाले.

काही सहा वर्ष झाल्यावर त्यानी एक दुसरी युक्ति सोचली. असा त्याचा गुजारा चालायचे नाही. आपल्या मनांत शिप्यांचे काम करून पोट भरायचा विचार पडला. त्या वेळी त्याला दोन मुले होती. एक मुलगा होता. त्याचे नाव शिवराम होते. आणि मुलगीचे सारजा. गोपिनाथ चा मेहुना एक शिंपी होता. त्याच्याकडे तो शिंपी काम शिकूं लागला. तो त्याचा मेहूना होऊन त्याला चांगलं पण शिकवायचा नाही. बाबाचां मित्र आसों तो बोबासे राजमार्गावर एका दूकानांत काम करत होता. बाबानें गोपीनाथाला आसोंकडे धारले. घर सोडून दुकानापर्यंत काही तरी तीन मैल असेल. तो दर रोज कामांत चालत जायचा आणि चालत यायचा त्याला एक आदत होती म्हणजे दारू पिन्याची. कशाला तो दारू पियाचा? त्याची थकावट दूर करन्यासाठी तो पण प्यायचा आणि आपल्या गुरूंनां पण पाजित होता. असे करून तो आपले काम काढून घेत होता. तीन वर्षे झाले नव्हते की त्यानी हे काम शिकले. तेव्हां त्याचा विचार बदलला आणि आपल्या गुरूजींना विचारला की एवढा कष्ट सहन करून मी हे काम शिकला पण मला तुमची आज्ञा हवी कुठे तरी जाऊन एक दुकान उघडून काम करीन. त्याचा गुरूजीनी त्याला पालमा मध्ये एक दुकान उभारून कामांत लाऊन परत गेला.

तो एकटाच पालमाला आला होता. त्याची बायको पोरं सासरवारीला होते. काम करत करत आणखी त्यानें आपले जीवन सुगम करण्या करीतां. आपल्या बायको पोराना इकडेच आणले. त्याना इकडे आणून पुनः शेती सुरू केली.

दिवसांदिवस ज्या प्रमाणे वेळ चालला होता आणि जमीनी चे तृन वाढतात तस तसे मुले देखील वाढत जात होते त्यांचा गुजारा करण्यासाठी ते एक पनानी सेकरलेले होते. घरांत राहत होते, ज्याच्या चौफेरी शेणानी सारवलेले होते. थोरल्या मुलागाला शाळा सोडवून कामांत घातला. त्यानी उसनीवर पैसे काढून एक मोठे आणि छानदार घर बांधला. जसे त्याने एक घर निर्माण करून दिला. तसेच त्यानी आपल्या मराठी बांधवानां एकत्रीत करून उपदेश देऊन एक सभां निर्माण केला. सर्वे लोकानी त्याला आपले पुढारी समझून प्रधानाचे आसन दिले. त्याची स्थिर बुद्धिने लोकांना एक चांगले आणि सोपे मार्ग दाखविले त्या सभाचे नाव मराठी विद्या प्रचारक सभा आहे. सभा सुबक प्रमाणे चालवण्या बाबत त्याने पांच वर्ष योजना तय करून व सभेला दोन तीन वर्षे निर्मान झाल्यावर लोकाचा आवडता प्रधान ह्या स्वर्ण भूमीवरून विजय प्राप्त केले आणि आपल्या अंतरात्म्यातून एक शिथिल आणि शांत स्वराने रामाचे नाव घेतां ते ह्या संसारातून परलोकीत गेले. ते आम्हाना सोडून गेले. पण आपणास एक चांगला दाखवून गेले. जो पर्यंत ही सभा कायम राहील तो पर्यंत त्याचे नाव कमळ होऊन सरोवरांत खिलेल. शेवटीची माळ बनून देवाचा गळ्यांत राहील आणि अमृत होऊन अमर होईल. ती बैठक आज पर्यंत एक स्मारक व यादगार होऊन उभी आहे. त्याचे काम त्याचा मन्त्रीने हात वाढवून चालूं केला.

अनुक्रमणिका